# माणूस

मूल्य : चाळीस पैसे
४ जानेवारी १९६९

## ट्रॅक्टर आणि बॉयलर

टॅरिफ कमिशनने आपल्या अहवालात असे स्पष्टपणे नमूद केले आहे की ट्रॅक्टर उत्पादन करणाऱ्या देशातील पाच कारखान्यांपैकी एकहि कारखाना आवश्यक अशा आर्थिक प्रमाणावर उत्पादन करू शकत नाही. या कारखान्यांचे उत्पादन व व्यवहार आर्थिक दृष्टचा किफायतशीर अशा पातळीवर येईपर्यंत ट्रॅक्टरच्या नवीन कारखान्यास परवाना देण्यात येऊ नये.

ही शिफारस जवळ जवळ धाब्यावर बसवून सरकारने नुकताच असा निर्णय घेतला आहे की, १४ हॉर्स पॉवरचे रशियन बनावटीचे ट्रॅक्टर्स तयार करण्यासाठी खाजगी क्षेत्रांत एक नवा कारखाना काढण्यास परवाना द्यावा.

देशामधील कारखानदारीस उत्तेजन न देता, रशियन सहकार्याने नवीन ट्रॅक्टर कारखाना काढण्याची जरूरी आहे काय ?

ज्याचे सुटे भाग दीर्घकाळपर्यंत आयात करावे लागतील अशा ट्रॅक्टरच्या सहाय्यानें खरेखुरे स्वावलंबन होईल काय ?

जेथे अत्यावश्यक नसेल तेथे परकी सहकार्य घेण्याची गरज नाही, हे धोरण या बाबत मुद्दाम बदलले का जात आहे ?


खुमासदार
बातमी...
SATHE
PICNIC
BISCUITS
आपली आवडती
साठे
पिकनिक
बिस्किटस्
आतां मोहक
हवा-बंद कार्टन्समधून
उपलब्ध होत आहेत
साठे बिस्किट अॅण्ड चॉकोलेट कं. लि., पुणे-२
heros SBC 281 MAR

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : आठवे : अंक : बत्तिसावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये
**संपादक**
श्री. ग. माजगावकर
सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

मूल्य ४० पैसे
४१९ नारायण
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

स. न. डिसेंबर २३

'माणूस'चा २१ डिसेंबरचा अंक वाचला. 'इंडियन सेक्युलर फोरम' संबंधी श्री. दत्तप्रसाद दाभोळकरांनी सादर केलेला वृत्तांत आवडला. सेक्युलरवादी म्हणजे मुस्लीम अनुनय करणारी मंडळी अशी इतर विचारवंतांप्रमाणेच माझीही समजूत होती. परंतु 'सेक्युलर फोरम'तर्फे वीर सावरकरांचे काही विचार इंग्रजीत अनुवादित होत आहेत, आगरकरांच्या विचारांची परंपरा 'सेक्युलर फोरम' चालवू इच्छितो हे वाचून समाधान वाटले. अन्यथा आचार्य अत्रे यांनी म्हटल्याप्रमाणे, दोनचार भाषणे ठोकायची हाच एकमेव कार्यक्रम ठरण्याची भीती आहे.

हिंदू समाजातील अनिष्ट रूढींवर आर्यसमाजाचे संस्थापक स्वामी दयानंद सरस्वती, वीर सावरकर, म. फुले, डॉ. आंबेडकर इत्यादींनी जहाल टीकाप्रहार केले आहेत. मुस्लीम समाजात मात्र अद्यापही विशेष असे विचारपरिवर्तन सुरू झालेले नाही. 'कुराण' हा ईश्वरीय ग्रंथ आहे, महंमद पैगंबर हेच शेवटचे प्रेषित

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

आहेत व ' इस्लाम ' हा परिपूर्ण धर्म आहे असे सर्वच मुस्लीम समजतात. एवढेच नव्हे तर 'सेक्युलर फोरम'ने ज्यांचे पुस्तक प्रसिद्ध केले आहे त्या श्री. एस. इ. हसनन यांचीही तीच भूमिका आहे. श्री. हसनैन यांनी 'केसरी', 'तरुण भारत' व श्री. ज. श्री. टिळक यांच्याविरुद्ध निराधार टीकाही केली आहे. केवळ हिंदुत्वनिष्ठेला विरोध म्हणजे 'सेक्युलर'वाद नसावा, बाकी सेक्युलॅरिझम ठीक आहे.

प्रा. देवदत्त तुंगार, नांदेड.

स. न. डिसेंबर, २३

श्री. दत्तप्रसाद दाभोळकर यांचा 'इंडियन सेक्युलर फोरम' हा लेख वाचला. दाभोळकरांनी 'युक्रान्द'वर केलेला आरोप खोटा आहे. 'युक्रान्द'चा आग्रह जरूर होता व तो यापुढेही राहील की, या देशातील देशी भाषेतूनच प्रत्येक संस्थेचा कारभार झाला पाहिजे. आणि लेखक महाशय जर सायंकाळच्या अधिवेशनला उपस्थित असते तर त्यांना आढळून आले असते की संध्याकाळच्या अधिवेशनात 'युक्रान्द'च्या कार्यकर्त्यांनी मराठी व हिंदी भाषेत बोलूनच ह्या 'ज्ञानगंगेत' भाग घेतला. याचा खरेखोटेपणा दाभोळकरांनी संस्थेचे अध्यक्ष अ. भि. शहा यांना विचारूनच करून घ्यावा. याचाच परिणाम म्हणून प्रि. रेगे, की ज्यांनी सकाळी इंग्रजीतून भाषण केले होते, त्यांनी सायंकाळी आपले भाषण मराठीतून केले. तेव्हा ज्ञानगंगा अमूकच एका भाषेत असते असे नव्हे तर ती प्रत्येक भाषेत असते. डॉ. राणे, या मुलांची समजूत घालीत होते असे लिहून लेखकाने खोटे लिहिण्यापलीकडे काय साधले आहे ते नकळे !

'इंग्रजी हटाव' व 'टेरलीन सूट, टाय, इंपोर्टेड घड्याळ' यांचा लावलेला संबंध 'युक्रान्द'वर चिखलफेक वाटते.

– गोपाळ दुरवंडे

स. न. डिसेंबर, १७

१४ डिसेंबरच्या 'माणूस'मधील 'रुडॉल्फ एबेल' या थोर रशियन हेराची कथा (पूर्वार्ध) वाचली. वेधक वाटली– फार वेगळ्या अर्थाने.

हेर जीवनातल्या घटना या मूलत: नाट्यपूर्ण व रोमांचकारी असतात. म्हणून त्याबद्दल कुतूहल असते. मात्र इथे प्रकर्षाने जाणवले ते हे की, एबेलला दिल्या गेलेल्या न्यायामागे एक मौलिक ईर्षा होती. प्रस्थापित लोकशाहीच्या गृहीत तत्त्वांना या वेळी अमेरिकेने धाब्यावर बसविले नाही. परंपरा व मूलश्रद्धा यांना नख लागेल, असे धोरण ठेवले नाही. दुसरे असे की, खुद्द एबेलने या वेळी ब्रही काढला नाही.

हे लक्षात घेता, सध्या वादग्रस्त झालेल्या नारखेडे प्रकरणातील काही गोष्टी सहज ध्यानी येतात. एका बाजूने विनोबा-जयप्रकाशांसारखे मुरब्बी तत्त्वज्ञ व मान्यवर नारखेड्यांच्या निर्दोषित्वाची ग्वाही देताहेत, वर्तमानपत्रांतून उलटसुलट प्रतिक्रिया व्यक्त होताहेत, नारखड्यांचे सुप्रसिद्ध उपोषणसत्र पार पडले आहे, अन् या सर्वांच्या पार्श्वभूमीला दोन न्यायालयांत सिद्ध झालेल्या गुन्ह्यांचा इतिहास आहे.

अशा वेळी सरकारी धोरण काय असावे ? खुद्द नारखेडे यांचे कोणते वर्तन असावे ? याबद्दल लक्षणीय असे बरेच काही ही एबेल कथा न कळत सुचवून जाते.

या खटल्यात एबेल तटस्थासारखा वागला, हे हेरनितीला अनुसरून झाले. पण न्यायसिद्ध घटनेच्या बाबतीतही अशीच भूमिका घ्यायला नको का ?

**शरद काळे, खारेपाटण**

**सा. न.** **डिसेंबर, १३**

आपल्या ३० नोव्हेंबर ६८ च्या अंकामधील 'नारखेडे बंधूंसारखे निष्ठावंत गांधीवादी कार्यकर्ते मरणाच्या दारात घोटाळत आहेत. तरी त्यांची त्यातून लवकरच सुटका व्हावी अशी तीव्र इच्छा आपण प्रकट केली आहे.' ही माहिती वाचली. तसेच 'लोकसत्ता' ८ डिसेंबर ६८ 'भारूड' या सदरात अनिरुद्ध पुनर्वसु यांनी प्रसिद्ध केलेली 'सर्वोदयी देवरामभाऊ !... मग काय त्या पारध्यांनी आत्महत्याच केल्या ?' ही माहिती वाचली.

आपण नारखेडे बंधूंच्या बाबतीत प्रसिद्ध केलेली माहिती व अनिरुद्ध पुनर्वसु यांनी लोकसत्तेमध्ये प्रसिद्ध केलेली माहिती वाचल्यावर दोन्ही बातम्या एकमेकाविरुद्ध वाटतात. तरी वाचकांनी कोणत्या बातमीवर विश्वास ठेवावा ?

**मनोहर पाडावे, मुंबई**

हा प्रश्न आता 'विश्वासा'पेक्षा तत्त्वाचा झालेला आहे. न्यायालयाने दोषी ठरवलेली व्यक्ती निर्दोषी असू शकते काय ? असल्यास हे निर्दोषीत्व सिद्ध करण्यासाठी तिला लोकशाही राष्ट्रांत काही अन्य मार्ग उपलब्ध असणे अवश्य आहे काय ?

या दृष्टिकोणातून नारखेडे प्रकरण मुळांपासून निःपक्षपातीपणे पुन्हा एकदा तपासले जावे, असे 'माणूस'ला वाटते.

*—संपादक*

मुंबई समाचार

# मूलभूत हक्कांची पायमल्ली

सु. ल. सोमण

संसदेचे हिवाळी अधिवेशन नुकतेच संपले. अनेकविध प्रश्नांवर संसदेत ऊहापोह झाला. इंदिरा-सरकारवरील अविश्वासाचा ठराव फेटाळला गेला. सरकारी कर्मचाऱ्यांचा संपाचा अधिकार काढून घेणारा आवश्यक सेवाविषयक कायदा, विरोधकांच्या विरोधाची तमा न बाळगता पसार केला गेला. भारताची आपल्या शेजारी विरोधी राष्ट्रांविरुद्धची प्रतिकाराची तयारी, नक्षलवाद्यांचे चाळे, पक्षांतर-विषय, संसदीय समितीच्या शिफारशी, हरियानातील पेचप्रसंग, विद्यार्थ्यांची अराजके, बनारस हिंदू विश्वविद्यालय, जातीय पक्ष, गांधीजन्मशताब्दिविरुद्धची दिल्लीतील भितीपत्रके, भारताचे परराष्ट्र व आर्थिक धोरण, नियोजन वगैरे अनेक राष्ट्रीय प्रश्नांबरोबरच कांतिलाल प्रकरण, राजीव गांधींच्या लग्नात कॅनडातून आलेल्या भेटी वगैरे वैयक्तिक प्रश्नही उपस्थित झाले. जातीय प्रश्नांचा उल्लेख करताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व जमियते मुस्लीम ह्या संघटनांवर गृहमंत्र्यांनी हल्ले चढविले. परंतु खोलात शिरून पाहू गेल्यास, उघड उघड जातीय पक्षांपेक्षाही अधिक किळसवाणे जातीय राजकारण कोणी खेळले असेल तर ते काँग्रेसनेच असे दिसून येईल. जातीय वैमनस्याचा आपल्या पक्षीय फायद्यासाठी उपयोग करून घेणारा त्यानंतरचा पक्ष म्हणजे कम्युनिस्ट ! पण ' सेक्युलॅरिझम 'च्या पडद्याआड ह्यांनी घातलेल्या जातीय, प्रांतीय धुडगुसावर केंद्रीय मंत्री टीका करतीलच कशी ?

ह्या अधिवेशनात एका ठरावाचा खूप गाजावाजा झाला. तो प्रत्यक्षतः मतासाठी टाकला गेला नाही व त्यावरील निर्णयही घेतला गेला नाही. संसदीय समितीकडे पुन्हा एकदा विचारार्थ पाठवायचा एवढेच पुन्हा एकदा ठरवले गेले. हा ठराव म्हणजे, प्रजासमाजवादी खासदार नाथ पै ह्यांनी मांडलेले, संसदेचे सार्वभौमत्व श्रेष्ठ ठरविणारे विधेयक. संसदेचे सार्वभौम अधिकार, घटनेतील कुठल्याही कलमात बदल करण्याचे अधिकार संसदेला परत मिळवून देणारे ते विधेयक होते. विरोधी पक्षीय खासदाराने ते मांडलेले असूनदेखील, ह्या विधेयकाला सरकार पक्षाने उचलून धरले होते, तर स्वतंत्र, जनसंघ, संसोपा आदींचा या विधेयकाला विरोध होता. प्रत्यक्ष सत्तारूढ काँग्रेसपक्षातदेखील ह्या विधेयकाबाबत एकवाक्यता नव्हती. म्हणूनच हे विधेयक पुन्हा एकदा समितीकडे विचारार्थ पाठविले गेले.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या ' मानवी हक्क ' दिनाच्या दिवशी एका सभेत बोलताना सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश श्री. हिदायतुल्लाखान ह्यांनी " एकीकडे मानवी हक्कांचा समारंभ साजरा होत असताना, दुसरीकडे भारतात मात्र नागरिकांच्या

मूलभूत हक्कांची काटछाट करण्याचे प्रयत्न चालू आहेत, हे आश्चर्यजनक होय !" अशा आशयाचे उद्गार काढले. ह्या भाषणाच्या वार्ता सर्वत्र झळकल्या आणि पुन्हा एकदा लोकसभेत ह्या मसुद्यावर वादंग माजले.

" भारतीय राज्यघटनेत, तिसऱ्या विभागात या राष्ट्रामधील नागरिकांना जे मूलभूत हक्क दिले आहेत, त्यांच्यासकट त्या राज्यघटनेत कोणतेही बदल करण्याचा अधिकार संसदेला असावा, हे श्री. नाथ पैंच्या ह्या गाजलेल्या विधेयकाचे सार ! वास्तविक पाहता राज्यसभा व लोकसभा ह्या दोन्ही गृहांत दोन तृतीयांश बहुमताने सरकारला राज्यघटनेत बदल घडवून आणण्याचे अधिकार आहेत व त्याप्रमाणे, स्वातंत्र्यानंतर, जवळजवळ सतरा वेळा घटनेत दुरुस्ती केली गेली आहे. परंतु १९६७ च्या फेब्रुवारीमध्ये गाजलेल्या गोलकनाथ खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने मूलभूत हक्कांचे सार्वभौमत्व मान्य करून, त्याबाबत कुठल्याही प्रकारची घटनात्मक दुरुस्ती करण्याचा अधिकार संसदेला नाही असा बहुमताने निर्णय दिला. ह्यामुळे त्या विशिष्ट संदर्भापुरते घटनेचे सार्वभौमत्व न्यायालयाने मान्य केले आहे आणि म्हणूनच, संसदेचे श्रेष्ठत्व पुन: प्रस्थापित करण्यासाठी खासदार नाथ पैंनी हे विधेयक आणले व कॉंग्रेसने त्याचा पाठपुरावा केला. घटनेत मूलभूत हक्कामध्ये, खाजगी मालमत्तेच्या जोपासनेचा हक्कही नागरिकांना बहाल केला गेला आहे. ह्याच हक्काचा वापर करून गोलकनाथ केस लढवली गेली व निर्णय सरकारविरुद्ध गेला ! खाजगी मालमत्तेच्या जोपासनेच्या ह्या अधिकारामुळे समाजवादी वाटचालीला खीळ बसेल व समाजवादी समाजरचनेचे तत्त्वच मुळात भरडले जाईल ह्या भीतीतूनच ही घटनादुरुस्ती सुचविण्यात आली आहे ! समाजवादी उभारणीसाठी खाजगी मालमत्तेला कात्री लावणे सुलभ व्हावे हा उद्देश सांगितला जातो ! परंतु मूलभूत हक्कांमध्ये, विचारस्वातंत्र्य, भाषणस्वातंत्र्य, प्रचारस्वातंत्र्य, संघटनास्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य इत्यादींचाही समावेश होतो. उद्या, वरील दुरुस्तीचा आधार घेऊन ह्या मूलभूत हक्कांनाही कात्री लावण्यात आली तर—तर ज्या लोकशाही तत्त्वांवर हा सर्व राज्यघटनेचा व स्वातंत्र्याचा डोलारा उभारण्यात आला आहे, त्या लोकशाहीवरच घाला येण्याची शक्यता आहे आणि ह्याच भीतीपायी ह्या विधेयकाला कॉंग्रेस व अन्य पक्षांतूनही विरोध होत आहे व म्हणूनच हे विधेयक, पुन्हा एकदा संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठवले गेले आहे ! खाजगी मालमत्तेच्या हक्काला कात्री लावण्याला, ह्या विधेयकाच्या बऱ्याच विरोधकांचाही विरोध नाही. श्री. हिदायतुल्लाखान ह्यांनीही, खाजगी मालमत्तेचा हक्क हा मूलभूत हक्कच नाही, असे सांगितले आहे व म्हणूनच ह्या विधेयकाची अंमलबजावणी केवळ खाजगी मालमत्तेच्या ह्या प्रश्नापुरतीच मर्यादित असावी असे पर्यायी धोरण, बहुसंख्य खासदारांनी, विचारवंतांनी अवलंबिलेले आहे. इतर मूलभूत हक्कांवर गदा आणायला मात्र बहुसंख्याकांचा विरोधच आहे.

मूलभूत हक्कांच्या ह्या प्रश्नाला थोडीशी ऐतिहासिक पार्श्वभूमीही आहे. स्वातंत्र्य लढ्यात वेळोवेळी बहुसंख्य नेत्यांनी नागरिकांच्या मूलभूत हक्कांच्या गरजेविषयी प्रतिपादन केलेले आहे. १८९५ साली लोकमान्य टिळकांनी मांडलेल्या 'स्वराज्य बिलात' देखील ह्या मूलभूत हक्कांना अग्रक्रम दिला होता. स्वराज्यातील घटना कशी राहील ह्याविषयी बोलताना त्यांनी मतप्रदर्शनाचे स्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, खासगी मालमत्तेच्या जोपासनेचे स्वातंत्र्य व शासनालेखी सर्वांना समान वागवणूक इत्यादी मूलभूत अधिकारांचे नागरिकांना आश्वासन दिले होते. ह्या तत्त्वांचा १९२१ मध्ये आयर्लंडच्या स्वतंत्र घटनेत अंतर्भाव केल्यानंतर, भारतील स्वातंत्र्यलढ्यातला मूलभूत हक्कांची संपादणी हा एक ध्येयबिंदू होऊन बसला. १९२७ ची मद्रास काँग्रेस, १९२८ च्या नेहरू कमिटीचा रिपोर्ट वगैरे प्रत्येक वेळी ह्या मूलभूत हक्कांवर भर दिला गेला. १९४५ मध्ये तेजबहादुर सप्रू समितीनेही ह्या हक्कांच्या आवश्यकतेवर भर दिला व हे मूलभूत नागरिक हक्क, अल्पसंख्य जाती-जमातींना संरक्षण देण्याच्या दृष्टीनेही आवश्यक आहेत हा दृष्टिकोण प्रथमच मांडला. यातूनच भारतीय स्वातंत्र्य व नागरिकांचे मूलभूत हक्क ह्यांचा अन्योन्य संबंध निर्माण झाला व डॉ. आंबेडकरांनी घटनेद्वारा, भारतीय नागरिकांच्या मूलभूत हक्कांना शेवटी सर्वश्रेष्ठत्व बहाल केले !

लोकशाहीत जनतेच्या मूलभूत हक्कांना आपण अग्रक्रम देतो. त्याचप्रमाणे जनतेनेच निवडून दिलेल्या प्रतिनिधींना काही नवीन कायदे व नियम करण्याचे अधिकारही प्राप्त होतात. अशा वेळी संसदेला सर्व अधिकार बहाल केले गेले तर, सत्ताभिलाषेपोटी लोकशाहीलाच सुरूंग लागण्याची व त्यायोगे हुकूमशाहीला निमंत्रण दिले जाण्याची शक्यता निर्माण होते. उलटपक्षी संसदेपासून हा अधिकार हिरावून घेतला गेल्यास, लोकप्रतिनिधींपेक्षाही घटना श्रेष्ठ ठरते व लोकसभेपेक्षाही न्यायालयांना जादा अधिकार प्राप्त होतात; हाच ह्या विधेयकाबाबतचा पेचप्रसंग आहे. पेचप्रसंगाच्या क्लिष्टतेमुळेच मतभेद तीव्र आहेत व निर्णयाप्रत पोचणे संसदेला अशक्य झाले आहे. मूलभूत हक्कांची पायमल्ली होणार की त्यांना सर्वश्रेष्ठत्व लाभणार ह्याचे उत्तर ह्या विधेयकाच्या भवितव्यावर अवलंबून आहे !

## देवराम नारखेडे

१९६० साली जळगाव जिल्ह्यात सावळे गावी आठ पारध्यांचे खून झाले. त्या संबंधात नारखेडे बंधूंवर आरोप ठेवण्यात आले. त्यांची न्यायालयीन चौकशी झाली व नारखेडे बंधूंवरील आरोप शाबीत करण्यात फिर्यादींना यश मिळाले. नारखेडे बंधूंना फाशी व जन्मठेपीच्या शिक्षा सुनावण्यात आल्या. हायकोर्ट व सर्वोच्च न्यायालयातील सुनावण्यांनंतरही ह्याच शिक्षा कायम करण्यात आल्या. राष्ट्रपतींच्या दयेमुळे ह्या आरोपी म्हणून शाबीत झालेल्यांच्या फाशीच्या शिक्षा रद्द करण्यात आल्या व

त्यांना जन्मठेपी देण्यात आल्या. त्यानंतरही श्री. देवराम नारखेडे यांनी पू. विनोबा, इतर अनेक मान्यवर सामाजिक कार्यकर्ते व राजकीय नेते, काही मंत्रिमंडळसदस्य आदी नेत्यांना पत्रे लिहून स्वत:चे निर्दोषीपणा दाखवून द्यायचा प्रयत्न केला. वृत्तपत्रांनीही श्री. नारखेडे यांची बाजू चांगलीच उचलून धरली. ह्या सर्व प्रयत्नांना यश यऊन गेल्या वर्षी श्री. देवराम नारखेडे यांची शासनाने मुक्तता केली; परंतु त्यांच्या दोघा बंधूंच्या मुक्ततेला मात्र नकार देण्यात आला. अलीकडे ह्या साऱ्या प्रश्नांना पुन्हा एकदा उजाळा मिळाला, तो श्री. देवराम नारखेडे यांनी आपल्या भावांच्या मुक्ततेसाठी केलेल्या उपोषणामुळे! देवरामांबरोबर, त्यांच्या बंधूंनीही तुरुंगात उपोषण केले होते. अनेक राजकीय, सामाजिक पुढाऱ्यांनी ह्या वेळी आपले वजन खर्ची घातले. महाराष्ट्राचे महसूल मंत्री श्री. देसाई ह्यांनी मध्यस्थी केली, सरकारने फेरविचाराचे आश्वासन दिले आणि ही उपोषणे संपली.

ह्या प्रकरणाचा नवा अध्याय अगदी अलीकडे गेल्या आठवड्यातच सुरू झाला! आजपर्यंत देवराम नारखेडे आणि त्यांच्या बंधूंच्या बाजूने बऱ्याच वृत्तपत्रांनी, अनेक मान्यवर नेत्यांनी लिहिले, वक्तव्ये प्रसिद्ध केली. परंतु ह्या वेळी मुंबईच्या 'लोकसत्ते'तून लिहिताना श्री. अनिरुद्ध पुनर्वसूंनी एक वेगळाच सूर छेडला. त्यांच्या लिखाणापाठोपाठच, खुद्द मृत्यू पावलेल्या पारध्यांच्या नातेवाईकांनी मुख्य मंत्र्यांना उद्देशून एक पत्रक प्रसिद्ध केले! ह्या पत्रकात व श्री. पुनर्वसूंच्या लिखाणांत उपस्थित केला गेलेला मुद्दा, प्रकरणाची दुसरी बाजू बोलून दाखविणारा, बराचसा तर्कसंगत व म्हणूनच विचार करण्याजोगा आहे.

श्री. देवराम नारखेडे हे गांधीवादी तरुण! पदव्युत्तर परीक्षेनंतर ह्या तीन बंधूंनी साळवे खेड्याची आपल्या सार्वजनिक कार्याची जागा म्हणून निवड केली. श्री. देवराम नारखेडे हे नावाजलेले सामाजिक कार्यकर्ते, सुविद्य गांधीवादी तरुण! त्यांच्या गावात आठ फासे पारध्यांनी, शेतात चोरी करण्याच्या केलेल्या प्रयत्नातून, उद्भवलेल्या भांडणांतून खून झाला व त्या आरोपात जाणून-बुजून ह्या निरपराध ध्येयवादी तरुणांना गुंतविण्यात आले ही आतापर्यंत ज्ञात असलेली ह्या प्रकरणाची एक बाजू! पण वर उल्लेखिलेल्या पत्रकात, मृत व्यक्तींच्या नातेवाईकांनी म्हटले आहे की ह्या व्यक्ती भटक्या फासेपारधी जमातीतल्या नव्हत्या; तर ते आठही सधन शेती करणारे, त्या विभागांतील प्रतिष्ठित लोक होते. त्यांचे समाजातले स्थान व त्यांची प्रतिष्ठा सहन न होऊन, देवराम नारखेडे व इतरांनी त्यांचा काटा काढला. त्यानंतर त्या गावात आपल्याला सुरक्षित वाटेनासे झाल्याने आपल्याला आपली घरे-दारे, जमीन-जुमला सोडून देऊन दुसरीकडे स्थलांतर करावे लागले. श्री. अनिरुद्ध पुनर्वसू म्हणतात त्याप्रमाणे श्री. नारखेडे बंधूंना न्यायालयात आपले निरपराधीपण सिद्ध करण्यासाठी पूर्ण वाव देण्यात आला होता व असे असून त्यांच्यावरील आरोप पूर्णपणे शाबीत झाले होते—एकदा नव्हे तीनदा! दोन्ही

बाजूंचे संपूर्ण पुरावे लक्षात घेऊन ज्या निर्णयाप्रत न्यायालय पोचले ते निर्णय चुकीचे होते असे केवळ देवरामांचे म्हणणे ऐकून त्यांच्या पाठीराख्यांनी असे म्हणणे निश्चितच गैर आहे, हा श्री. पुनर्वसूंचा मुद्दा निश्चितच तर्कसंगत आहे. मान्यवर व्यक्ती, उच्चपदाला पोचलेल्या व्यक्ती, क्वचित् प्रसंगी मोहाने अनपेक्षित अशी अवैध कृत्ये करून जातात हे नवीन नाही व ही शक्यता कोणीही नाकारणार नाही. मग श्री. नारखेडे यांच्या बाबतीतच त्यांच्यातला सर्व चांगूलपणा मान्य करूनही हा वेगळा, पक्षपाती सूर हे मान्यवर नेते—त्यांत विनोबापासून श्री. बाळासाहेब देसायां-पर्यंत सारेच आले—कोणत्या निकषावर करतात हा श्री. पुनर्वसूंचा सवाल आहे. आणि मला वाटते त्या प्रकरणात दोन्ही बाजूंना पूर्ण न्याय मिळावा असे वाटत असल्यास, खुद्द श्री. देवराम नारखेडे व त्यांचे यच्चयावत् सर्वच पाठीराखे आणि समर्थक ह्यांनी ह्या प्रश्नाचे संपूर्ण तर्कसंगत उत्तर द्यावे. अन्यथा न्यायालयांचा उपमर्द करण्याचे टाळावे ! सरकारनेही दोन्ही बाजूंना पूर्ण न्याय द्यायचा असेल तर योग्य समर्थन दिल्याशिवाय कोणताच निर्णय घेऊ नये, मग कदाचित संपूर्ण प्रकर-णाची पुन्हा चौकशी करावी लागली तरी हरकत नाही !

## आणि ह्याचीही चौकशी व्हावी !

श्रीमती आशा नाडकर्णी यांचे बंधू व त्यांच्या मातोश्री ह्यांच्यावरील खटल्याचा गिरगाव कोर्टाचे न्यायाधीश श्री. कोर्डेरो ह्यांनी निर्णय देऊन आरोपींना पूर्णपणे निर्दोषी ठरवून बंधमुक्त केले आहे. हा सर्व खटलाच मुळात बनावट होता अशी न्यायमूर्तींची खात्री पटल्याचे त्यांनी निकालपत्रात म्हटले आहे. व्हिजिलन्स ब्रँचच्या कारभारावर व ब्रँचचे अधिकारी मेहता व वसावडा ह्यांच्यावरही त्यांनी चौफेर टीका केली आहे.

परंतु ह्या खटल्यात ज्या काही प्रतिष्ठित व्यक्ती व सामाजिक कार्यकर्त्यांची नावे गोवली गेली त्यासंबंधात कुठले निर्णय, खटल्याच्या कक्षेत येत नसल्याने न्यायमूर्तींनी दिलेले नाहीत. ह्या व्यक्तींच्या वर्तनाची चौकशी कोण करणार? ती तशी चौकशी होणे आवश्यक आहे. कारण अशा व्यक्तींना एक सामाजिक प्रतिष्ठा असते. अशा खटल्यामुळे ह्या प्रतिष्ठेला, ह्या व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वाला तडे जायची भीती असते किंवा, वैयक्तिक प्रतिष्ठेमुळे ह्या व्यक्ती चौकशीविना दूर राहिल्या—विशेषतः दोषी असून दूर राहिल्या—तर त्यामुळे, सामान्य जनतेचा त्या बुरख्याआडून ह्या व्यक्तींचे अनैतिक जीवन चालू असते, असा समज व्हायची भीती-पण असते ! म्हणूनच ह्या खटल्यात ज्यांची नावे आली व विशेषतः बचाव पक्षाने ज्यांच्यावर चौफेर हल्ला चढवला त्यांची चौकशी खास समिती नेमून करायची व जनतेपुढे वस्तुस्थिती मांडायची जबाबदारी सरकारवरच आहे ! फार उशीर होण्या-पूर्वीच अशा कृत्यांना आळा घालण्यासाठी सरकारने पाऊल उचलले पाहिजे ! ○

अशी सुरेख चित्रं घ्या



Agfa क्लिक III खरेदी कराल त्याच दिवशी

* फक्त रोखा नि करा क्लिक. लावायला नको. चूक होण्याची धास्ती नाही.
* '१२०'च्या रोलवर १२ मोठी (६×६ सें.मी.) छायाचित्रे.
* सोयिस्कर आच्छादन, पोर्ट्रेट लेन्स व फ्लॅशगन पाहिजे असल्यास जादा आकार.



आगफा यांच्या देखरेखीखाली दि न्यु इन्डिया इन्डस्ट्रीज लि. बडोदे, यांनी तयार केला

AGI प्रमुख विक्रेते:
आगफा-गेव्हार्ट इंडिया लिमिटेड
मुंबई नवी दिल्ली कलकत्ता मद्रास

CMAG-103-203

# मु क्ता फ ळे

## बन्सीलाल, तू कुठे रे जाशील ?

आज श्री. म. माटे असते तर त्यांनी ही गोष्टदेखील लिहिली असती ! अंतःकरणाला पीळ पाडणारी ही घटना आहे. हरियाना प्रांतात गेल्या मे महिन्यात मुदतपूर्व निवडणुका होऊन काँग्रेस अधिकारपदावर आली. ६७ च्या निवडणुकीनंतर काँग्रेसविरुद्ध याच प्रांतात पहिले बंड झाले. प्रांतातील काँग्रेसचे वजन कमी होण्याचे मुख्य कारण तेथील काँग्रेस पुढारी भागवत दयाळ शर्मा ! प्रतापसिंग कैरों यांच्या तालमीतला हा पहिलवान फारच माजला होता. माजलेल्या पहिलवानाला निराळा 'पेच' घातल्याशिवाय तो पडत नाही. मुदतपूर्व निवडणुकीपूर्वी म्हणूनच भागवत दयाळ शर्मांना दिल्लीत बोलावून घेण्यात आले. इंदिराबाईंनी त्यांना सांगितले, "शर्माजी, तुम्ही फार त्यागी आणि थोर मनाचे आहात. ८१ जणांना तिकिटे द्यायची आहेत, परंतु अर्ज फार आहेत. तुम्ही या वेळी उभे राहू नका. तुमचे वजन यामुळे अधिक वाढेल !" पहिलवान समजला. वजन वाढेल वगैरे खोटे आहे. त्याने खिशातून ( पहिलवान असून त्याच्या अंगावर नेहरू शर्ट होता व त्याला खिसाही होता.) यादी काढली. बाईंपुढे यादी ठेवून म्हणाला—"ही आमची ५० माणसे ! यांना सर्वांना तिकिटे दिलीत तर मी नाही उभा राहत." बाई, निर्जलिंगप्पा कबूल झाले. घासाघीस करून त्यातल्या ४८ माणसांना तिकिटे मिळाली.

निवडणुकांत शर्माजींची ३६ माणसे निवडून आली. मुळात काँग्रेसचे ४८ निवडून आले. त्यांतली ३६ आपली माणसं. पहिलवान मनात हसला. मुख्य मंत्री कुणी व्हायचे याच्या वाटाघाटी सुरू झाल्या. बाईंनी पुनः नवा डाव टाकला. शर्माजी दिल्लीला गेले. बाई म्हणाल्या, "शर्माजी तुम्ही फार थोर आणि त्यागी. तुम्ही निवडणुकीला उभे राहिला नाहीत यामुळे तुमचे आणि काँग्रेसचेही वजन वाढले. आता थोडा आणखी त्याग करा. मुख्य मंत्री म्हणून तुमच्या ३६ माणसांतलाच कुणी हवा हा आग्रह सोडा. हे बन्सीलाल म्हणून आहेत. जाट जमातीचे पुढारी आहेत. त्यांना मुख्य मंत्री करू !"

पहिलवान मनात हसला. आपल्याशीच म्हणाला—बाई आणि आप्पा यांना मी काय दुधखुळा वाटतो ? त्याने गुलझारीलाल नंदांशी कानगोष्ट केली. नंदा मिशांच्या टोकातून हसले. समझोता झाला. हरियाना प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष भागवत दयाळ शर्मांनी व्हावे व मुख्य मंत्री बन्सीलाल !

पहिलवानाला जाणीव झाली की आपण आता 'मुख्यमंत्रीमेकर' आहोतच. बन्सीलालला मनात येईल तेव्हा पळवून लावू. तूर्त प्रदेश काँग्रेस तर ताब्यात घ्यावी. प्रदेश काँग्रेस आणि ३६ आमदार यांच्या म्होरकेपणामुळे पहिलवानाचे वजन खरोखरच वाढले. तो आता राजरोस गुरकू लागला—बन्सीलाल, तू कुठे रे जाशील ?

दिल्लीत इंदिराजी सचिंत. दौऱ्यावर निजलिंगप्पा सचिंत. बन्सीलालची तर झोप उडाली. स्वप्नांतदेखील भागवत दयाळ शर्मा, "बन्सीलाल, तू कुठे रे जाशील ?" हा प्रश्न ! कुणाला काही सुचेना. दिवस जात होते. स्वप्नात एके दिवशी प्रत्यक्ष राष्ट्रपिता महात्मा गांधी आले. बोलणे झाले.

"बेटा बन्सी ! तू सचिंत का ?"

"काय करावे बापूजी ! काँग्रेस मंत्रिमंडळ कोसळणार असे वाटते. भागवत दयाळ शर्मा उन्मत्त झाला आहे. ३६ आमदार त्याचे ! मी तरी काय करू...!"

बापूजी हसले.

"बन्सीलाल, तुझ्या प्रांतातीलच काय, सगळ्या देशांतील काँग्रेस आता नष्ट व्हायला पाहिजे असे मला वाटते. अखेरच्या सायं प्रार्थनेला जाण्यापूर्वी मी लिहून ठेवले आहे—'काँग्रेस विसर्जित करा !' माझीच जन्मशताब्दी करतात पण माझे कुठे ऐकले त्यांनी ? बेटा, तुझ्या सांगण्याने मला आनंद व्हायला हवा होता, परंतु मला वाटते बन्सीलाल तुला धास्ती नाही. ४८ तील ३६ आमदारांची निष्ठा दुसरीकडे आहे याची भीती तुला वाटते. 'निष्ठा' हा गुण निकालात निघून खूप वर्षे झाली आहेत बन्सी. आता ही विकत घेण्याची गोष्ट आहे. तू प्रयत्न कर. छत्तिसातले निदान तीस तुला वश होतील !!"

बन्सीलाल यांना जाग येताच उत्साहाने एकेका काँग्रेस आमदाराला भेटायला बोलावले. काही म्हणाले—"कोण शर्मा ? साहेब आता तुमची कृपा असली तर, त्याला जाळून टाकू !" काही म्हणाले—"आम्हांला मंत्री करण्याचे काही बघा. या शर्माची मिजास उतरवू !" काही म्हणाले—"या पहिलवानाला पालथा घालायला कठीण नाही. आम्हीही खेळलेले आहोत." काहीजण—"नाटक करू मंत्रिमंडळाचा पाठिंबा काढून घेतल्याचे. पहिलवान हुरळेल. गेंडा एकदा मैदानात आला की घालू पालथा !"

बन्सीलालने हिशेब केला. नाटकाची संवाद, पद्ये लिहिली गेली. पहिलवान हुरळला. दंड थोपटीत, मांड्यांचे प्रचंड आवाज काढीत जाहीरपणे गर्जू लागला—"बन्सीलाल, आता तू कुठे रे जाशील ?" दिल्ली हादरून गली. इंदिराबाई, निजलिंगप्पा हवालदिल झाले.

शर्मा पहिलवान बन्सीलालला भिडला. निमिषार्धात बन्सीलालची पाठ लागणार असा सर्वांचा कयास होता. परंतु अकल्पित घडले. बन्सीलालने शर्मा पहिलवानाच्या लंगोटाची गाठच सोडली. गांगरलेला शर्मा पहिलवान लंगोट सावरीत पळाला. त्याची

निष्ठावंत ३६ माणसे टाळ्या पिटीत होती.

कुस्ती न होताच लज्जारक्षणार्थ प्रतिस्पर्धी पहिलवान पळवून लावल्याबद्दल बन्सीलालचे सर्वजण अभिनंदन करू लागले. बन्सीलालने मात्र गांधीजींच्या स्वप्नातील साक्षात्काराची हकीकत ओठावाटे काढली नाही. तो इतकेच म्हणाला—

"आपल्यापैकी कुणालाच आता लाजा उरलेल्या नाहीत...!"

## प्रासादशिखर आणि वृद्ध कावळा !

जगण्यासारखे काही सिल्लक आहे तोपर्यंतच मरण्यात मौज आहे असे म्हणतात. ही मौजेची कल्पना कर्णोपकर्णी पसरलेली आहे इतकेच. कारण मेल्यानंतर 'त्याचे' काय झाले हे कळायला मार्ग नसतो. खरी गोष्ट तर अशी आहे की, जगण्यासारखे काहीही शिल्लक उरले नाही, तरीदेखील मरण्यात अर्थ नाही ! निजलिंगप्पांना नुकतेच ६६ वे वर्ष लागले. हे वाक्य 'नुकतेच कुठे ६६ वे वर्ष लागले आहे...' असेदेखील वाचता येते. तसेच ते आपण वाचू या. संजीव रेड्डी यांच्या अध्यक्षतेखाली त्यांचा दिल्लीत वाढदिवस साजरा करण्यात आला. या प्रसंगी निजलिंगप्पा म्हणाले,

—"डौलात (Gracefully) निवृत्त होण्याची कला राजकीय पुढाऱ्यांनी शिकली पाहिजे. वय झाल्यानंतर तरुण माणसांकरिता त्यांनी जागा खाली केली पाहिजे..." या प्रसंगी जमलेल्या श्रोत्यांच्या हृदयांत धस्स् झाले. केवळ म्हातारपणामुळे, दुसरी जागा नक्की मिळायचे ठरल्याशिवाय, आहे ती जागाही खाली करा असे काँग्रेस अध्यक्ष सांगतात की काय, असा सर्वांना प्रश्न पडला. संजीव रेड्डी दचकलेच. ते पूर्वी काँग्रेस अध्यक्ष होते. ते तिथून मध्यवर्ती मंडळात जाण्यासाठीच उठले. इंदिराबाईंनी त्यांना मंत्रीमंडळातून जागा खाली करण्यास सांगण्यापूर्वी केवढी धावपळ झाली ! लोकसभेच्या स्पीकरपदाचे आमिष दाखवण्यात आले. संजीव रेड्डी काही दुधखुळे नव्हते. मंत्री तो मंत्री ! ते म्हणाले,

"मी नाही होणार स्पीकर. मी मंत्रीच होणार !" शेवटी इंदिराबाईंनी धाक घातला— "पाहा बाई ! स्पीकरदेखील नसलं ना व्हायचं तर निवृत्तच व्हावं लागेल !" तेव्हा जमलं. 'ग्रेसफुली' एका जागेवरून उठून दुसऱ्या जागेवर जाणेदेखील खेदजनक होत असताना तरुण माणसांकरिता जागा अजिबात खाली करण्याची कल्पना काँग्रेस अध्यक्षांनी करताच रेड्डी दचकले ते यामुळे. निजलिंगप्पांनीदेखील काँग्रेस अध्यक्षपद नक्की झाले, तेव्हाच म्हैसूरची गादी सोडली असा टोमणा आपल्या भाषणात त्यांना मारायचे त्यांनी मनात नक्की केले होते. परंतु काँग्रेस अध्यक्ष फार चतुर आहेत. ते म्हणाले,

"७२ च्या निवडणुकीला मी उभा न राहण्याचे ठरवले आहे. निजलिंगप्पांसारखा थोर, त्यागी, देशभक्त वयाच्या ७० व्या वर्षी निवृत्त होणारच असेल तर ही

पोकळी कशी भरून येणार या कल्पनेने श्रोत्यांची मने हेलावली. डोळयांत अश्रू दाटले. या वाक्याला टाळी पडली नाही. सगळे दिङ्मूढ का काय तसे झाले, संजीव रेड्डींनी मग सर्वांना दिलासा दिला. आपल्या भाषणात ते म्हणाले—

"खूप वर्षांपूर्वी मी कॉंग्रेस अध्यक्ष असताना अशीच सूचना केली होती. निजलिंगप्पा म्हणत आहेत की वय झाले की निवृत्त व्हा! माझी सूचना अधिक चतुर होती. वयाची जाचक अट त्यात नव्हती. कारण कुणाला कितव्या वर्षी मंत्रिपद मिळेल ते काय सांगावे? मी सुचवले होते की जी मंडळी सतत दहा वर्षे मंत्रिपदावर आहेत, त्यांनी निदान पाच वर्षे निवृत्त व्हावे. फक्त पाच वर्षे! मग पुन: मंत्रिपदावर यायला हरकत नाही. हेदेखील कुणी ऐकले नाही हो! तेव्हा नेहरू होते. आता तर काय?"

इथे मात्र कडाडून टाळी पडली. इतिहास नेहमी भवितव्य ठरवतो. संजीव रेड्डींनी निवृत्तीचा हा उज्ज्वल इतिहास सांगताच, श्रोत्यांनी सुस्कारा सोडला. निजलिंगप्पांच्या सूचनेचे काहीही होत नाही, असा दिलासा रेड्डींनी लगेच दिला हे त्यांना फार आवडले.


वस्तुत: निजलिंगप्पांच्या सूचनेने काहीही होत नाही हे इतक्या तडकाफडकी रेड्डींनी सांगितले नसते तरी चालले असते. कारण निजलिंगप्पांना राष्ट्रपती–निदान उपराष्ट्रपती-किमान राज्यपाल यातले काहीही होता येणार नाही का? राष्ट्रपतीपदाचे मग बघू या असे जर इंदिराबाई त्यांना सहज बोलताना म्हणाल्या असल्या तर ते तुम्हाआम्हांला काय कळणार? आम्हांला तर असे वाटते की विवक्षित वयानंतर वाढदिवस साजरा करण्याची प्रथा बंद केली तर ते अधिक सोयीचे होईल! लोकांना मुळी हा म्हातारा झाला हे कळणारच नाही. आता हेच पाहा. जर काही मंडळींनी निजलिंगाप्पांना ६६ वे वर्ष लागल्याचे मुद्दाम शोधून काढले नसते तर कुणी चौकशी तरी करणार होता का? गुबगुबीत गाल वर आलेले आहेत, भरपूर आहार-खूप निद्रा–एकंदरीत सुखस्वास्थ्याचे तेज अंगावर पसरलेले आहे. अशा परिस्थितीत अधिकारावरील कॉंग्रेस मंत्री, कॉंग्रेस अध्यक्ष, हे म्हातारे झाले अशी शंकादेखील कुणाला येणार नाही. काळजी माणसाला म्हातारा करते. आता कसली आली आहे काळजी? तेव्हा या मंडळींनी फक्त जाहीर वाढदिवसाचा मोह सोडावा तरी मागण्यासारखे आहे.

अधिकार मुळीच सोडू नये. "प्रासादस्य शिखरे...राजप्रासादाच्या कळसावर बसलेला कावळा हा काही गरुड होत नाही, याबद्दल मुळीच वाईट वाटून न घेता, त्या कावळयाने तिथेच बसणे महत्त्वाचे आहे; एकतर प्रासाद शिखरावरचा कावळा सगळयांना दिसतो आणि त्याला इतरांचे सगळे दिसते. शिवाय त्या ठिकाणी बसण्याकरिता खूप वृद्ध कावळेदेखील टपलेले असतातच! वय झाले तरीही, निवृत्त होण्यात मौज नाही! ◻

**—ग्यानबा**

# एक क्लोज-अप

## अमित बोस



चार-पाच वर्षांपूर्वीची गोष्ट. मुंबईतले पावसाळ्याचे दिवस. दुपारपासून घो—घो पाऊस कोसळत होता. चित्रपट-सृष्टीत संकलक म्हणून नव्यानेच प्रवेश करणाऱ्या माझ्या एका मित्राला महा-लक्ष्मीच्या ' फेमस स्टुडिओ 'त काम होते म्हणून आम्ही दोघे तशा भयानक पावसात तेथे गेलो. त्या वादळापेक्षा आयुष्यातला झंझावात त्या वेळी मोठा होता. एका सिनेमात नायकाचे काम करूनही तो चित्रपट पडल्याने मी नाट-काच्या वाऱ्या करीत फावल्या वेळात मुंबईत चित्रपटासाठी वणवण करीत होतो नि माझा मित्र फिल्म इन्स्टिटयूट-मधून डिप्लोमा घेऊन भव्य-दिव्य कर-ण्याच्या इराद्याने मुंबईत आला होता.

'फेमस'च्या कॉरिडॉरमधून आम्ही जात असतानाच एक शिडशिडीत बांध्याचा तरुण गृहस्थ एकदम थांबला. तंग पँट, शर्ट बेपर्वाईने आत खोवलेला, विस्कटलेले केस, सरळ तरतरीत नाक आणि समोरच्याला कापीत जाणारे विलक्षण तेजस्वी डोळे. मित्राने ओळख करून दिली– "हे अमित बोस. बिमल रॉय यांच्या सुजाता, परख इत्यादी चित्रपटांचे संकलक."

"हॅलो, आप मराठीके डायरेक्टर हैं क्या ?" माझा हात पकडून त्यांनी आपुलकीने विचारले. गृहस्थ सडपातळ दिसला तरी हाताची पकड जबर होती. हुळहुळत हात सोडवून घेतच मी उत्तरलो–" नहीं जी ! ॲक्टर हूँ ! थोडा कुछ लिखता हूँ !"

आणि दुसऱ्याच भेटीत अमितदांच्या एका बंगाली चित्रपटाच्या मराठी–पटकथा-संवादाची जबाबदारी माझ्याकडे चालून आली. मराठी चित्रसृष्टीतल्या माझ्या बार्शी-लाईटच्या प्रगतीने मी अगदी आंबून गेलो होतो. हा नवा बदल मला काही काळ खराच वाटेना. त्या चित्रपटाची मूळ कथा अमितदा रोममध्ये असताना तयार झाली होती. त्या बंगाली चित्रपटाची चार रिळे पुरी होऊन तो चित्रपट तसाच अर्धवट पडला होता, अशोककुमारचे काम असूनही. आणि आता तीच कथा मराठीत करण्याचे घाटत होते.

पटकथा-संवादाचे मराठी काम पुरे झाले, पण त्याला फिलमचा स्पर्श व्हायच्या आतच ते कपाटात जाऊन पडले. असो ! चित्रसृष्टीत हे घडायला अनेक गोष्टी कारणीभूत होतात. पण त्या निर्मितीच्या काळातला आनंद अमोल होता. एका–झंझावाती–झगडणाऱ्या–व्यक्तित्वाची जवळून, खूप जवळून ओळख झाली.

माझे लेखनाचे काम पुरे होत आले होते तेव्हा, अमितदा फिल्म इन्स्टिटयूटमध्ये परीक्षक म्हणून आले होते. संध्याकाळची वेळ. 'प्रभात कंपनी'च्या त्या विख्यात तलावाच्या काठी आम्ही बोलत बसलो होतो. तोपर्यंत अमितदांबद्दल मी खूप काही ऐकले होते. पण अशी गुफ्तगू झाली नव्हती.

त्या वेळी सूर लागला.

"अमितदा, किती वर्षं या चित्रपटधंद्यात आहात तुम्ही ?"

त्या डोळ्यांनी अठरा-वीस वर्षांचा वेध घेतला आणि ते हसून म्हणाले,–" चौदा वर्षांचा होतो तेव्हा मी घर सोडलं. आणि तेव्हापासून स्वतःच्या हिंमतीवर उभा आहे.'

"घर सोडलं ?"

"हां ! शाळेत जात होतो मी तेव्हा ! कलकत्त्याला ! एक दिवस घरात विचारले की, शाळा संपल्यावर तू काय करणार ? मी सांगितलं की, कॉलेजात जाणार आणि नंतर सिनेमा धंद्यात जाणार ! मला नट व्हायचंय ! घरात हा विचार

**अनिल हवालदार**

कुणालाच आवडला नाही. सगळे कट्टर सनातनी. 'चालता हो घराबाहेर' असं फर्मान सुटलं नि मी तडक घराबाहेर पडलो.

"काम शोधीत शोधीत तिथून १७६ मैलांवरच्या माझदिया गावी गेलो. आता ते पाकिस्तानात आहे. तिथल्या शेतावर मजूर म्हणून काम करायला लागलो."

अमितदांच्या हाताची पकड इतकी घट्ट कशी ते मला उमगलं. फिलमवर सफाईने कात्री चालविणाऱ्या त्या हातांनी कोवळ्या वयात कुदळ मारली आहे.

"तिथं सहा महिने काढल्यावर मुंबईत आलो. पहाडी संन्याल यांनी मला आधार दिला. मी शाळेचं शिक्षण पुरं केलं आणि विख्यात बंगाली दिग्दर्शक निमाई घोष यांच्याकडे साहाय्यक दिग्दर्शक म्हणून कामाला लागलो. त्यांच्याबरोबर कलकत्त्याला 'छिन्नो मूल' या चित्रपटाला मी साहाय्यक म्हणून काम केले. रशियात गेलेला हा पहिला भारतीय चित्रपट. एव्हाना नट होण्याची स्वप्नं डोक्यातून गेली होती. सिनेमाचं जवळून दर्शन झाल्यानंतर मी दिग्दर्शक व्हायचा ध्यास घेतला आणि चांगला दिग्दर्शक बनण्यासाठी चांगला संकलक होणे भाग आहे याची मला जाणीव झाली. मी बॉंबे टॉकीजमध्ये दाखल झालो. पण तिथं समाधान होईना. शेवटी मी संकलनाचं पद्धतशीर शिक्षण घेण्याचा निश्चय केला. थोडे पैसे जमवले आणि एक दिवस लंडनमध्ये पाय ठेवला. १९५२ साली."

"लंडनमध्ये चित्रपट व्यवसायात कायदेकानू फार कडक आहेत. तिथल्या असोसिएशनचा सभासद बनल्याशिवाय मला काम करता येईना. या घालमेलीत सहा महिने गेले. दरम्यान मी रॉयल अकादमी ऑफ ड्रॅमॅट्रिक आर्टची चाचणीपरीक्षा दिली. अभिनयाच्या स्पर्धेत चारशे उमेदवारांमध्ये पहिल्या दहांत मी आलो. पण तिथला 'शेव्हिअन थिएटर'चा मामला मनाला पटला नाही, नि मीच प्रवेश घ्यायला नकार दिला. पुन्हा पाईनवूड स्टुडिओच्या वाऱ्या करू लागलो. शेवटी तिथल्या काही लोकांना माझी दया आली नि मी चोरून एडिटिंग शिकू लागलो. दरम्यान चरितार्थासाठी पडतील त्या नोकऱ्या केल्या. Well, it was pretty hard struggle !"

ती संध्याकाळ तिथेच थांबली. त्यांना कुठेतरी जायचे होते. मीही त्यानंतर त्यांच्यापासून दुरावलो. ज्या कामासाठी खूप जवळ आलो होतो ते पैशाअभावी थांबले होते. पुन्हा वाटा वेगळ्या झाल्या होत्या. दरम्यान अमित यांना दिग्दर्शनासाठी 'अभिलाषा'सारखे मोठे चित्र मिळाले. प्रसिद्धीचा खूप धूमधडाका उडाला. चित्रपट रंगीत होता. तब्बल सोळा वर्षांच्या धडपडीनंतर अमितदांना दिग्दर्शनाची संधी मिळाली होती.

पण 'अभिलाषा' चटकन पुरा झाला नाही. चित्रपटसृष्टीतल्या अपरिहार्य अडचणी येतच राहिल्या. दमले–शिणलेले पण तरीही आशावादी बोलणारे अमितदा मधून मधून भेटत होते. जुजबी–औपचारिक गप्पा होत होत्या. अखर

सगळ्या अडचणी ओलांडून 'अभिलाषा' पडद्यावर झळकले. त्याच्या मुंबईतील चुकीच्या रिलीजमुळे हवा तो प्रतिसाद या चित्रपटाला सुरुवातीला मिळाला नाही. पण नंतर मात्र जनमानसाची चांगलीच पकड त्या सिनेमाने घेतली.

—आणि त्यानंतर पुन्हा अमीतदांबरोबर एक चांगली मैफल रंगली ती त्यांच्या चेंबूरच्या फ्लॅटमध्ये.

'अभिलाषा'च्या निर्मितीमधल्या सुखदु:खाची उजळणी झाली. अमितदा सांगू लागले, "या चित्रपटाच्या क्लायमॅक्सला मला सगळी मंडळी एकत्र कधीच मिळाली नाहीत. तिथं मला माझं एडिटिंगचं ज्ञान मदतीला आलं. पिक्चर रिलीज झाल्यावर इतर लोक नंतर शेकडो फूट फिल्म कापतात. मी फक्त वीस फुटांचा एक क्लोज-अप् कापला."

मी बोलण्याचा तेवढाच धागा पकडला. "अमितदा, तुमचा मी घेतलेला एक 'क्लोज-अप्' अर्धाच राहिलाय."

त्यांचा चेहरा गोंधळला. "मेरी कुछ समझ में नहीं आता..."

मी हसलो. पूर्वीच्या तलावाकाठच्या गोष्टींची याद दिली नि म्हटलं—

"आज पुन्हा स्मृतींचा मागोवा घेऊ या. एखादा टप्पा पुरा केल्यावर अशा आठवणी सांगण्यात गंमत असते. तुम्ही लंडनला चोरून शिकल्यावर काय केलंत?"

"अच्छा! तिथंही मनाचं समाधान होईना. दरम्यान विख्यात जलतरणपटू मिहिर सेन यांच्या मदतीनं इंग्रजी भाषेत 'देवदास'चा प्रयोग केला. मी झालो देवदास नि ही चंद्रमुखी!" जवळच उभ्या असलेल्या भाभींकडे—सौ. मोनिका बोस यांच्याकडे—पाहून अमितदा म्हणाले. दोघांच्याही नजरेत त्या वेळच्या 'एकदाच पाहिले'ची पुन्हा एकदा चाहूल दिसली. त्या 'देवदास'चा इंग्रजी अनुवाद त्या वेळच्या मोनिका सेननेच केला होता. या नाटकात आंतरराष्ट्रीय नटवर्ग एकत्र आला होता. प्रयोग खूप गाजला.

"... मग मी इटलीला जायचं ठरवलं. शेवटी मला भारतामध्ये राहून चित्र-निर्मिती करायची होती. वास्तववादी चित्रपट काढायची इच्छा होती. इटलीमधील सामाजिक परिस्थिती—दारिद्र्य, सामाजिक समस्या—आपल्याशी मिळत्याजुळत्या आहेत म्हणून मी इटलीची निवड केली. जायला पैसा पुरेसा नव्हता. जुन्या बाजा-रात शंभर रुपयांना एक मोडकी स्कूटर घेतली. स्वत:च दुरुस्त केली आणि तिच्यावरून पंचवीसशे मैलांचा प्रवास करून मी रोममध्ये दाखल झालो." अमितदांचा हा धाडसी स्वभाव आणि यंत्राशी खुडबुड करण्याची सवय अद्याप कायम आहे.

"इटलीमध्ये सुप्रसिद्ध दिग्दर्शक लुईजी झाम्पा आणि व्हिटोरिओ डी सिका यांच्या हाताखाली साहाय्यक म्हणून काम करायची संधी मला मिळाली. पुढे डी सिकांच्या शिफारशींवरून इटलीच्या सरकारने मला शिष्यवृत्ती दिली व 'सेंत्रो स्पेरिमेंताले दि सिनेमातोग्राफिया' या संस्थेत दिग्दर्शक व संकलकाचा अभ्यास-क्रम पुरा करून डिप्लोमा मिळवला."

उराशी मोठ्या आशा बाळगून अमितदा भारतात परत आले. पण कलकत्त्याच्या स्टुडिओंची दारे त्यांना बंद झाली होती. परदेशी जाऊन 'शहाणं' होऊन आलेल्या या तरुणाला तिथली 'बुजुर्ग' मंडळी जवळ करायला तयार होईनात. निराश होऊन अमितदा परत युरोपला जायला निघणार होते. एवढ्यात 'फिलमस्तान'चे आमंत्रण आले. चित्रपट दहा रिळांपर्यंत अमितदांनी दिग्दर्शित केला. पण पुढे निर्मात्यांशी मतभेद झाले. ते प्रकरण तिथेच थांबले. पुन्हा घोर निराशा !

त्याच वेळी हृषिकेश मुखर्जींनी बिमल रॉय यांची संस्था सोडून स्वतंत्ररीत्या दिग्दर्शनाला सुरुवात केली. त्यांच्या जागेवर अमितदांना संकलक म्हणून बिमल रॉयनी बोलाविले आणि अमितदांची चमकदार कारकीर्द सुरू झाली. सुजाता, परख, उसने कहा था, काबुलीवाला अशा एकापाठोपाठ एक सरस चित्रपटांच्या संकलनाचे श्रेय अमितदांना आहे. त्यांचा पिंड बिमल रॉय 'स्कूल'मध्ये घडल्याची साक्ष 'अभिलाषा'मध्ये अनेक ठिकाणी मिळते. बिमल रॉयना सोडल्यानंतर अमितदांनी 'शेक्सपीअरवाला' हा गाजलेला आंतरराष्ट्रीय चित्रपट संकलित केला.

दरम्यान स्वतंत्ररीत्या दिग्दर्शक व्हायची धडपड चालूच होती. कथा चांगल्या असल्या तरच संकलनाचे काम ते हाती घेत होते. १९६३ मध्ये 'चिल्ड्रेन फिल्म सोसायटी'साठी त्यांनी 'पाँच पुतलियाँ' हा मुलांसाठी चित्रपट निर्माण केला. त्याला १९६३ चे राष्ट्रपतिपदक मिळाले.

आणि त्यानंतर दोन वर्षांच्या पर्वतप्राय प्रयत्नांनंतर अमितदांचा 'अभिलाषा' हा पहिला–वहिला दिग्दर्शित चित्रपट पडद्यावर झळकला. अर्धी चित्रपटसृष्टी त्यांना 'मॅड' म्हणते–अर्धी 'जीनियस' म्हणते. त्यांना त्या कशाचीच क्षिती नाही. आपल्या कृतीशी ते प्रामाणिक आहेत. अनेक नव्या नव्या कल्पना त्यांच्या डोक्यात सतत आकार घेत आहेत. चांगल्या अभिरुचीचेच चित्रपट निर्माण करण्याचा त्यांचा निर्धार आहे. चाळीशीच्या अलीकडच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या या दिग्दर्शकाला चित्रपटातील तरुण नवागतांबद्दल विलक्षण प्रेम आहे–जिव्हाळा आहे. स्वतः उत्कृष्ट संकलक असूनही 'अभिलाषा'चे संकलन त्यांनी आपल्या तरुण साहाय्यकाला–जयंत अधिकारी नामक मराठी माणसाला–स्वतःहून दिले. त्याच्या संकलनाची खूप तारीफ केली. त्याला 'संपूर्ण एडिटर' बनवले. वेळ येताच ताबडतोब संधी दिली.

निरोपाच्या वेळी ते म्हणाले–" अनिल, मला आपला मराठी सिनेमा करायचाय. मी आशावादी आहे. माझ्या जीवनाच्या झगड्यातून मी आशावादी बनलोय. 'It's true, life is unhappy and full of struggles. But we can make it happy if we mean it.' पराभव पत्करणं हा माझा धर्म नाही. मी निराश कधीच नाही. आजच्यापेक्षा उद्याचा दिवस नक्की चांगला उजाडेल अशी मला खात्री आहे." ○



# पाळण्याला सुटी

राम आता तीन वर्षांचा झाला आहे. जन्मापासून पाळणा त्याचा जोडीदार होता. पण आपण आता मोठे झालो आहोत असं रामूला वाटतं. झोके देणारा, झोप आणणारा पाळणा आता त्याला नको वाटतो. म्हणून पाळण्याला सुटी मिळाली आहे. आता तो पाळण्याचा उपयोग खेळणी, चित्रे वगैरे ठेवण्याकडे करीत असतो. आई ते कौतुकाने पाहते. रामू खुषीत आहे. आईलाही समाधान आहे. "आपण पाळण्याला सुटी दिली हे किती चांगलं झालं ?" रामूचे वडील तशाच समाधानाने पत्नीला सांगतात. होय; त्यांनी फार चांगली गोष्ट केली.

**शहाणे आईबाप**

आता आपलं कुटुंब मर्यादित ठेवतात. मुले कमी होऊ देणे एवढेच कुटुंब नियोजनाचे उद्दिष्ट नाही. पाहिजेत तितकीच व पाहिजेत तेव्हाच मुले होऊ देणे त्यामुळे साध्य होऊ शकते. अपत्यजन्म ही आता योगायोगाची किंवा नशीबाची गोष्ट नाही; ती तुमच्या हातांतील गोष्ट आहे. असे संसारसुख प्राप्त होण्याचे कारण—

**कुटुंब नियोजन.**

मोफत सल्ला मिळण्यासाठी नजीकच्या कुटुंब नियोजन केंद्राला भेट द्या.





davp 68/442

# रशियन ट्रॅक्टरचे प्रकरण

गेल्या दोन वर्षांतील समाधानकारक पीकपाणी, धान्याचे किफायतशीर भाव व भूविकास बँका व व्यापारी बँका यांजकडून मिळणारे सढळ कर्ज यांमुळे शेती अवजारांची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. या मागणीपैकी शेतकऱ्याची स्वत:ची ऐपत व शेतीविषयक गरज यातून निर्माण झालेली मागणी कोणती व केवळ आज सढळ कर्जपुरवठा होत आहे म्हणून निर्माण झालेली मागणी कोणती हे ठरविणे अर्थातच कठीण आहे. पण जास्त कर्जपुरवठा होण्याच्या शक्यतेमुळेच ही मागणी वाढली आहे असे मानण्याकडे शेती अवजार उत्पादकांचा कल आहे.

उदाहरणार्थ, १९६७–६८ सालात ट्रॅक्टरची मागणी २५,००० नगांची होती व १९६८–६९ सालात ही मागणी ३०,००० नगांची होती; असे औद्योगिक विकास खात्याचे केंद्रीय मंत्री श्री. फक्रुद्दीन अली अहमद यांनी गेल्या १२ फेब्रुवारीला संसदेत जाहीर केले होते. आता दहा महिन्यांनंतर सरकारी अंदाजानुसार, या वर्षी ६५ हजार ट्रॅक्टर्सला मागणी येईल असे सांगितले जात आहे. व्यापारी बँकांनी शेतीस कर्जपुरवठा करण्यास सुरुवात केल्यामुळेच ही वाढ झाली आहे हे उघड आहे.

अशा कृत्रिम मागणीवर विसंबून ट्रॅक्टर उत्पादनात वाढ करण्यास ट्रॅक्टर उत्पादकांचा विरोध आहे. कृत्रिम मागणी म्हणण्याची कारणे दोन. भारतीय शेतकऱ्यांपैकी ३० टक्के शेतकऱ्यांजवळ एकच बैल आहे किंवा तोही नाही. त्यामुळे भारतीय शेतीच्या यांत्रिकीकरणास फार मोठी मर्यादा आहे. एक–दोन एकर रान असलेला व स्वत:चा बैलही नसलेला शेतकरी नजीकच्या काळात, कर्ज मिळाले तरी २० हजार रु. किंमतीचा ट्रॅक्टर खरेदी करू शकेल असा संभव नाही.

दुसरे म्हणजे व्यापारी बँकांच्या शेतीकर्जाचा ओघ कायम राहील, वाढता राहील व बिनऐपतदार शेतकऱ्यांसही त्यांची कर्जे मिळतील असा भरंवसा नाही. बागायती शेती असलेल्या शेतकऱ्याचे ट्रॅक्टर विकत घेऊन झाले की व्यापारी बँकांच्या कर्जाचा ओघ दुसऱ्या कारणाकडे वळेल असा संभव आहे. त्याच्या जोडीलाच व्यापारी बँकांच्या आर्थिक स्थितीचाही चढउतार ध्यानात घ्यावयास हवा. त्यांच्याकडील ठेवींचे प्रमाण गेली एक–दोन वर्षे घटत्या प्रमाणावर वाढत असल्याने, यापुढे त्यांच्या कर्जव्यवहारावर त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे.

सध्या देशात ट्रॅक्टर उत्पादन करणारे पाच कारखाने आहेत व त्यांत एकंदर

(२५ ते ५० हॉर्सपॉवरचे) १५००० ट्रॅक्टर्स दरवर्षी तयार होतात. या उत्पादकांचे म्हणणे असे की वाढीव मागणी पुरी करण्यासाठी या उत्पादकांना उत्तेजन देणे जरूर आहे. जर अवश्यक ती मदत व भांडवलपुरवठा झाला तर याच कारखान्यांतून दरवर्षी ४५००० ट्रॅक्टर्स निर्माण होऊ शकतील. टॅरिफ कमिशनने आपल्या अहवालात असे स्पष्टपणे नमूद केले आहे की या पाच कारखान्यांपैकी एकही कारखाना आवश्यक अशा आर्थिक प्रमाणावर उत्पादन करू शकत नाही. या कारखान्यांचे उत्पादन व व्यवहार आर्थिक दृष्ट्या किफायतशीर अशा पातळीवर येईपर्यंत ट्रॅक्टरच्या नवीन कारखान्यास परवाना देण्यात येऊ नये.

ही शिफारस जवळजवळ धाब्यावर बसवून सरकारने नुकताच असा निर्णय घेतला आहे की १४ हॉर्स पॉवरचे रशियन बनावटीचे ट्रॅक्टर्स तयार करण्यासाठी खाजगी क्षेत्रात एक नवा कारखाना काढण्यास परवाना द्यावा. या कारखान्यात वर्षाला १० हजार ट्रॅक्टर्स तयार होणार असून, त्यामध्ये १० कोटी रु. गुंतविले जाणार आहेत. या ट्रॅक्टरची किंमत सध्या १३,००० रु. ठेवण्यात येणार आहे. परंतु वर्षाच्या काळामध्ये या ट्रॅक्टरची ७५ टक्के घडण भारतीय मालामधून करण्याची अट असल्याने ही किंमत वर्षानंतर सुमारे १६ हजार रु. होईल असा अंदाज आहे. आज देशातील एक ट्रॅक्टर कारखाना २५ हॉर्स पॉवरचा ट्रॅक्टर १२,४९० रु. ला विकू शकतो.

या कारखान्यावर सर्वांत महत्त्वाचा आक्षेप म्हणजे रशियन ट्रॅक्टर्सचे सुटे भाग विशिष्ट बनावटीचे असून ते तयार करणारे पूरक कारखाने आपल्याकडे नाहीत. आपल्याकडील ट्रॅक्टरचे सुटे भाग जागतिक दर्जामानाप्रमाणे बनविले जातात पण ते रशियन ट्रॅक्टर्सला चालणार नाहीत. त्यामुळे हे सुटे भाग आपणाला फार काळपर्यंत रशियातूनच आयात करावे लागतील. या सर्व प्रकरणांत काही महत्त्वाचे मुद्दे उपस्थित होतात ते असे :(१) तात्कालिक मागणीमुळे भारून जाऊन उत्पादन क्षेत्रात दूरगामी बदल करावेत काय? (२) देशामधील कारखानदारीस उत्तेजन न देता, रशियन सहकार्याने नवीन ट्रॅक्टर कारखाना काढण्याची जरुरी आहे काय? (३) ज्या ट्रॅक्टरचे सुटे भाग दीर्घकाळपर्यंत आयात करावे लागतील अशा ट्रॅक्टरच्या साहाय्याने खरेखुरे स्वावलंबन होईल काय? (४) जेथे अत्यावश्यक नसेल तेथे परकी सहकार्य घेण्याची गरज नाही हे धोरण या बाबत मुद्दाम बदलले का जात आहे?

संबंधितांना न विचारता नवीन उत्पादनशक्ती वाढवणे, सढळ आयात परवाने देणे व अस्तित्वातील कारखान्यांकडे दुर्लक्ष करणे या धोरणाचे परिणाम औद्योगिक क्षेत्रावर अगोदरच फार अनिष्ट झाले आहेत. ते कमी होण्याची चिन्हे दिसत नाहीत असेच या ट्रॅक्टर प्रकरणावरून दिसते.

– चंद्रशेखर मराठे

# पोल्ट्री आणि विहीर : एक नवलकथा

व्यं. न. कुलकर्णी

त्याचं असं झालं !

मी हा असा जर्मनी, युरोपात पुष्कळ वर्षे राहून स्वदेशी परत आलो. परदेशी असताना मी, भारतातल्या समाज–कल्याण योजनेसंबंधी अनेक सचित्र सरकारी पुस्तिका वाचल्या होत्या. त्यांच्या आधारानं मी अनेक जर्मन वृत्तपत्रांत लेख प्रसिद्ध केले होते, व्याख्यानेही दिली होती.

माझ्या परदेशीय वाचकांना आणि श्रोत्यांना मी ठणकावून बजावत होतो,

"भारतात आता जर्रा कमी स्वर्गच उतरू घातला आहे. प्रत्येक खेड्याला पिण्याच्या पाण्याची विहीर आहे, शाळा आहे, समाज-मंदिर आहे, स्त्रियांकरिता शिवण-टिपण वर्ग आहेत, आरोग्य-केंद्रे आहेत, तिथं सुशिक्षित परिचारिका आहेत. बी-बियाणाविणं शेतकऱ्यांचं नडलं ? अवजाराविणं अडलं ? उत्तम खत मिळत नाही ? गायीला उत्तम खोंड व्हायला हवा ? बोलवा बीडीओला ! त्यानं तुमचे प्रश्न चुटकीसरशी सोडविलेच म्हणून समजावं ! द्राक्षाचे मळे लावणार ? पोल्ट्री काढणार ? गावात शौचकूप नाहीत ? बीडीओला लिहा ! त्याची जीप खडखडत आलीच म्हणून समजावं..."

असं पुष्कळपुष्कळ मी लिहीत असे, घसा दुखेपर्यंत ओरडून सांगत असे.

आधार ? केंद्र सरकारच्या आणि राज्य सरकारांच्या गुळगुळीत कागदावर छापलेल्या सचित्र पुस्तिका ! चित्रं तरी अशी बोलकी म्हणता !

समाजमंदिरात शेतकरी रेडिओ ऐकत आहेत, झाडाखाली 'गमभन'चा वर्ग चालू आहे, भरल्या पिकाच्या पार्श्वभूमीवर गुबगुबीत चेहऱ्याचा शेतकरी आणि त्याच्या शेजारी त्याची कारभारीण ! विहिरीचं पाणी काढणारी ती धनुष्याकृती भिवयांची ग्रामरमणी अन् ! आहाहा !

आता या साऱ्या साहित्यावर विश्वास न ठेवून कसं चालेल ? प्रत्येक पुस्तिकेवर 'सत्यमेव जयते' अशी, 'खरंच सांगेन, खोटं सांगणार नाही' या अर्थाची शपथही घेतलेली असायची आमच्या सरकारांनी !

तात्पर्य काय, तर परदेशी असताना मी या समाज–कल्याण योजनांनी अगदी भारावून गेलो होतो. भारतात परत गेल्यानंतर प्रथम या योजना स्वतः डोळ्यांनी पाहून पावन व्हायचंच असा मी निर्धार केला होता !

अन् म्हणूनच मी मायलाभूमी परत आल्यानंतर दोन–तीन वर्षे खेड्यात राहून खेडीच धुंडाळीत होतो अन् समाज–कल्याण योजनांची अंमलबजावणी कशी काय होते, ते पाहत होतो. एके ठिकाणी...

## गुंडू पाटलांची पोल्ट्री

विहिरीच्या खोदकामाला प्रारंभ व्हायचा होता. पहिली कुदळ मारली जायची होती आज. कुणीतरी बडे काँग्रेस पुढारी या कुदळकामाला येणार होते. मंत्रीदेखील ज्यांच्या तंत्रानं वागत असतात, असा महान् नेता होता तो. जिल्ह्याच्या सर्किट हाऊसवरून ते मोटारीनं येणार होते. सकाळी नऊ वाजता समारंभ होता.

बीडीओंच्या जीपमधून मी सकाळी लवकरच निघालो. आम्ही एका फोटोग्राफर-लाही बरोबर घेतलं. हारतुरे, मिठाई वगैरे खरेदीही केली.

आठ वाजता त्या खेड्यात पोचलो आम्ही. बीडीओ मला म्हणाले, "तुम्ही समाजमंदिरात बसा थोडा वेळ. मी बाकीची पूर्वतयारी करून येतो. हे ग्रामसेवक तुम्हांला पुष्कळ माहिती देतील ! अन् या परिचारिका मिस् मुंगळाबाई..."

बांबू आणि तट्ट्यांनी उभारलेल्या समोरच्या इंद्रविलास महाल हॉटेलातून ग्राम-सेवकानं तीन 'च्या' आणवले व तो मी फुटक्या कपातून डोळे मिटून ढोसला.

"या आमच्या मुंगळाबाई तुम्हांला खूप मजा सांगतील, बरं का ! मी जरा बी. डी. ओ.ला मदत करायला जातो !" ग्रामसेवक निघून गेला.

हॉटेलचा पोऱ्या येऊन उभा राहिला.

"हे पैसं त्या ×× कडनं घे. माझ्या डिपार्टमेंटशी त्याचा काय संबंध नाय् !" मुंगळाबाई त्याच्यावर खेकसल्या. माझ्याकडे पाहत त्या म्हणाल्या, "ह्यो ग्रामसेवक सद्दा असंच करतुया बगा ! अन् त्याला काय पैशाला धाड आलीया ? परवा गुंडू पाटलाला पोल्ट्रीच्या सुधारणेसाठी ह्या ग्रामसेवकानं आन् बीडीओनं संगनमत करून तीन हज्जाराची मदत दिली. त्यातले निम्मे पैसे हे दोघंच हडप करून बसलेच, म्हणून गुंडू ठणाणा करतोय् ! ए च्यावाल्या, मागनं पैसं घेऊन जा ग्रामसेवका-पासनं !...तर तुम्ही काय जर्मणीत व्हता म्हनं–तिकडं असल्या समाज–कल्याण योजना हैत काय वो ?"

"छट् ! हे आपलंच एकमेव वैशिष्टच आहे !"

च्यावाल्या पोराकडे एक रुपयाची नोट टाकून मी बाईला विचारलं, "पाटलांची पोल्ट्री ठीक चाललीय् मग ?"

एवढ्यात दोन-चार मंडळी आली.

"इच्यारा यानला ! काय वो गावकरी मंडळी, गुंडू पाटलाची पोल्ट्री कशी काय चाललीय् ?"

"व्येस ! आत्ताच नवा बोर्ड टांगलाय् पाटलानं. ऐका पोल्ट्रीचं नाव : नव-कुक्कुट वर्धन आणि संशोधन संस्था !" एकजण म्हणाला.

" अरे वा ! बघायलाच पाहिजे ही संस्था !" मी म्हणालो.

" काय बघणार साहेब तुम्ही तिथं ? पाटलाच्या घरी सदाच आठदहा कोंबड्या असतात ! तिथंच बोर्ड लावलाय् झालं. अशीच बनवाबनवी करून बीडीओकडनं पैसे लाटलेत. पुढच्या महिन्यात मंत्र्याच्या हस्ते उद्‌घाटन करणार म्हणतोय गुंडू पाटील. मंत्री आले म्हणजे मग आमच्या मुंगळाबाईंची अगदी चैन !" एक खादी टोपीवाला म्हणाला.

" का रे मेल्या ! रिपोर्ट करीन हं वरती तुझ्याविरुद्ध !" मुंगळाबाई लटक्या रागानं ओरडल्या, " समाज मंदिर बांधायच्या कंत्राटात किती पैसे खाल्लेस तू ? काय गावाला माहीत नाही हे ? अन् आतापासनंच भिंतींचा गिलावा ढासळायला लागलाय्. बालकमंदिराची खोली तर पहिल्या पावसातच ढासळून गेलीय्..."

" जाऊ द्या बाई !" सारी मंडळी खो खो हसू लागली.

मला मोठी मौज वाटली.

खेड्यातली ही मंडळी आडपडदा न ठेवता सारं काही उघडउघड बोलत होती. मी तरीही म्हटलंच,

" मंडळी, रागावू नका ! तुम्ही इतक्या मोकळेपणानं या साऱ्या भानगडी बोलता. कुणीतरी उद्या सरकारकडे चुगली केली तर ?"

माझ्या प्रश्नामुळं मुंगळाबाईला हसू आवरेना. इतर मंडळीही माझ्या अज्ञानाबद्दल कीव दाखविणारा मिस्किल चेहरा लपवू लागली.

खादी टोपीवाला म्हणाला,

" साहेब, तुमचे जर्मनीसंबंधीचे लेख वाचलेत आम्ही. पण आमच्या खेड्यापाड्यातला कारभार तुम्हांला कळायला अवघड जाईल. आम्ही करतो त्या गोष्टी सरकारला माहीत नसतात असं कुणी सांगितलं तुम्हांला ? अहो, पुष्कळशा गोष्टी तर सरकारी अधिकारीच आम्हांला शिकवितात...हो हो, मंत्रीदेखील. नाहीतर गुंडू पाटलाच्या खुराड्याला पोल्ट्री हे नाव मिळून त्यासंबंधीचं वेगळं फाईल बीडीओच्या कचेरीत कसं निघालं असतं ? आता आजच्या विहिरीचीच गोष्ट घ्या !"

## जुन्याचे नवे

नऊ वाजता सुरू होणारा कार्यक्रम अकराला एकदाचा सुरू झाला. मुंगळाबाईच्या पाठोपाठ मी भर उन्हात अर्धा मैल चालतच त्या जागी पोचलो. मला पाहून बीडीओ ड्रायव्हरवर खेकसले, " सायबांना आणायला गेला नव्हतास होय रे ? साहेब, माफ करा हं. तुम्हांला चालावं लागलं !" मुंगळाबाईची खास वेगळी माफी मागितली त्यांनी !

कार्यक्रम सुरू झाला.

तीन पुरुष खोल विहिरीत आम्ही पंधरावीस महत्त्वाची मंडळी उतरलो. तिथं

पुढारीमहाशयांनी एक कुदळ मारली. झाला समारंभ!

वर विहीरीच्या भोवती सारा गाव लोटला होता. सारी मंडळी दिलखुलास हसत होती.

वाचकहो, तुम्ही मात्र गोंधळात पडला असाल म्हणून हा खुलासा :

त्या खेड्यात ही विहीर कधीपासूनच होती. पण तिच्यात गली पंचवीस-तीस वर्षे गाळ साठून राहिला होता.

पण बीडीओनं योजना काढली होती नि गावच्या पुढाऱ्यांनी मान्य केली होती.

गावानं ' नव्या ' विहिरीकरिता तीन हजार रुपये जमवावे. बीडीओची कचेरी तीन हजार रुपये देईल. सहा हजार रुपयात नवी विहीर तयार होईल.

झाले किती ? एकंदर सहा हजार रुपये !

विहिरीचा गाळ काढायला किती खर्च येईल ? जास्तीत जास्त सातआठशे रुपय !

उरलेला पैसा गावच्या पुढाऱ्यांनी नि अधिकाऱ्यांनी लंपास करायचा.

गावातला कुणी प्रामाणिक माणूस या योजनेविरुद्ध लिहील, बोलेल म्हणता ?

तसं होणार नाही. तसं घडत नसतं !

कारण त्या प्रामाणिक माणसाला पुढाऱ्यांचा इंगा म्हणजे काय, याची कल्पना असते. त्याला त्याच गावात आणखी काही वर्षे जगायचं असतं !

सरकारदरबारी नवी विहीर खोदायला प्रारंभ झाल्याची अधिकृत नोंद बीडीओनं केली.

मुंगळाबाईसह आम्ही जीपमधून परत निघालो.

" तुम्ही युरोपियन पेपरात आमच्या समाजकल्याण योजनांसंबंधी पुष्कळ लिहिता म्हणे ! आज प्रत्यक्ष एका खेड्यात येऊन आमचं कार्य कसं चाललं आहे हे तुम्ही पाहिलंत याचा मला मनापासून आनंद वाटतो. आता जनता जागृत झाली आहे, तिला स्वतःची प्रगती करून घ्यायची आहे, अज्ञानाचं पटल दूर करायचं आहे, आमच्या योजनांचं महत्त्व तिला पटलं आहे..."

बीडीओंनी व्याख्यानाची तबकडीच लावली माझ्यापुढं !

आम्ही गावात पोचलो तेव्हा बीडीओ आपल्या कचेरीशी उतरले नि ड्रायव्हरला म्हणाले, " सायबांना घरी पोचव ! बरं का साहेब, पुढचा लेख सचित्र करून पाठवा जर्मनीला. विहिरीच्या उद्घाटनासंबंधीचे दोनचार फोटो मी दोन दिवसांत आपणाकडे पाठवितोच !"

मी केविलवाणेपणानं मान हलविली.

O


# डॉक्टर

सौ. मुक्ता केणेकर

मधल्या सुटीची घंटा जशी साडेनवाच्या ठोक्याची वाट बघते तशी पाटी-पुस्तकात नि वर्गावर्गाच्या पिंजऱ्यात कोंडलेली चिमणीपाखरं शाळेबाहेर कुणाची तरी वाट बघत असतात. ते नेहमी आधीपासून तिथे उभेच असतात. हा नेम कधी चुकत नाही. अगदी अपवाद म्हणून कधी ती वेळ चुकलीच तर साऱ्या बाळगोपाळांत एक अधीर चुळबुळ सुरू होते. सगळे ठराविक दिशेकडे माना उंचावून वाट बघत उभे राहतात. ते येताना दिसले, की चिमण्या, चिमण्या टाळ्या पिटीत सारे ओरडतात, 'डॉक्टर आले, डॉक्टर आले!'

डोक्यावर एक उंचशी खादी टोपी, डोळ्याला चष्मा, अंगावर जुनापुराणा कोट, खाली मळकट धोतर, नाहीतर पॅन्ट आणि खांद्यावर झोळी अशा थाटात डॉक्टर महाशय डुलत डुलत यायचा अवकाश, की सारी मंडळी त्यांना घेरून झोंबतात. त्या सर्वांना हळुवार बाजूला सारीत एकेकाला जवळ घेत त्याच्या हातावर आपली मूठ धरत ते म्हणतात, " हं म्हणा. रामा! मी औषध तू डॉक्टर, मी घर, तू मालक, मी यंत्र तू चालक. चालवशील तसा चालेन. सांगशील तसा वागेन. म्हणा. श्रीराम जयराम जयजयराम. हं. हसा. असे नाही. चांगले मनापासून." नि तो हसला की ती मूठ त्याच्या चिमुकल्या हातावर रिकामी होते. मग दुसऱ्याची पाळी. काय असतं त्या मुठीत ? तर बारीक बारीक गोळ्या. चिमणचारा !

हे असे कित्येक वर्षे चालू आहे. शिशूंचे बाल झाले, बालांचे किशोर नि किशोरांचे



युवक झाले आहेत. तळ्यातला मासा समुद्रात जावा, त्याप्रमाणे पुढच्या शिक्षणासाठी हे युवक शहरोशहरी गेले आहेत, तर डॉक्टर, त्या गोळ्या, ती वेळ आणि भोवती गोपाळांची दाटी, हे नाटक चालू आहे. त्यात काही खंड नाही. ऊन असो की पाऊस, डॉक्टर येणारच. गावात दोनाच्या चार शाळा झाल्या आहेत. डॉक्टर वेगवेगळ्या वेळी चहूकडे आहेतच. गावात येणारा पाहुणा या नवलाईने उभा राहतो. पण इतरांना ते नेहमीचे दृश्य आहे !

बरे, डॉक्टर म्हणजे नुसते नावाचेच डॉक्टर नाहीत. त्यांच्या घरावर आजही पाटी आहे. ' डॉक्टर भास्कर रामचन्द्र उपाध्ये. एम्. बी. बी. एस्. ' दवाखानासुद्धा भर बाजारपेठेत आहे. पण डॉक्टर असे दिवसभर बाहेर व्हिजिट देत असल्यामुळे तो नेहमी बंद असतो. त्या बंद दारामागे, टेबल आहे, खुर्ची आहे, बाटल्या आहेत, कपाटे आहेत. सारे काही आहे. पण एकूण त्या दवाखान्यात एक पाटी सोडली तर दवाही नाही आणि खानाही नाही.

पण खरोखर एके काळी ते सारे डॉक्टरी वैभव तिथे होते. पेशंटांची गर्दी होती. खेड्यापाड्यांनी गाड्या रुग्णाइतांना घेऊन त्या दारासमोर उभ्या राहत. सकाळी आठ ते रात्री अकरा वाजले तरी ही रीघ थांबत नसे. डॉक्टरांना जेवायलाही फुरसत नसे. डॉक्टरांचा हातगुण हा गावात आणि आजूबाजूच्या पंचक्रोशीत प्रसिद्ध होता.

डॉक्टरांचे घराणेच या बाबतीत अत्यंत नावाजलेले होते. त्यांच्या आजोबा-पणजोबांचे नाव आता गावाला आठवत नसले तरी वडील मात्र धन्वंतरी म्हणून प्रख्यात होते. अचूक नाडीपरीक्षा, नेमके निदान आणि योग्य औषधयोजना यांत त्यांचा हातखंडा असे. पथ्यपाणी, आहार या बाबतींत कडक असत. दाट भुवयांमध्ये शेंदरी टिळा आणि तुळतुळीत मस्तकामागे भली मोठी गाठ मारलेली शेंडी, अंगावर पांढऱ्याशुभ्र पेहरावाबरोबरच सुरेख काश्मिरी शाल. रोग्याच्या हाती पुडी ठेवताना म्हणायचे, " रामभद्राय मंगलम् " आणि त्याला पुडी घेताना सांगायचे, " ' श्रीराम जयराम जयजयराम ' म्हणायचं. विसरायचं नाही. " रोगी या व्यक्तिमत्त्वानेच दिपून जायचा त्याचा निम्मा रोग पळून जायचा. डॉक्टरांमध्येही तो रुबाब परंपरेने आला होता.

रोगी दुखण्याचे पाल्हाळ लावायला लागला की, " थोडक्यात सांगा. " अशी जरब डॉक्टर द्यायचे. " हं, काय प्रगती आहे ?" हा डॉक्टरांचा ठराविक प्रश्न. कुणी ' ठीक आहे ' म्हटले तर बरे. नाहीतर औषध मिळायचे नाही. दिलेले औषध अत्यंत योग्य आहे, अचूक आहे, अशी त्यांची खात्री असे. प्रगतीही झालीच पाहिजे, असा त्यांचा विश्वास असे.

त्या रुबाबाचे आणखीही एक कारण होते. त्या वेळी गावात म्हणण्यासारखी सडक एकच. चौकही एकच तसे डॉक्टरही एकुलते एक होते. नाही म्हणायला सरकारी दवाखाना होता. तोही तिथे एक सरकारी डॉक्टर तग धरून होता म्हणूनच.

पण हा डॉक्टर गावाचा होता. गावाच्या रक्तानात्याचा होता. तिथल्या मातीत खेळत, पाण्यात डुंबत, गावंढळ मुलांमधून तो डॉक्टर होऊन आला होता. म्हणून गावाचा साहजिक ओढा त्याच्याकडेच होता. कुठे काही खुट्ट झाले तरी ते भास्कर डॉक्टरच्या दवाखान्यात येत असे. गावात डॉक्टरशिवाय कुठणाही प्रसंग म्हणजे पडद्याशिवाय नाटक किंवा बिनमिठाचा स्वयंपाक !

कितीतरी कठीण प्रसंगांत डॉक्टरांनी गावाला साथ दिली होती. मदत केली होती. कित्येकांना जिवावरच्या दुखण्यांतून वाचवले होते. तापसराईत तर डॉक्टर गावाला अगदी देवदूतासारखा वाटला होता. स्वतःच्या जिवापलीकडे त्याने केलेले श्रम गावाला विसरता येत नव्हते. आता गाव त्याला साध्या एकेरी भास्कराऐवजी ' दादा ' म्हणत होते. दादाही गावाची आशा होती. विसाव्याचे ते एकमेव ठिकाण होते.

एक दिवस सकाळी डॉक्टरांनी दवाखाना उघडताच पायरीवर वाट बघत असलेल्या राधामावशी आत शिरल्या. भेदरलेल्या, घाबरलेल्या. डॉक्टर शांतपणे टेबलावरची विसकटलेली मांडामांड करू लागले. एक सुगंधी उदबत्ती पेटली गेली. रामाच्या, धन्वंतरीच्या तसबिरीभोवती फिरून टेबलावरच्या पितळी सोंगटीत रोवली गेली आणि डॉक्टर स्थानापन्न झाले.

" हं ! काय राधामावशी काय खबर आहे ?"

राधामावशी जणू डॉक्टरांच्या विचारण्याचीच वाट बघत होत्या.

"दादा! अगदी अवघड प्रसंगात सापडलेय बघा मी." राधामावशीच्या डोळ्यांत टचकन् पाणी आले.

"काय झालं? सरूला बरं नाही की काय?"

राधामावशींच्या डोळ्यांतले पाणी खळेना. त्यांनी डोळ्याशी पदर लावून घेतला. डॉक्टर गोंधळात पडले. कुणाचे कसेही आजारपण असले तरी दवाखान्यात त्याला आश्वासन मिळत असे. पण ही बाई नुसतीच रडते आहे. त्यांनी हळुवारपण विचारले, "हे काय मावशी! तुम्ही बोलल्याशिवाय काय कळणार मला. सांगा पाहू काय झालं ते."

"दादा, काय सांगू हो. सरूने पार वाटोळं केलं. आठच दिवसांपूर्वी सोयर संबंध जुळून आला. गंधाक्षत झाली."

"हो हो. मी होतोच ना आणि गावातले सगळेच मानकरी होते."

"सगळं सोन्यासारखं झालं दादा. पण आता ते सरूला मंजूर नाही."

"का?"

"भगवंताची विच्छा."

"काय म्हणतेय काय ती?"

"बाबूच्या नादी लागलीय पोरटी."

"बाबूच्या?" डॉक्टर काहीसे ओरडलेच.

बाबू हे प्रकरण गावाला मलतेच होते. पोलीस पाटलाचा 'साला' होता तो. त्याच्या गावात रंगढंग केले म्हणून गावाच्या दडपणाने आईबापांनी त्याला हुसकावून लावल्यावर तो इथे बहिणीकडे येऊन राहिला होता. इथेही त्याचे तेच धंदे चालू होते. कामधंदा काही न करता नुसते या गल्लीतून त्या गल्लीत, या दुकानावरून त्या दुकानावर कावळ्यासारखे करायचे आणि येणाऱ्या जाणाऱ्या तरण्याताठ्या पोरीबाळींवर गिधाडासारखी दृष्टी ठेवायची. दुकानदार ओशाळा व्हायचा. पण तोपर्यंत अत्यंत इरसाल लावणीचा तुकडा बाबूच्या तोंडून निघून जायचा. पोलीसपाटलाच्या भीतीने कुणी काही बोलायलाही धजायचे नाही. आणि कळून सवरून पाटील बायकोच्या धाकाने गप्प बसून राहायचा. पण हा ऐतोबा मात्र वहिणीच्या ऐश्वर्यावर लोळत गावाला हैराण करत होता. त्याच्या नादी लागली होती सरू. राधीची लेक!

डॉक्टर चरफडले. राधीला सांगून त्यांनी सरूला बोलावणे पाठवले. ती आली नाही, तरी डॉक्टर ऐकणार नव्हते. एका सकाळी अचानक त्यांची बॅग अडकवलेली सायकल राधामावशींच्या घराजवळ येऊन थांबली. शेजारपाजारचे लोक आश्चर्य करायच्या आधीच डॉक्टर बॅग घेऊन आत शिरलेदेखील. राधीलाही कल्पना नव्हती.

"कुठं आहे सरू?"

आणि इतका वेळ झोपून राहिलेली सरू खालच्या मानेने दादांपुढे हजर झाली ड ॅाक्टरी जरब न दाखवता त्यांनी अत्यंत मायाळू आवाजात तिची सारी विचार पूस केली. तिला साऱ्या अनर्थाची कल्पना दिली, पण सरू एकदम गप्प बसून राहिली.

"सरू गप्प बसून भागायचं नाही. गावात चार ठिकाणी झालंय. माणसातून उठायचंय का तुला ?"

तरी सरू गप्पच.

"लहान आहेस तू अजून. तुला खरंखोटं, बरंवाईट कळत नाही म्हणून वडिलकीच्या नात्यानं चार गोष्टी सांगायला आलो. बोल, तुझं काय म्हणणं आहे ?"

तरी सरू बोलली नाही.

"ठीक आहे. राधामावशी, तुमचं चालू द्या. पोर शहाणी आहे. माझ्या शब्दाच्या बाहेर नाही जायची ती."

"काय गं ; म्हन की गधडे होय नाही म्हनून. यवढा मोठा मानूस तुझ्याशी बोलतोय तर नुसती बसलीय म्हशीच्या शेनासारखी."

तरी सरूने वर मान केली नाही.

डॉक्टरांना शंका आली. ते झटकन् उठले आणि तिच्या पुढ्यात जाऊन म्हणाले, "बघू तुझा हात."

तिची नाडी हातात होती. आणि डोळे सांगत होते की प्रकरण घरातून वेशीपर्यंत गेलं आहे.

"मावशी, जरा पाणी गरम करा."

मावशी निघून गेल्यावर डॉक्टर कमालीच्या कळवळ्याने तिला म्हणाले, "सरू, काय करून बसलीस हे ! तरीही हरकत नाही. ह्याही प्रसंगातून मी तुला सोडवीन. अजून वेळ गेली नाही. तू फक्त हो म्हण."

तरीही सरू हो म्हणाली नाही.

डॉक्टर रागाने-विशादाने दवाखान्यात गेले.

यानंतर सरूने मात्र आठवड्याच्या आतच मावशींना एकटे टाकून गावातल्या गावात दुसरे बिऱ्हाड केले. बाबूच्या जिवावर. लग्नाकार्याशिवाय. बाबूसारख्या चार चटोर चहाटळ माणसांची वर्दळ होत राहील असे बिऱ्हाड.

कधी कुणापुढे वाकणे हे डॉक्टरांच्या पूर्वजांना माहीत नव्हते. तसे डॉक्टरांनाही माहीत नव्हते. कधी तसा प्रसंग आला नव्हता. पण आता सरूने त्यांचा शब्द पाडला होता. नुसताच डावलला नव्हता तर ठोकरला होता. डॉक्टरांच्या डोक्यातून ते जाईना. अपमानाचा सल त्यांना अस्वस्थ करत राहिला. "कोण, कुठली सरू !" ते आपल्या मनाला समजावीत राहिले. पण पराभवाचे शल्य त्यांच्या मनातून जाईना.

सरूच्या बिऱ्हाडात मात्र रंगरेलिया चालू राहिल्या. घररिघी होऊन पट्टराणी व्हायचा तिचा बेत बाबूच्या बहिणीने धुळीला मिळवला होता. झालेल्या मुलाची कुठलीही जबाबदारी घेणे हे बाबूच्याही स्वभावात बसत नव्हते. सरूही मग सरू राहिली नाही. स्वच्छ पाणी घेऊन झुळझुळ वाहण्याचे तिने नाकारले होते. साऱ्या गावाचे ओघळ घेऊन ती आता बारावाटा वाहत राहिली. सरूची सरी झाली होती. बिऱ्हाडाचे दुकान झाले होते नि देशपांडे गल्लीचा सरी मोहल्ला झाला होता.

डॉक्टर हताशपणे बघत होते सारे. त्यांच्या अपमानाचे सलही थिजतील अशी थेरं चालू होती. गावातली खळबळ शांत झाली. पण डॉक्टर तसेच जळत राहिले. डॉक्टरांचे प्रसिद्ध असलेले अचूक निदान सरूच्या केसमध्य चुकले होते. ज्या आत्मविश्वासाने त्यांनी राघीच्या उंबरठ्यात पाऊल घातले त्या विश्वासाने कंबरडेच मोडले होते. त्या कळवळ्याचा नि त्या तळमळीचा चुराडा झाला होता. तो त्यांच्या मनाला बोचत होता.

डॉक्टरांकडे एक केस आली. एक छोटा गोंडस मुलगा घेऊन एक मनुष्य दवाखान्यात आला. डॉक्टरांनी त्याला तपासले आणि एकूण लक्षण बघून ते झटकन् उमजले. प्रिक्रिप्शन लिहून झाल्यावर त्यांनी नावा-गावाची चौकशी केली. त्या माणसाने सांगितले हा छोकरा सरीबाईचा आहे. डॉक्टरांच्या कपाळात तिडीक उठली. त्यांनी घाईघाईने प्रिस्क्रिप्शनचा चोळामोळा करीत म्हटले,

" सरकारी डॉक्टरकडे जा. चला इथून ! "

" पन डॉक्टर. "

" चला चला. वेळ लावू नका. "

तो माणूस ते पोर खांद्यावर टाकून दवाखान्याच्या पायऱ्या उतरला. डॉक्टर बघत राहिले. ते गोरं पोर गोबऱ्या गालांचं. भुरभुरत्या जावळाचं. मलूल चेहऱ्याचं. एक जीवघेता उसासा त्यांच्या हृदयातून उठला. तो माणूस गेला त्या दिशला भिजल्या नजरेने ते एकटक पाहत राहिले.

थोड्या वेळाने सरीकडून आणखी दोन माणसे येऊन गेली.

" दादा, पोर निपचित पडलंय. सरीचा निरूप हाय. माझी लाज राख. लेकराला वाचवा. "

आणि करकरीत तिन्हीसांजेच्या वेळेला सरू स्वत: आली वाऱ्यासारखी सैरभैर होऊन. आल्याबरोबर तिने डॉक्टरांचे पाय धरले.

" दादा, माझ्या लेकराला वाचवा. एकदा सोडून सतरांदा सजा द्या मला इथं. चौकात उभी राहते. सगळ्यांसमक्ष खेटरानी वडवा मला. पण माझ्या लालूला वाचवा. माझ्या गुन्ह्याची यवढी जबर सजा देऊ नका दादा. उठा उठा ! "

डॉक्टरांनी तिला काही न बोलता तिला उद्देशून दरवाज्याकडे बोट केले.

ढसाढसा हुंदके फोडीत सुटलेल्या केसांनी झाकलेल्या तोंडाने सरू दवाखान्यातून बाहेर पडली.

डॉक्टरांच्या हृदयात माणुसकीने पेट घेतला. सरू का तिचे लेकरू ? ते गोड निरागस मूल, की त्याच्या कळवळ्याच्या उरावर पाय देऊन त्यांच्या नाकावर टिच्चून गावात स्वैर धंदा करणारी बाजारबसवी सरू ? म्हातारपणी राधामावशीच्या जिण्याचा राहाडा करणारी, शरीराचे दुकान मांडणारी चिखलाची दलदल, की त्या दलदलीत घाणीतून वर आलेले इवलेसे नाजूक फूल ! माणुसकी की अपमानाचे सल ?

डॉक्टरांनी अवेळी दवाखाना बंद केला. दिवा मंद केला. ते बसून राहिले हताश, निपचित. हृदयात उठलेल्या वादळाला तसेच हृदयात ठेवून ते बघत राहिले. सारा दवाखाना भोवती भिरभिरत राहिला. बाटल्या नाचत राहिल्या.

मनात आर्तता हुंदके देत राहिली, " काय केलंस तू हे ? त्या मुलानं तुझं काय केलं आहे ? आईचं पाप मोठं की त्या पापापोटी ती सुंदर निरागसता जन्मास घेतलेली रामाची कृपा मोठी ?

डॉक्टरांची तगमग वाढत राहिली. मन हिंदकळत राहिलं. खोल पाण्यात बुडणाऱ्या दुर्दैवी जिवासारखा काठ हाती यायच्या आधीच निसटू लागला.

' मी नाही जाणार ' च्या निश्चयी उद्‌गाराला कुणी आतूनच धक्का देत राहिले, " का नाही जाणार ? "

रात्र वाढत राहिली. बेचैनी वाढत राहिली. धीर खचत राहिला. करुणेलाही पराभवाची धार चढत राहिली.

ते झटपट उठले. तोंडावर पाण्याचे शिपके मारून त्यांनी सारा उद्वेग धुऊन काढला. आवश्यक ती औषधे बॅगेत भरली आणि सवयींप्रमाणे ते रामाच्या पुढे उभे राहिले. डोळे भरभरून वाहत राहिले. मार बसलेल्या मुलासारखे अपराधाची कबुली देणाऱ्या विद्यार्थ्यांसारखे हात जोडले गेलेल्या मोठ्याने काही म्हणावेसे वाटले. पण रात्रीची काळी नीरवता शब्द कोंडू लागली. गलबललेल्या गळ्याने ते स्वतःशीच पुटपुटले. " रामभद्राय मंगलम् ! "

बाहेर एकाएकी गलाका ऐकू आला. कुणाच्या तरी किंकाळ्या जवळ येत होत्या. जीवघेणा, हृदयाचा बांध फोडून टाकणारा आक्रोश !

त्यांनी दार उघडले. तो पोराला छातीशी कवटाळीत सरू येत होती. रात्रीच्या काळोखाला पाझर फुटावा. नीरवतेला हीव भरावे. पत्थराचे काळीज दुभंगावे तसे रडत ओरडत सरू येत होती. घडून गेलेला अनर्थ पोटाशी घट्ट सावरीत दादांच्या माणुसकीला जाब विचारण्यासाठी, त्यांच्यांतल्या डॉक्टरला हालवण्यासाठी सरू येत होती.

डॉक्टर पायरीवर उभे होते. हातात बॅग होती. मनात जडमूढता आणि डोळ्यांत पाणीच पाणी !


ती आली. समोर उभी राहिली. ढसढसत तिनं एक क्षण–एकच क्षण त्यांच्या नजरेला नजर दिली आणि हृदयाशी कवळलेले मातृधन त्यांच्या पायरीवर तिने ठेवून दिले. त्याच पायरीवर थडाथडा डोके आपटले आणि बाळाच्या शरीरावर कोसळली. भोवतीची माणसे भेदरून बघत राहिली.

डॉक्टर सांवरले. त्यांनी मन घट्ट करून तिला शुद्धीवर आणले. तशी ती ओरडत उठली, "तुझा सत्यानाश होईल. तुझं वाटोळं होईल. तुझं घर बरबाद होईल. तू पण असं डोस्कं आपटून मरशील पोराच्या मढ्यापुढे."

त्यांच्यापुढे विचित्र हातवारे करीत ती किंचाळली, "अरे, माझ्या लाल्यानं तुझ्या दवाखान्याला कुलूप घातलं. आता त्याची पायरी जो चढेल तो तिथंच मरंल." आणि आली तशीच चक्रीवादळासारखी ती धावत परत गेली. लालूचे शरीर तसेच पायरीवर राहिले.

× × ×

आता लटकते आहे फक्त पाटी, " डॉक्टर भास्कर रामचंद्र उपाध्ये, एम. बी. बी. एस." त्या पाटीमागचा दरवाजा बंद आहे. त्या बंद दारामागे टेबल आहे, खुर्ची आहे, बाटल्या कपाटे सारे काही आहे. पण दवाखान्यात आता दवाही नाही आणि खानाही नाही. कारण डॉक्टर भेटेल त्या लालूला गोळ्या देतात नि देताना म्हणतात " रामा, मी औषध तू डॉक्टर. मी मंत्र तू चालक !" मुलाच्या हातावर ती मूठ रिकामी होते. काय असते त्या मुठीत ! बारीक बारीक गोड गोड गोळ्या. पण औषध नव्हे. चिमणचारा ! ○



# पंजाबमधील आणखी एक गाजलेला खून खटला

## ॲड. माधव कानिटकर

२८ नोव्हेंबर १९४८ ची सकाळ ! अंबाल्याला आपल्या कुटुंबियांसमवेत सुखाने जीवन जगणारे सरदार लाभसिंग एकीकडे सकाळचा चहा पिता पिता " दि ट्रिब्यून " (The Tribune) चा ताजा अंक वाचीत होते ! गेले अनेक दिवस ते स्वतःला सुदैवी समजत होते ! १९४७ साली देशाची फाळणी झाली ! सरदार लाभसिंग मूळचे पूर्व पंजाबमधील चंबळपूर या गावचे. पण पाकिस्तानची निर्मिती होणार हे नक्की ठरल्यापासून मुसलमानांनी कापाकापीला सुरुवात केली ! असंख्य हिंदूंपैकी कुणाची तरणीताठी पोर, कुणाची सून, कुणाची बहीण, कुणाची भावजय, पुरुषांच्या डोळ्यांदेखत कापली गेली ! हिंदू पळत सुटले !

( The Creation of a Muslim State by the partition of India was accompanied by what the leaders of India & Pakistan were pleased to call " Exchange of Population ! " The Murderous franzy that raged over the whole province for several months during 1947 took a heavy toll of Hindu life and property ! )

सरदार लाभसिंगांची ' प्रॉपर्टी ' अशी काही नव्हतीच ! साधे कारकून ते ! आपण राहत असलेला भाग पाकिस्तानात गेला हे कळल्याबरोबर बायका-पोरांना घेऊन ते हिंदुस्थान तथा भारत (!) च्या दिशेने पळत सुटले ! " वाहे गुरू "ची कृपा ! वाटत कुठल्याही नातेवाईकाचा मुसलमानांकडून खून पडला नाही ! पोरी-बाळी वाचल्या ! एवढेच नव्हे तर, अंबाल्याला ॲडिशनल डेप्युटी कमिशनरच्या ऑफिसमध्ये त्यांना रेकॉर्ड-कीपर म्हणून नोकरी मिळाली ! अनंत हस्ते कमला-वराने, देता किती घेशील दो कराने ? " वाहे गुरू "ची कृपा आणखी वाढली ! भारत सरकारने जाहीर केले की, पाकिस्तानातून पळून आलेले जे हिंदू भारतात नोकरी करीत असतील त्यांच्या नोकरीत खंड पडला असे समजण्यात येणार नाही !

( The period of his employment at Chambellpur would be counted as " service " for the purpose of leave, promotion, pension etc. )

वा रे ! ग्रंथ साहेब !, वा रे ! वाहे गुरू ! किती सुदैवी मी ! आणि किती माझ्यावर परमेश्वरी कृपा ! ......पण त्याच वेळी भवितव्यता खदखदून हसली ! मनातल्या मनात म्हणाली, " सरदार लाभसिंग! कळेल तुम्हांला काही वर्षांत की तुम्ही सुदवी की दुर्दैवी ते ! "

सकाळचे वृत्तपत्र वाचणाऱ्या सरदार लाभसिंगांना आता एकच चिंता होती ! तारुण्याने मुसमुसलेली, अत्यंत सुंदर अशी २० वर्षांची त्यांची लाडकी कन्या जयपालकौर उपवर झालेली होती ! एकूण चार मुलींपैकी तीन मुलींची लग्ने झालेली होती ! आता फक्त जयपालकौरचे लग्न करून टाकले की, सरदार लाभसिंग सुखाने मरायला मोकळे होते ! पण चांगला शीख मुलगा मिळणार कसा ? हुंडा द्यायला त्यांच्याकडे पैसे होते कुठे ?

पाकिस्तानातून पळून आलेला कारकून हा ! जेमतेम संसार करीत होता ! आपल्या सोन्यासारख्या मुलीच्या लग्नाचे कसे काय करायचे ही चिंता त्यांना जाळीत होती आणि " दि ट्रिब्यून "च्या ताज्या अंकात जाहिरात आली होती ! 'वधू पाहिजे :– जातपात न मानणाऱ्या व हुंडा घेऊ न इच्छिणाऱ्या २८ वर्षांच्या हिंदू–शिखास निर्वासित तरुणी वधू म्हणून पाहिजे. लिहा :–

Box No. 3333 C. C/o The Tribune, Ambala."



(Wanted : Refugee bride for 28 years Sikh Temporary Gazetted Officer, No caste bar or dowry. No. 3333 C C/o Tribune, Ambala.)

सरदार लाभसिंगांचा आनंद गगनात मावेना ! काय ही परमेश्वरी कृपा ! अत्यानंदाने त्यांनी आपल्या पत्नीस हाक मारली,

" रामरखी ! अग, लवकर बाहेर ये ! अगदी सगळं कसं आपल्या मनासारखं घडतंय ! आपल्या जयपालकौरचं लग्न करायचंय ना ? ही बघ जाहिरात ! मुलगा गॅझेटेड ऑफिसर आहे ! टेंपररी असला म्हणून काय झालं ? होईल आपोआप पर्मनंट ! मुलगा जातपात मानीत नाही ! पण गंमत बघ तोही शीख आणि आपण पण शीख ! वयही काही त्याचं फार नाही. मला वाटतं आपण पत्रव्यवहार करावा ! तुझं काय मत आहे ?"

रामरखीने डोक्यावरून पदर घेतला आणि तिच्या डोळ्यांत अश्रू आले ! श्रद्धेने दोन्ही हात जोडून तिने म्हटले, " वाहे गुरूची कृपा ! आपण जिवानिशी पाकिस्तानातून पळून आलो ! तुम्हांलाही लगेच नोकरी लागली आणि आता पोरीचं लग्न ठरतंय ! आहे ! जगात अजून परमेश्वर आहे ! नाहीतर सांगा मला एवढा मोठ्ठा गॅझेटेड ऑफिसर ! पण त्यालाच अशी बुद्धी का व्हावी की लग्न करायचंच तर ते निर्वासित हिंदू मुलीबरोबर ! आणि तो मनुष्यदेखील शीख ! आता वेळ घालवू नका. आजच पत्रव्यवहार करा ! नशीब काढलन् आपल्या पोरीनं !"

(There were many Hindu young men who, riding on the crest of patriotic emotion, choose their brides from families of refugees. Also they hoped that a girl who was wooed for herself, rather than for her money and position would remain for ever grateful and prove a better wife !)

सरदार लाभसिंग खुश झाले. त्यांनी ताबडतोब पत्रव्यवहार केला. अगदी निःशंक मनाने.

सरदार लाभसिंगांच्या पत्राला उत्तर आले ! मुलगा B. A., LL. B. होता ! नाव अमरिकसिंग ! गॅझेटेड ऑफिसर ! ता. १० एप्रिल १९४९ ला 'मुलगी' बघायचा कार्यक्रम ठरला ! मुलगा अंबाल्याला आला आणि तिथल्या 'गुरुद्वार'-मध्ये उतरला ! अमरिकसिंगाची भावी सासू–रामरखी–जावयावर बेहद्द खूष झाली ! एवढा मोठ्ठा गॅझेटेड ऑफिसर ! पण हॉटेलमध्ये उतरला नाही ! उतरला 'गुरुद्वार'मध्ये ! का ? मुलगा धार्मिक वृत्तीचा आहे ! स्वस्तही पडतं, शिवाय धर्माला चार पैशांची मदत !

मुलगी 'बघाय'चा कार्यक्रम पार पडला ! अमरिकसिंगाने जयपालकौरला ताबडतोब पसंत केली ! जयपालकौरला मात्र अमरिकसिंग देखणा वाटला नाही.

त्याच्या डाव्या भुवईवर एका चमत्कारिक जखमेचा फार मोठा व्रण होता ! पण... पण जयपालकौर शांत, शहाणी मुलगी होती ! तिने विचार केला आपल्या बापाकडे पैसा नाही ! आपल्याला तरी असा गॅझेटेड ऑफिसर पुन्हा मिळेल, अशी खात्री आहे का ? गप्प बसलेले बरे ! आणि जयपालकौरचे मौन हा तिचा होकार आहे असे समजण्यात आले !

(And her shy silence was interpreted as her concent ! )

सरदार लाभसिंग व त्यांची पत्नी रामरखी यांना मुलगा पसंत होताच ! १९ एप्रिल १९४९ ला जयपालचं लग्न अमरिकसिंगाशी लागले ! तिचे दुर्दैव तिला भेटले ! जन्माची गाठ पडली ! विशेष म्हणजे लग्नाला अमरिकसिंगाशिवाय त्याच्या बाजूने त्याचा एकही नातेवाईक हजर नव्हता ! डोळयांत पाणी आणून साळसूदपणाने त्याने सरदार लाभसिंगांना सांगितले, " कसे येतील माझे नातेवाईक ? सगळे पाकिस्तानात मारले गेले ! मी एकटाच बचलो ! " चंबळपूरमधील किती हिंदू कसे मेले, हे सरदार लाभसिंगांनी आपल्या डोळयांनी पाहिले होते ! त्यांचा जावयावर विश्वास बसला आणि लग्न लागले !

जयपालकौर आपल्या पतीबरोबर दिल्लीला गेली ! आणि रीतिरिवाजाप्रमाणे एका पंधरवडयात माहेरी आली ! तिच्या आईने तिची दृष्ट काढली ! तिच्या तोंडावरून हात फिरवला. तिला जवळ घेऊन विचारले, " जयपाल ! पोरी, सुखात आहेस ना तू ? कसं आहे सासर ? कसे आहेत तुझे यजमान ?"

आईच्या डोळयांतले अश्रू पुसून टाकत जयपालकौर म्हणाली, " आई ! अग वेडी काय तू ? हे फार फार चांगले आहेत ! दिल्लीला खूप मोठा ब्लॉक आहे आमचा ! हे गॅझेटेड ऑफिसर आहेत म्हटले ! सारखे माझ्या मागे मागे असतात ! अगदी स्वयंपाकघरातसुद्धा ! मलाच बाई लाज वाटते ! आई ! अग, परवा मला म्हणाले की जयू ! कदाचित माझी मद्रासला ट्रॅन्सफर होईल ! आणि तसं झालंच तर माहेराहून तू परस्पर मद्रासलाच येशील ! दिल्ली बघून झाली ! आता मद्रास ! मजा असते की नाही गॅझेट ऑफिसरच्या बायकोची !

भोळ्या-भाबडया जयपालकौरला माहीत नव्हतं की तिचा नवरा अमरिकसिंग ही काय चीज आहे ते ! तो नोकरीमध्ये मद्रासलाच होता पण त्याने दिल्लीमध्ये मोठा ब्लॉक घेतला होता तो केवळ पंधरा दिवसांसाठी ! आपल्या बायकोला फसवण्यासाठी ! ठरल्याप्रमाणे अमरिकसिंगाची अचानक " ट्रॅन्सफर " झाली ! आणि जयपालकौर मद्रासला गेली ! तिला वाटले आपण खरोखरच नशीबवान् ! ऑफिसचा शिपाई घरकामासाठी घरी येत होता ! त्याची बायको धुणी-भांडी करीत होती. मद्रासलादेखील मोठा ब्लॉक होता. नवऱ्याला लठ्ठ पगार होता ! विवाहित स्त्रीच्या सुखाला काही सीमा ? त्या बोलघेवडया पोरीने हां हां म्हणता शेजारच्यापाजारच्या बायकांशी ओळख करून घेतली, मैत्री जमवली !

(Jaipalkaur, possessed a gregarious temperament; she soon made friends with her neighbours and began to visit them during her idle moments ! )

सुरुवाती सुरुवातीलाच जयपालकौरच्या लक्षात आले की आपल्या नव्या मैत्रिणी आपल्याशी मोकळेपणाने बोलत नाहीत ! शेवटी तो दिवस उजाडला ! तिच्या एका नव्या मैत्रिणीची खात्री पटली की, जयपालकौर खरोखरच भोळी आहे ! फसलेली पोर आहे ! तिने तिला स्पष्टच सांगून टाकले की, " जयपालकौर ! तू भलत्या भ्रमात राहू नकोस ! तुझा नवरा अमरिकसिंग हा एक नंबरचा दारुड्या आहे ! त्याचं पहिलं लग्न झालेलं आहे ! त्याच्या पहिल्या बायकोचं नाव आहे बलजीतकौर ! त्याला पहिल्या लग्नाची दोन मुलं आहेत ! एवढंच नव्हे जयपाल ! अग, पहिल्या बायकोला माहेरी पाठवून देऊन हा हलकट कुठल्या कुठल्या घाणेरड्या बाया आमच्या बिल्डिंगमध्ये आणतो आणि रात्रभर धिंगाणा घालतो ! "


जयपालकौर हे सगळं ऐकून हबकली ! तिला धक्का बसला ! तरीदेखील तिने विचार केला की, खरे आणि खोटे यांत चार बोटांचे अंतर असते ! लोक नेहमीच जास्त करून सांगतात ! आपण प्रत्यक्ष पाहू तेव्हा खरे ! अस्वस्थ मनाने ती घरी आली. अमरिकसिंग संध्याकाळी घरी आला. दररोजचे व्यवहार नेहमीप्रमाणे घडले आणि एकांतात जयपालकौर ढसढसा रडू लागली ! तिला अत्यंत प्रेमाने जवळ घेऊन अमरिकसिंगाने विचारले, " जयू ! अग, का रडतेस तू ? मला सांगायचं नाही ? "

" मला माझ्या आईकडे जावंसं वाटतंय ! बऱ्याच दिवसांत मी भेटलेली नाही तिला ! "

" अग ! मग जा ऽऽ ना ! वेडी कुठची ? चल, पूस बघू डोळे. उद्याच तुला मी अंबाल्याला पाठवतो. पण लवकर परत ये हं ! "

अमरिकसिंगाने प्रेमाचे नाटक त्याच्या दृष्टीने ठीक वठवले ! पण त्याला कल्पनाही नव्हती की रात्रीच्या एकांतात पुरुषापेक्षा स्त्रीच अधिक हुशार असते ! पुरुषाने मनापासून प्रेमाने केलेला स्पर्श आणि खोटया प्रेमाने केलेला नाटकी स्पर्श यातला फरक तिला समजतो !

दुसऱ्या दिवशी ठरल्याप्रमाणे जयपालकौर अंबाल्याला माहेरी रवाना झाली. माहेरी येत असतानादेखील जयपालकौर मनाने अस्वस्थ होती ! ह्यांच्याबद्दल आपण जे काही ऐकले ते खरे असावे अशी दाट शंका तिला येत होती ! घरी आल्याबरोबर ती भावंडांत मिसळली. एकीकडे रडता रडता हसली ! आणि हसता हसता रडली ! संध्याकाळी सरदार लाभसिंग आणि इतर धाकटी भावंडे घरात नाहीत असे पाहून जयपालकौरने आईच्या गळयाला घट्ट मिठी मारली आणि तिला रडत रडत सांगितले की, " आई ! अग, ह्यांच्याबद्दल मी असं असं ऐकलं ! ते



— आणि आईजवळ जसपालनं आपलं दुःख हलकं केलं

खोटं असेल तर देवच पावला ! पण खरं असेल तर माझ्या आयुष्याचं काय होणार ग ?"

रामरखी काही बोलण्यापूर्वीच बाहेर घंटा वाजली. पोस्टमन आला होता ! मद्रासहून तार आली होती, जयपालकौरला ! मजकूर होता :

" तावडतोब निघून ये !

— अमरिकसिंग."

सरदार लार्भासंगाने संध्याकाळी एक्स्प्रेस डिलिव्हरीने पत्र पाठवले " की, "माझी मुलगी इथे येऊन ४८ तासदेखील झाले नाहीत तोच तुमची तार आली ! तिकडे सगळं ठीक आहे ना ? तुमची तब्येत ठीक आहे ना ? काय असेल ते कळवा नाहीपेक्षा आठ–पंधरा दिवसांनी मुलीला परत पाठवीन."

पुढच्या चार-पाच दिवसांत जयपालकौरला मद्रासहून आणखी पाच तारा आल्या ! प्रत्येक तारेत मजकूर तोच !

" ताबडतोब निघून ये !

— अमरिकसिंग."

जावईच असला निघाल्यावर सासरा तरी काय करणार ? त्याने जयपालकौरला समजावले, " जा, पोरी ! जाऽ ! त्याला तू तिकडे हवी आहेस ! किती झालं तरी नवरा आहे तुझा तो ! आम्हा आई-वडिलांचा आता तुझ्यावर काही हक्क राहिलेला नाही. तू आजच नीघ !"

आई-वडिलांच्या सांगण्याप्रमाणे ३० ऑगस्ट १९४९ ला जयपालकौर अंबाल्याहून निघाली आणि मद्रासला आली ! आणि स्वतःच्याच घरात पाऊल टाकताना तिला धक्का बसला ! एक कोणीतरी ' बाई ' तिच्या दोन मुलांना घेऊन घरात आरामशीर बसलेली होती !

जयपालकौरला दरवाजात पाहून ती ' बाई ' अदबीने पुढे आली आणि जयपालकौरलाच तिने विचारले, " आपण कोण ? आणि कुणाला भेटण्यासाठी इथं आलात ?"

सात्त्विक संतापाने थरथरत जयपालकौरने रागाने विचारले, " वाऽ बाई ! जो प्रश्न मी तुम्हांला विचारायचा तो तुम्ही मला विचारलात ! मला सांगा की तुम्ही कोण ?"

त्या ' बाई 'ने पुढे येऊन आत्मविश्वासाने सांगितले की, " मी बलजीतकौर ! माझा नवरा अमरिकसिंग याचं हे घर आहे ! ही माझी दोन मुलं ! आता सांगा तुम्ही कोण ?"

......आणि रडत रडत जयपालकौरने सांगितले की, " मीसुद्धा मिसेस अमरिकसिंग. माझं नाव जयपालकौर ! हे घर माझं आहे ! दोन महिन्यांपूर्वीच आमचं लग्न झालं ! पंधरा दिवस आम्ही दिल्लीला होतो. नंतर एक महिना मी इथं होते आणि आता गेले आठ दिवस मी अंबाल्याला माहेरी होते ! ह्यांनी मला सहा टेलिग्राम केले की " ताबडतोब निघून ये " म्हणून आणि म्हणून मी इथं आले इतकंच !"

जयपालकौरचे नशीब इतकेच की मोठ्या बहिणीने मायेने धाकट्या बहिणीला जवळ घ्यावे तसे बलजीतकौरने–तिच्या सवतीने–तिला जवळ ओढून घेतले. तिच्या अंगावरून प्रेमाने हात फिरवला आणि तिला म्हटले, " पोरी ! अग, काय गेल्या जन्मी पाप केलंस तू म्हणून या जन्मी इतकी फसलीस ? अग ! आपला दोघींचा नवरा म्हणजे एक निर्लज्ज नरपशू आहे ! बघ ! या दोन पोरांकडं बघून मी जगते ! नाहीतर मी केव्हाच आत्महत्या केली असती ! अग, हे चिक्कार पितात आणि वासना अशी विकृत की दिवस नाही रात्र नाही, काळ नाही वेळ नाही ! आणि एवढं करून बाहेरच्या बाया आहेतच !"

अमरिकसिंगाच्या विकृत वासनेचा थोडाफार अनुभव जयपालकौरला होताच ! पण सत्य समजण्यापूर्वी तिला असेच वाटत होते की आपल्या नवऱ्याने वाटेल त्या वेळी आपल्याजवळ येऊन आपल्याकडून सुख घ्यावे याचा अर्थ त्याचे आपल्यावर उत्कट प्रेम आहे ! नवीन लग्न झालेले आहे ! तो तर काय पुरुष आहे ! सुरुवाती-सुरुवातीला तो असे वागणारच !

......बाहेर कुणाची तरी पावले वाजली म्हणून बलजीतकौर आणि जयपालकौर एकमेकींपासून दूर झाल्या ! अमरिकसिंग दारूच्या नशेत झोकांड्या खात

घरी येत होता ! आल्या आल्याच त्याने बरळत सांगितले की,

" जयपालकौर ! ही माझी भाची बलजीतकौर ! ती तिच्या मुलांना घेऊन इथं राहायला आली आहे ! आणि तिला इथं राहण्याचा हक्क आहे ! "

बलजीतकौरने आणि जयपालकौरने एकमेकींकडे पाहिले आणि त्या काय समजायचे ते समजल्या ! तेवढ्यात अमरिकसिंग पुन्हा एकदा गरजला, " बघता काय गाढवासारख्या एकमेकींकडे, मला जेवण नको आहे, मी बाहेर जेवून आलोय ! जयपालकौर ! बेडरूममध्ये चल ! "

जयपालकौर मुकाट्याने बेडरूममध्ये गेली ! दरवाजाला आतून कडी घालून घेऊन तिने अमरिकसिंगाला अत्यंत हळू आवाजात विचारले की, " अहो, खरं सांगा ! बलजीतकौर तुमची बायको आहे की नाही ? तुम्ही आता पिऊन आलात की नाही ? मला सगळं कळलंय. मला माझ्या आईकडं पोचवा. आता इथं क्षणभर-देखील थांबायची मला इच्छा नाही ! "

जयपालकौरने इतके सांगितल्याबरोबर अमरिकसिंग दारूच्या नशेतच उठला. जयपालकौरला लाथा-बुक्क्यांनी बेदम मारहाण केली आणि नशेतच तिला सांगून टाकले की, " होय ! बलजीतकौर माझी पहिली बायको आहे, ती दोन्ही मुलं माझी आहेत ! मी दारू पितो ! आणि पिणार आहे ! बेशरम ! काय म्हणायचंय तुला ह्याच्यावर ? आणि याद राख, तू इथून पुढं माहेरी कधी जाता कामा नयेस ! आणि ह्यातलं काही तुझ्या घरी कळता कामा नये...... "

अमरिकसिंगाला पुढे बोलताच आले नाही. दारू खूप चढली होती. तो लगेच आडवा झाला आणि झोपला !

सबंध अंग दुखत असलेल्या जयपालकौरला नवऱ्याची शिसारी आली. ती त्याच्यापासून दूर झोपली ! ढळढळा रडली ! आणि तिने रात्रीच ठरवून टाकले की, ह्या नरकातून आपली सुटका करून घ्यायचीच. पत्र लिहून माहेरी सत्य वस्तुस्थिती कळवायचीच !

* * *

मध्यरात्र उलटून गेली तरीदेखील जयपालकौरला झोप लागत नव्हती ! तिच्या-पासून दूरवर पण त्याच बेडरूममध्ये तिचा दारुड्या नवरा अजगरासारखा सुस्त पडून होता. गेले काही दिवस झालेल्या मनस्तापामुळे असेल किंवा आज रात्री पतिराजांनी (!) केलेल्या मारहाणीमुळे असेल, तिची तब्येत आतून पार बिघडली होती ! सारखी ओकारी होईलसे वाटत होते ! तिने ओकारी दाबून टाकण्याचा प्रयत्न अनेक वेळा केला तरी शेवटी निसर्ग तो निसर्ग ! त्याचे नियम कोणी बदलू शकत नाही ! दाबून टाकू शकत नाही ! असह्य झाल्यावर जयपालकौर तिरी-

मिरीन उठली आणि बेडरूमच्या मोरीत जाऊन ओकली ! " अहो जरा या ऽ !' असे कसेबसे उच्चारलेले शब्द ऐकू जायला अमरिकसिंग शुद्धीत असेल तर ना ? जयपालकौरचा जीव कासावीस झाला ! आतडी पिळवटून निघाली ! सर्व जेवण बाहेर पडले ! पण तिचे शब्द अगदीच फुकट गेले नव्हते ! बाहेरून बलजीतकौरने दरवाजा ठोठावला ! नाईलाजास्तव जयपालकौरन बेडरूमची कडी काढली. बलजीतकौरने तिला आधार देत बाहेर नेली. तिच्या पाठीवरून हात फिरवीत तिला कुशीत घेतले ! आणि नंतर उजव्या हाताने तिची हनुवटी वर करीत बलजीतकौरने विचारले,

" जयपाल ! माझ्या नवऱ्याने तुझ्याशी लग्न करून दोन महिने झाले ना ?"

" हो !"

" संध्याकाळी आलीस तेव्हा तुझा चेहरादेखील ओढल्यासारखा दिसत होता !"

" मग ?"

" मग काय ? वेडे पोरी, दिवस गेल्येत तुला ! नक्की !"

कोवळ्या वयात मनपसंत पतीपासून आपल्याला दिवस आहेत ! आपण आई होणार ! ही बातमी ऐकल्यावर सुंदर नवविवाहितेला किती आनंद होत असेल ? पण जयपालकौरला दुःखाचा कढ आला. या नरकातून सुटायच्या विचारात ती होती ! आणि आता तर तिचा पाय कायमचा अडकणार होता ! बलजीतकौरच्या खांद्यावर मान टाकून ती लहान मुलासारखी ढसढसा रडू लागली ! अचानक कसल्यातरी आठवणीने जयपालकौर दचकली ! बलजीतकौरपासून दूर होत ती म्हणाली,

" बाईसाहेब ! सोडा मला ! बेडरूमचा दरवाजा उघडा आहे आणि ह्यांना आतमध्ये त्यांच्याजवळ मीच हवी आहे ! ह्यांना जाग आली तर...?"

" तू काळजी करू नकोस ग ! सहा वर्षे संसार करत्ये मी या माणसाबरोबर ! एकदा का रात्री दारू पिऊन झोपले की सकाळी आठ-आठ वाजेपर्यंत मेल्यासारखे झोपतात ! आत्ता इथे कोणी नगारे वाजवले तरी ते हलायचे नाहीत !"

" पण मग आता माझं कसं होणार ?"

" तुला सांगितले ना, काळजी करू नकोस म्हणून ? मी आहे ना तुझ्यामागे खंबीर उभी ! असं कर सकाळी हे ऑफीसला गेले की तुझ्या आई-वडिलांना पत्र टाक आणि उद्या-परवा इथून पळून जा ! तुझ्या आईकडं जा ! आणि इथं पुन्हा कधी न यण्यासाठी जा ! माझ्या आयुष्याचं नुकसान झालंय तेवढं पुरे. आणखी तुझ्या आयुष्याचं नको !"

बोलता बोलता बलजीतकौरलादेखील रडू फुटले ! अमरिकसिंगाच्या दोन्ही बायका मनसोक्त रडल्या ! पहाटे केव्हातरी जयपालकौर बेडरूममध्ये शिरली ! सकाळी साडेआठ वाजता अमरिकसिंग उठला ! डोळे तांबडेलाल दिसत होते !

रात्री जणू काही काही घडलेच नाही अशा तऱ्हेने सर्व कार्यक्रम आटोपले ! उशीर होत होता म्हणून चार घास घशाखाली ढकलून त्याने जामानिमा केला आणि संध्याकाळी येताना झोकांडया खात येण्यासाठीच की काय कोण जाणे जाताना सरळ चालत गेला !

जयपालकौर संधीची वाटच पाहत होती. तिने टेबलावरची अमरिकसिंगाची लेटर हेडस् पुढे ओढली आणि आईला पत्र टाकले ! जयपालकौरचे ते पत्र असे–होते

Amriksingh Tejasingh मद्रास,
B. A; L. L. B. ३ सप्टेंबर. ४९
Civil Gazetted Officer

ती. सौ. आईस व ती. बाबांस,

सत् श्री अकाल. मंगळवार तारीख ३० ऑगस्ट ४९ ला मी इथे सुखरूप पोचले. माझ्या डोळ्यांपुढे अंधःकार असताना मनाच्या अत्यंत विकल अवस्थेत मी हे पत्र लिहीत आहे ! ह्यांच्याबद्दल मी जे जे ऐकले ते ते सर्व माझ्या दुर्दैवाने खरे निघाले ! ह्यांची पहिली बायको माझ्या अगोदरच तिच्या दोन मुलांसह इथे आलेली होती ! हे चिक्कार पितात आणि काल रात्री तर त्यांनी मला बेदम मारहाण केली. आई आता मी काय करू ग ? तुझ्याकडे येण्याशिवाय मला आता गत्यंतरच नाही ! मी येत्या सोमवारी १०। च्या मद्रासने इथून निघत आहे, ती बुधवारी सकाळी अंबाल्याला ९ वा. पोचते. सोमवारी सकाळी संधी मिळाली नाही तर मंगळवारी निघेन. तुम्ही दोन्ही दिवस स्टेशनवर या. प्रत्यक्ष तुमच्या घरी येईपर्यंत अत्यंत दुःखात असलेली तुमचीच दुर्दैवी मुलगी–पाल.

जयपालकौरला मंगळवार ता. ६ सप्टेंबर ४९ ला पळून जाण्याची संधी मिळाली आणि तिने १०। ला मद्रास सोडले ! पण तिचे दुर्दैव आड आले. अमरिकसिंग दुपारी एक वाजता अचानक घरी आला ! जयपालकौर व तिचे सामान घरात नाही हे पाहून तो काय ते समजला ! चरफडला ! किती झाले तरी तो जयपाल-कौरचा नवरा होता ! आपले आपल्या बायकोवरचे स्वामित्व सोडायला कुठलाही नवरा तयार नसतो ! मग तो स्वतः कितीही वाईट वागत का असेना ! बायकोने नीटच वागले पाहिजे, सगळे सहन केले पाहिजे; कारण ती बायको आहे ! अमरिकसिंगाने तावडतोब हालचाल सुरू केली.

( He knew exactly how to deal with the situation and acted quickly ! )

अमरिकसिंगला ठाऊक होते की, अंबाल्याला शक्य तितक्या लवकर पोचणारी सकाळची गाडी म्हणजे १०। ला सुटणारी मद्रास ! ती दुसऱ्या दिवशी सकाळी ११ वा. भोपाळला पोचते ! अमरिकसिंगाने सर्वांत प्रथम मद्रास पोलीसला कंप्लेंट दिली की "माझी बायको जयपालकौर, ही माझ्याकडे पाहुणी म्हणून आलेल्या माझ्या

भाचीचे–बलजीतकौरचे–अंदाजे ५,००० रुपये किमतीचे दागिने आणि कपडे घेऊन पळून गेलेली आहे." त्यानंतर त्याने आपल्या सासऱ्याला–सरदार लाभसिंगांना–अंबाल्याला तार ठोकली की, " तुमची मुलगी चोर आहे ! आणि प्रकरण पोलिसात गेलेले आहे !"

दुसऱ्या दिवशी सकाळी मद्रासहून सुटणाऱ्या विमानाने अमरिकसिंग भोपाळला गेला ! आणि मद्रासहून अंबाल्याला जाणारी गाडी भोपाळ स्टेशनात शिरण्यापूर्वीच भोपाळ स्टेशनवर हजर राहिला !

मद्रास गाडी आली ! अमरिकसिंगाने प्रत्येक डबा शोधला ! अखेर त्याला जयपालकौर सापडली ! रागाने डब्यात घुसून त्याने तिला सामानासकट खेचून बाहेर काढली ! आणि उलट गाडीने घरी आणली ! अमरिकसिंगाचे अंदाज आणि तर्कशास्त्र अचूक ठरले ! पराभूत झालेल्या, भीतीने धक्का बसलेल्या जयपालकौरला मुकाट्याने त्याच्याबरोबर परत जाण्याशिवाय गत्यंतरच नव्हते !

(Everything happened as he had planned. A defeated and horrorstruck Jaipalkaur was taken off the train at Bhopal and brought back to Madras.)

मद्रासला आल्यावर अमरिकसिंगाने जयपालकौरविरुद्ध केलेली चोरीची तक्रार पोलीस स्टेशनवर जाऊन मागे घेतली ! जयपालकौरला घरी नेऊन बेदम ठोकली ! आणि तिला दम दिला, " याद राख पुन्हा कधी माहेरी जायचा प्रयत्न करशील तर !"

अंबाल्याला अपेक्षेप्रमाणे गुरुवारी सकाळी आपली मुलगी का आली नाही, या चिन्तेत सरदार लाभसिंग पडले ! उलट जावयाचीच तार मिळाली की, ' तुमची मुलगी चोर आहे व प्रकरण पोलिसात गेले आहे !' आपल्या बाकीच्या तीन जावयांना बरोबर घेऊन ते मद्रासला आले ! अमरिकसिंगाचे घरावर लक्ष होते ! कडक पहारा होता ! दरवाजातच त्याने सासऱ्याला हटकले,

" काय आहे ? मी न बोलावताच इतक्या लांबून इथे येण्याची तसदी का घेतलीत ?"

" काही नाही ! तुमचं दोघांचं कसं काय चाललंय ते पाहायला आलो. "

" आमचं कसंही चाललं असेल ! आम्ही दोघं नवरा-बायको आहोत ! आमचं आम्ही काय ते पाहून घेऊ !"

" अहो ! जावईबापू जरा समजुतीने घ्या ! तुमचं चांगलं चाललं असेल तर त्यात आम्हांला आनंदच आहे. पण मग ती आमच्या मुलीने चोरी केली अशी तार पाठवली होतीत त्याचं काय झालं ?"

" ते प्रकरण दाबून टाकलंय मी ! आणि असल्या लहानसहान बाबतीत माहेरच्या लोकांनी जास्त फाजील लक्ष घालू नये असं वाटतं मला ! त्यामुळंच मुली सासरी



**...आणि अखेर तो दुर्दैवी दिवस उजाडला**

ठीक वागत नाहीत !"

अमरिकसिंगाने सासऱ्याला जयपालकौरबरोबर बोलूसुद्धा दिले नाही ! त्यांनी फक्त घरात वावरत असलेली आपली मुलगी डोळे भरून पाहिली ! आणि कधी ना कधी तरी अमरिकसिंगाला सुबुद्धी सुचेल व जयपालकौरबरोबर तो नीट वागेल या भाबड्या आशेवर ते अंबाल्याला परत गेले !

( Labhsingh returned home to Ambala, not assured but hopping against hope that better sense would prevail and the relations between his daughter and son-in-law would improve. )

जाताना त्यांनी अगतिकपणे अमरिकसिंगाला विचारले,

"बरं ! आता आमच्या मुलीला माहेरी कधी पाठवणार आहात ?"

"जमल्यास डिसेंबरमध्ये पाठवीन." एवढेच तुटक उत्तर देऊन अमरिकसिंग आत निघून गेला !

त्यानंतर सतत सहा महिने अमरिकसिंगाने जयपालकौरला अक्षरशः नजरकैदेत

ठेवली ! तिचा गर्भ दिसामासाने वाढत होता ! गर्भवती पत्नीशी प्रेमाने बोलणे, तिची हौस-मौज पुरवणे, तिला जपणे हे राहिले बाजूलाच ! तिचा असह्य मानसिक छळ चालू होता. दररोज दारू पिऊन अमरिकसिंग वाटेल ते बडबडत असे ! कधी कोणाला सांगत असे की, "बलजीतकौर माझी ठेवलेली बाई आहे आणि जयपालकौर ही माझी बायको आहे !" तर कधी सांगत असे, "बलजीतकौर माझी बायकोच आहे आणि ही नवी फटाकडी जयपालकौर माझी ठेवलेली बाई आहे ! ती Made in Pakistan आहे !" दारूच्या नशेत जयपालकौरला मारणे हा अमरिकसिंगाचा दर आठ-दहा दिवसांनंतर ठरलेला कार्यक्रम. त्या पुढच्या सहा महिन्यांत वेळोवेळी चोरून पत्रे लिहून ही सर्व परिस्थिती तिने माहेरी कळवली होती ! जयपालकौरला कल्पना तरी होती का की तिने अंतःकरण पिळवटून लिहिलेली ही सर्व पत्रे पुढे कोर्टात वाचली जाणार आहेत !

जयपालकौरला सातवा महिना लागला ! आणि मग मात्र बलजीतकौरला तिची पुन्हा एकदा दया आली. तिने ठरवलेच की काहीही करून या पोरीला तिच्या आई-वडिलांकड पोचवायचीच ! प्रथमपासूनच बलजीतकौरने जयपालकौरला मदत दिली ती एका स्त्रीने दुसऱ्या दुःखी स्त्रीला दिलासा द्यावा या हेतूने, की आपल्यापेक्षा दिसायला सुंदर असलेली ही स्त्री शक्य तितक्या लवकर आणि कायमचीच घरातून बाहेर जावी या सवती-मत्सराच्या विचाराने, ते कळायला मार्ग नाही !

( That, Baljeet, her co-wife was actuated solely by humanitarian motives is possible, though the probabilities are that an element of jealousy played as not unimportant part in the proceedings ! )

काही का असेना ! बळजीतकौरने जयपालकौरला दुपारी एकटीलाच बोलावून एक अफलातून आयडिया सांगितली !

"जयपाल ! अग, तुला आईकडे जावंसं वाटतं ना ?"

"होऽऽना ! अगदी उडून जावसं वाटतं !"

"माझं पण तेच मत आहे ! तुला आता सातवा लागला ! ह्यांचं वागणं हे असं ! उद्या काही वेडावाकडा प्रकार घडला म्हणजे मग ? तुला जपायला हवं आता ! आणि अशा स्थितीत पहिलटकरणीने आईकडेच गेलेलं बरं !

"पण जाऊ तरी कशी ? हे तर मला वाटेतच पकडून आणतात !"

"असं कर ! मद्रास ते अंबाला हा प्रवास एकाच गाडीनं एकदम करू नकोस ! इथून सकाळी सुटणारी मद्रास अवघ्या काही तासांत बुऱ्हाणपूरला जाते ! तिथं थोरली बहीण असतेना तुझी ? तिथं आधी उतर. आठवडाभर तिच्या घरीच राहा ! 'मी ताईकडे बुऱ्हाणपूरला उतरलेली आहे, इथून मला न्यायची व्यवस्था करा,' असं पत्र बुऱ्हाणपूरवरून अंबाल्याला टाक म्हणजे सुखरूप घरी पोचशील."

जयपालकौरचा आनंद गगनात मावेना ! प्लॅन ठरला ! ज्या दिवशी उभय सवतींचा हा संवाद झाला तो दिवस होता सहा जानेवारी–१९५० ! जिने आपल्याला इतकी मदत केली, आपल्यावर जिने इतकी माया केली ती बलजीतकौर या कटात सामील होती हे अमरिकसिंगाला कळलं तर ? तो तिचे हाल करील. ते होता कामा नयेत म्हणून सात जानेवारी १९५० ला जयपालकौरने इन्स्पेक्टर ऑफ पोलीस, मद्रास यांना अर्ज लिहिला. त्यात तिने स्पष्ट लिहून टाकले की, " माझा नवरा अमरिकसिंग याने मला फसवून माझ्याशी लग्न केले होते ! मला दिवस असूनदेखील तो मला माहेरी पाठवीत नव्हता, म्हणून नाईलाजास्तव मी माझ्या आईकडे पळून जात आहे. माझा नवरा एक नंबरचा दारुड्या असून त्याच्या घरी असलेली बलजीतकौर सालस स्त्री, ही त्याची पहिली बायको आहे, माची नव्हे ! तिची काळजी घ्या ! आणि माझ्या नवऱ्याने मी गेल्यानंतर माझ्याबद्दल कुठलीही तक्रार पोलिसांना दिली तर तिच्या खरेखोटेपणाची शहानिशा करा ! कारण मी अंगावरच्या वस्त्रानिशीच बाहेर पडले आहे. काहीही बरोबर घेतलेलं नाही. कृपा करून मला त्रास देण्यापेक्षा माझ्या नवऱ्याच्या चारित्र्याची कसून चौकशी करा ! इथून पुढे मी त्याला नवरा मानीत नाही. त्याच्याशी कुठलाही संबंध ठेवू इच्छित नाही !

आपली नम्र
जयपालकौर
सरदार लाभसिंग यांची मुलगी.

याच अर्जाची एक नक्कल मद्रासच्या डेप्युटी कमिशनरना देण्यासाठी तयार ठेवली आणि ता. आठ जानेवारी १९५० ला हे दोन्ही अर्ज पोस्टात पडले. बुऱ्हाणपूरला तार केली की अवघ्या काही तासांत मी येत आहे. स्टेशनवर या ! आणि त्याच दिवशी पिंजऱ्यातून पक्षी उडाला ! जयपालकौर आपल्या ताईकडे सुखरूप पोचली ! अमरिकसिंगाच्या अंगाचा थयथयाट झाला. त्याला जयपालकौर कुठे गेली आहे हे माहीत नव्हते ! जाण्यापूर्वी त्याच्याविरुद्ध तिने डेप्युटी पोलीस कमिशनरला काय अर्ज दिला आहे हे ठाऊक नव्हते ! त्याला फक्त थोडयाशा उशीराने का होईना एवढेच ठाऊक झाले होते की आपण तर हुशार आहोतच, पण आपल्यासारख्या इरसाल माणसाला फसवू शकणारी, आपल्यावर मात करू शकणारी डोकीसुद्धा या जगात आहेत !

या वेळी मात्र अमरिकसिंगाचे दुर्दैव आड आले ! त्याने मागितलेली दीर्घ मुदतीची रजा तावडतोब मंजूर झाली नाही ! अखेर पंचवीस जानेवारी १९५० ला अमरिकसिंग Long Leave वर गेला आणि तीस जानेवारी १९५० ला सरदार लाभसिंगांकडे अंबाल्याला आला ! आल्याबरोबर त्याने 'तमाशा' सुरू केला ! सभ्यतेचे सर्व बोलणे सोडून त्याने " आत्ताच्या आत्ता जयपालकौरला माझ्या

ताब्यात द्या ! मी घेऊन जाणार तिला परत," म्हणून आरडाओरडा सुरू केला ( He demanded the restitution of his wife. ) सरदार लार्भसिगांच्या घराच्या अंगणात शेजारी-पाजारी आणि जाणाऱ्या येणाऱ्या वघ्यांची ही गर्दी जमली! सासऱ्याने समजुतीने सांगून पाहिले तरी अमरिकसिंग ऐकेना ! पण आता मात्र सासऱ्याने दुबळेपणा सोडला आणि जावयास चमकावला !

" सरदार अमरिकसिंग ! आजपर्यंत बोलत नव्हतो याचा अर्थ मला काही कळत नव्हतं असा घेऊ नका ! मला सगळं ठाऊक आहे ! एवढा B. A., LL. B. झालेला माणूस तू ! आणि बेवडा पितोस ? तुला शरम नाही वाटत ! स्वतःला तर तुला अब्रूची चाड नाही पण आम्हांला आहे ! सासरा म्हणजे समजलास काय तू ? याद राख आत्ताच सांगून ठेवतो, जयपालची तब्येत ठीक नाही. तिची तब्येत ठीक होईपर्यंत ती मद्रासला येणार नाही ! बघतो कुणाची माय व्यायल्ये तिला इथून जबरदस्तीनं नेण्याची ती !......आणि आठ-पंधरा दिवसांत आपल्या आयुष्याचे मार्ग सुधार आणि मग इथं येऊन बायकोला परत न्यायच्या गोष्टी कर !"

शिवीगाळ करत आणि रागाने घुसफुसत अमरिकसिंग परत गेला. जाताना त्याच्या नजरेतल्या विखाराने सरदार लार्भसिंग अस्वस्थ झाले !

या जगात काही काही माणसे अशी असतात की त्यांच्या भविष्यात घडणाऱ्या अनिष्ट घटनांची अस्पष्ट का होईना, पण नियती त्यांना अगोदरच कल्पना करून देते ! सरदार लार्भसिगांची मानसिक अस्वस्थता त्या दिवशी इतकी वाढली की, अखेर ते अंबाला पोलीस स्टेशनवर गेले आणि त्यांनी एक नॉमीनल कंप्लेंट दिली की, " माझ्या जावयापासून माझ्या जिवाला धोका आहे !"

( Labhsingh's complaint was nothing more than a forestall of his son-in-law's next move ! )

ड्युटी ऑफीसरने ह्या तक्रारीची फारशी गंभीर दखल घेतली नाही ! कारण एक तर तक्रार आली तेव्हा अमरिकसिंग फार दूर मद्रासमध्ये होता ! दुसरे म्हणजे सासरा-जावयांची अशी भांडणे नेहमीच होतात ! घरगुती भांडणे ती ! त्यात काय पोलीस ऑफीसरने लक्ष घालायचे ? आणि तिसरे म्हणजे आत्ताच्या आत्ता ॲक्शन घ्या असा सरदार लार्भसिगांचादेखील आग्रह नव्हता ! ड्युटी ऑफीसरने या तक्रारीची नोंद करून घेतली आणि " घरगुती भांडण " असा शेरा मारून तो स्वस्थ बसला !

(The complaint was therefore recorded as Non-Cognizable !)

......आणि अखेर तो दुर्दैवी दिवस उजाडला ! पंधरा फेब्रुवारी १९५० ! संध्याकाळी ६॥ वा. अचानक अमरिकसिंग सरदार लार्भसिगांच्या अंगणात येऊन उभा राहिला ! तो नेहमीप्रमाणे चिक्कार पिऊन आला होता ! त्याच्या हातात पिस्तूल होते ! होय ! अमरिकसिंग Civil Gazatted Officer होता !

मिलिटरीशी त्याचा जवळचा संबंध होता ! त्याने पिस्तूल मिळवले होते ! त्याला पाहून सरदार लाभसिंग सामोरे गेले.

" या ऽऽ... !"

" या वगैरे कुछ नहीं ! आज काय तो निकाल झाला पाहिजे ! जयपालकौर माझी बायको आहे आणि तिनं माझ्याकडेच आलं पाहिजे. माझा तिच्यावर कायदेशीर हक्क आहे !"

" पाठवतो ! पण आधी ते पिस्तूल खिशात ठेवा !"

" मग बोलवा तर जयपालकौरला ! जस्ट नाऊ !"

अमरिकसिंगाने शिव्या द्यायला सुरुवात केली ! तो मध्येच नीट बोले, पुन्हा पिस्तूल बाहेर काढी पुन्हा आत ठेवी आणि मध्येच शिवीगाळ करी.

( He changed his mood from the conciliatory to the belligrant. One moment he reasoned and argued, the next he was up and shouting, uttering filthy language and threats by flourishing his revolver)

अखेर सासरा पुढे झाला ! अमरिकसिंगाच्या खांद्यावर हात ठेवून त्याने म्हटले,

" असं काय उगाच वेड्यासारखं वागता जावईबापू ? मी तिला पाठवतो म्हटलंना ? आत चला, चहा घ्या. आपण काय ते नीट बोलू !"

...आणि अमरिकसिंग सरदार लाभसिंगांच्या घराच्या ओट्यावर येऊन बसला ! आतमध्ये बघून लाभसिंगांनी " अगऽ ! जावई आल्येत. चहा ठेव गऽऽ !" असा मोघम हुकूम दिला आणि अमरिकसिंगाकडे वळून त्यांनी म्हटले " हे बघाऽऽ चहा येईपर्यंत मी सांगतो ते जरा शांतपणानं ऐकून घ्या !"

" सांगा !"

" मी पोरीला तुमच्याबरोबर पाठवायला आत्ता तयार आहे ! पण तिला आठपंधरा दिवसांनंतर बाळंतपणाला इकडे पाठवाल ना ?"

" पाठवीन !"

" आता दुसरा प्रश्न ! मी जरी तिला पाठवायला तयार असलो तरी ती मात्र तुमच्याबरोबर यायला तयार नाही !"

"........."

" रागवू नका ! मी तिला काहीही पढवलेलं नाही ! आणि तसं काही तुम्हांला वाटू नये म्हणून मी असं म्हणतो की, आपण आपल्या जातीची काही वृद्ध मंडळी बोलवू, पंचायत भरवू आणि पंच देतील तो निर्णय आपल्याला दोघांना बंधनकारक राहील असं ठरवू. मग भले निर्णय तुमच्या बाजूनं लागला तरी तो मी मंजूर करीन. आहे कबूल ?"

" कबूल आहे ! पण जयपाल कुठाय ?"

" ती तिच्या मैत्रिणीकडे गेली आहे, येईलच आता इतक्यात; आणि नाही आली तरी पंचांसमोर तुम्ही आणि मी असताना तिने हजर होण्याची जरुरी नाही!"

" जरुरी आहे ! आणि ती पंच मंडळीपुढे आलीच पाहिजे ! कशावरून तुम्ही तिला पढवून ठेवली नसेल ? तिला जे काय बोलायचंय ते तिनं माझ्यासमक्ष पंचांसमोर बोललं पाहिजे ! मी नवरा आहे तिचा !"

" बरं ऽऽ कबूल ! आपण जरा बसा, मी सारी पंच बोलावतो आणि मग तिलाही बोलावतो !"

सरदार लाभसिंग बाहेर पडले ! आणि अंबाल्याच्या शीख जमातीपैकी नामवंत, चारित्र्यसंपन्न, सधन आणि वयोवृद्ध-विचारी अशा पाच वयोवृद्ध मंडळींना घेऊन आले ! या पाच पंचांपैकी दोन होते सरदार निर्मलसिंग आणि सरदार अमरनाथ ! पंच मंडळी आपापल्या इतमामाने बसली ! बाकीची मंडळी उगाचच बसली ! त्यांना सभेत बोलण्याचा अधिकार नव्हता ! बोलण्याचा अधिकार होता तो फक्त अमरिकसिंग, सरदार लाभसिंग, जयपालकौर आणि पंच यांनाच ! पंचांनी वस्तुस्थिती व प्रश्न समजावून घेतला. सरपंच म्हणून एकमताने सरदार अमरनाथ यांची निवड झाली ! आणि जयपालकौरला बोलावणे पाठवले गेले ! जयपालकौर आली ! चेहऱ्यावर सात्त्विक संताप, असहाय्यता आणि दुःख स्पष्ट दिसत होते !

(A hush fell over the assembly as she walked accross the courtyard, a picture of disconsolate sorrow, suppressed anger, and intense suffering.)

सभा तटस्थ झाली होती ! कुणाकडेही न बघता जयपालकौर व्हरांड्यातून पहिल्या माळ्यावर जाण्यासाठी जो जिना होता त्या जिन्याच्या मधल्या पायरीवर जाऊन सभेकडे तोंड करून बसली.

अमरिकसिगाने रागाने ओरडून तिला सांगितले,

" जयपाल ऽऽ ! इथे खाली येऊन पंचांसमोर बस !"

" मला इथून सगळं दिसतंय आणि ऐकायला येतंय. मी खाली इतक्या पुरुषांच्यांत येऊन बसणार नाही ! त्यातून पंचांनी हुकूम दिला तर येईन. तुम्ही उगाच ओरडायची गरज नाही !"

" आणि सरपंचांनी निकाल दिला की, ती इथून आम्हांला दिसत्ये, तिचं बोलणं इथं सहज ऐकू येतंय ! तिनं खाली यायची गरज नाही ! आहे तिथंच जिन्यात बसली तरी चालेल !"

अमरिकसिंग आणखी भडकला ! त्याने पहिल्यापेक्षाही मोठ्याने ओरडून विचारले, " बोल ! तू माझ्याबरोबर यायला तयार आहेत की नाही ?"

आता मात्र जयपालकौरचा संयम सुटला ! एकीकडे रागाने थरथरत, अश्रू गाळीत, रुद्ध स्वरात ती म्हणाली, " निर्लज्ज माणसा ! माझ्यावर बायको म्हणून

कायदेशीर हक्क सांगण्यापूर्वी सांग आपल्याच तोंडानं एकदा पंच मंडळींना की, तुझं पहिलं लग्न झालेलं असून तुला पहिल्या लग्नाची दोन मुलं आहेत ! सांग, पंच-मंडळींना की तू दररोज दारू पितोस ! तीसुद्धा कंट्री ! सांग पंचमंडळींना, की गेले सहा महिने तू माझा मानसिक आणि शारीरिक छळवाद मांडला होतास ! सांग पंचमंडळींना की तुझे बाहेरच्या घाणरड्या बायकांशी घाणेरडे संबंध आहेत ! सांग त्यांना की, मध्यंतरी माझी आई आजारी आहे अशा अर्थाच्या माझ्या वडिलांच्या पत्रांपैकी एकही पत्र तू माझ्यापर्यंत पोचू दिलं नाहीस, की माझ्या माहेरी कधी पत्र टाकून माझी खुशाली कळवली नाहीस ! रात्री दारू प्यायची, सकाळी उशीरा उठायचं ! ऑफिसला उशीर होईल म्हणून कसं बसं जेवून टाय बांधायचा, आपली खोटी प्रतिष्ठा सांभाळायची आणि संध्याकाळी पुन्हा दारू पिऊन घरी यायचं ! सांग ! कुठला बेवडेबाज माणूस आपल्या जवळच्या माणसांना पाच पैशाचं कार्ड टाकून आपली खुशाली कळवतो ? त्याला वेळ असतो कुठं ? त्याशिवाय दारू पचणार कशी ?"

जयपालकौरचा बांध फुटला ! ती ओक्साबोक्शी रडली आणि तिने पुढचे आणखी एक वाक्य उच्चारले की जे तिने उच्चारले नसते तर पुढचा अनर्थ कदाचित् टळला असता !

ती पुढे म्हणाली,–" आणि एवढं सगळं सहन करून मी तुझ्याबरोबर यायला तयार आहे ! पण त्यापूर्वी तू दारू सोडली पाहिजेस. बाहेरच्या बायकांचे संबंध बंद केले पाहिजेस आणि मला चांगलं वागवशील अशी तू पंचांना हमी द्यायला पाहिजेस. "

जयपालकौरचे हे शेवटचे वाक्य संपल्याबरोबर अमरिकसिंग पंचमंडळींकडे तोंड




वळवून म्हणाला, " पाहा ! पंचमंडळी ! पाहा ! ती माझ्याबरोबर यायला तयार आहे ! मी कबूल करतो की, उद्यापासून मी दारू सोडली ! बाहेरचे संबंध सोडले ! हिला मी नीट वागवीन ! आता द्या निकाल की मी हिला आत्ताच्या आत्ता माझ्याबरोबर घेऊन जाऊ शकतो म्हणून ! "

सरपंच सरदार अमरनाथ यांनी हात वर करून " जरा थांब " अशा अर्थाची खूण अमरिकसिंगाला केली ! अत्यंत हळू आवाजांत पाचही पंचांनी आपसांत चर्चा केली. निकाल ठरवला आणि निकाल सांगण्यासाठी ते तयार झाले. अमरिकसिंगाने अधीरपणाने विचारले, " काय ? नेऊ शकतो ना माझ्या बायकोला मी माझ्याबरोबर ? ती यायला तयार आहे ! "

...आणि सरपंच सरदार अमरनाथ यांनी नकारार्थी मान हलवली ! निश्चयी स्वरांत त्या वयोवृद्ध अनुभवी माणसाने सांगितले, " सरदार अमरिकसिंग ! ' मी तुमच्याबरोबर यायला तयार आहे ! ' असे वाक्य जयपालकौर बोलली ही गोष्ट खरी ! पण तेवढं एकच वाक्य ती बोललेली नाही ! त्याच्या अगोदर ती बरंच काही बोलली की जे तुम्ही नाकबूल केलं नाहीत. उलट ' उद्यापासून मी दारू सोडली, बाहेरचे संबंध सोडले आणि जयपालला नीट वागवीन ! ' असंच तुम्ही पंचांना सांगितलंत ! याचा अर्थ यापूर्वी तुम्ही पीत होता, तुमचे बाहेर संबंध होते आणि तुम्ही तिला नीट वागवीत नव्हतात असाच होतो ! प्रत्येक दारुड्या ' मी उद्यापासून दारू सोडली ' असं नुसतं सांगतो ! पण सोडत मात्र कधीच नाही ! सुरुवातीला माणूस दारू सोडत नाही आणि नंतर दारू माणसाला सोडत नाही ! जिथे बाटली आहे तिथे बाई आहेच ! आणि बाई आणि बाटली ही दोन्ही व्यसनं अशी आहेत की ' उद्यापासून सोडली ! ' असं नुसतं म्हणून ती सुटत नाहीत ! ती प्रत्यक्ष सुटावी लागतात. त्यासाठी प्रामाणिक इच्छा लागते आणि काही काळ लागतो ! आणि म्हणून आम्ही पाचही पंच एकमताने असा निकाल देतो की ' अजून एक महिनाभर जयपालकौरनं तिच्या बापाकडंच राहावं ! तुम्ही त्या काळात तुमच्या आयुष्याचे मार्ग सुधारावेत ! आणि तुम्ही खरोखरच सुधारला आहात अशी सरदार लाभसिंग यांची खात्री पटली तरच त्यांनी आपली ही नाजूक पोर तुमच्या ताब्यात बायको म्हणून द्यावी ! "

( The Punchas however passed an unanimous, conditional order that Sardar Labhsingh should direct his daughter to accompany Sardar Amriksingh, after about a period of one month, provided he is satisfied that his son-in-law is really and in fact behaving as a normal man ! And have accepted the usual conditions of society to address him as a gentleman! )

सरदार लाभसिंग पुढे झाले ! दोन्ही हात रुमालात बांधून घेऊन त्यांनी पंचांना

नमस्कार केला ! आणि तुमचा निर्णय माझ्यावर बंधनकारक आहे असे मान्य केले !

सभेचे कामकाज संपले आहे असे समजून जयपालकौर जिन्याच्या पायरीवरून उठली आणि वर चालू लागली ! तितक्यात अमरिकसिंग मोठ्याने ओरडला, " जयपाऽल ! थांब ! "

नवऱ्याकडे दुर्लक्ष करून जयपालकौर आणखी एक पायरी वर चढली ! जिवाच्या आकांताने अमरिकसिंग ओरडला, " जयपाऽऽऽल ! अजून सांगतो थांऽऽब ! "

आणि जयपालकौर त्याच्या ओरडण्याचा परिणाम होऊ न देता आणखी एक पायरी वर चढली ! अमरिकसिंगांचा संताप अनावर झाला ! क्षणार्धात त्याने खिशातून रिव्हॉल्व्हर बाहेर काढले आणि जयपालकौरवर गोळी झाडली ! जयपाल-कौरच्या उजव्या दंडातून आरपार जाऊन गोळी तिच्या बरगडीत घुसली ! एक दीर्घ केविलवाणी किंकाळी फोडून जयपालकौर जिन्याच्या वरच्या पायरीवरून खालपर्यंत गडगडत आली आणि ओटयावर रक्ताच्या थारोळ्यात पडली ! अर्धा क्षण तिथे जमलेले लोक स्तिमित झाले. काय झाले, याची अस्पष्ट जाणीव झाल्याबरोबर ते अमरिकसिंगाला धरण्यासाठी पुढे झाले ! पण अमरिकसिंग जास्त चपळ ठरला !

( For a brief moment the members of the brotherhood were petrified, they jumped at Amriksingh, but he was too quick for them ! He fired more shots in quick succession ! )




त्याला पकडण्यासाठी पुढे आलेल्या सरपंच सरदार अमरनाथ यांच्या छातीत त्याने फार जवळून गोळी घातली रक्ताची चिळकांडी उडाली ! फार मोठी उचकी दिल्यासारखा आवाज करून सरदार अमरनाथांनी डोळे पांढरे केले ! दोन्ही हात छातीवर दाबून धरीत त्यांनी स्वतःभोवती एक केविलवाणी गिरकी घेतली ! धडपडत कशाबशा ओटयाच्या पायऱ्या उतरून अंगणात आले आणि कोसळले ! इतर लोक भीतीने मागे सरले ! ओटयापासून अंगणापर्यंत रक्ताची धार पडत गेलेली त्यांनी प्रत्यक्ष पाहिली होती ! तशाही स्थितीत आपल्या मुलीजवळ जाणाऱ्या सरदार लाभसिंगांना अमरिकसिंगाने आणखी दोन गोळ्या मारल्या ! एक त्यांच्या छातीत आणि एक पोटात !

एखाद्या कुस्तीगिराने कोलांटी उडी मारावी त्याप्रमाणे नकळत सरदार लाभसिंगांनी कोलांटी उडी घेतली आणि ते जागच्याजागी खाली पडले ! सरदार लाभसिंग आपल्या मुलीपर्यंत जाऊन पोहोचू शकले नाहीत ! आणि इथून पुढे कधीही पोहोचू शकणार नव्हते !

...आता मात्र इतर लोक सैरावैरा पळत सुटले ! केव्हा कुणाला गोळी लागेल याचा नेम नव्हता ! उरलेले चारही म्हातारे पंच अक्षरशः 'जीव' घेऊन पळाले ! जिवावर बेतले तर 'म्हातारे' देखील किती वेगाने पळू शकतात याचे ते 'न भूतो न भविष्यति' असे उदाहरण होते !

पळालेल्या पंचांपैकी सरदार निर्मलसिंग हे "धावा ! धावा ! खून ! खून !" असे ओरडत अंबाला पोलीस स्टेशनमध्ये घुसले ! पळालेल्या इतरांपैकी एकाने आणखी दोन गोळ्या झाडल्याचा आवाज ऐकला ! त्याने धीर करून मागे वळून पाहिले ! अमरिकसिंग स्वतःच अंगणामध्ये खाली कोसळून पडला होता !

ड्युटीवर असलेल्या त्या तरुण आणि उमद्या सब इन्स्पेक्टर इंद्रसिंगाने तावडतोब कमरपट्ट्यात अडकवलेले भरलेले पिस्तुल काढून हातात घेतले ! कॉन्स्टेबल्सना भराभर हुकूम सोडले ! पोलीस स्टेशनवर ओळीने मांडून ठेवलेल्या भरलेल्या रायफल्स भराभर उचलल्या गेल्या ! आणि पिस्तुल घेतलेले सबइन्स्पेक्टर इंद्रसिंग, दोन हेड कॉन्स्टेबल्स, दहा कॉन्स्टेबल्स की ज्यांच्यापाशी प्रत्येकाकडे भरलेली रायफल होती, सरदार निर्मलसिंगासकट जीपमध्ये बसले ! आणि पोलिसांची ती जीप सरदार लाभसिंगांच्या घराच्या दिशेने सुसाट धावत सुटली !

(क्रमशः)

**[ पंजाब हायकोर्टाचे माजी मुख्य न्यायाधीश श्री. जी. डी. खोसला यांच्या 'A Judge's Note Book' या पुस्तकातील 'Change of Identity' या प्रकरणाचे स्वैर रूपांतर. ]**



## राज्य नाट्य महोत्सव । पुणे केंद्र

# चुरस वाढली । दर्जा खालावला

राज्य नाटय महोत्सवातील रोजच्या जागरणाने काहीसे बारगळलेले प्रेक्षक उत्साहाने रंगमंदिराकडे आले आहेत. स्पर्धेच्या प्रेक्षकांचे काही आडाखे आहेत. त्या आधारे गर्दी कमी जास्त होत असते. पूर्वानुभवांवर आधारलेल्या या आडाख्यांप्रमाणे आजचा पी. डी. ए. चा प्रयोग रंगला पाहिजे.

पण प्रत्यक्षात तसे घडत नाही. प्रयोग नेहमीचे समाधान देत नाही. आणि प्रेक्षक निराश होऊन रंगमंदिर सोडतो.

राज्य नाटय महोत्सवात पुणे केंद्रामध्ये झालेल्या बहुसंख्य नाटकांचे प्रयोग यंदा निराशाजनक झाले. नावलौकिक असलेल्या ज्या नाटय संस्थांकडून थोडचा-फार अपेक्षा होत्या अशा संस्थाही पूर्ण समाधान देऊ शकल्या नाहीत.

एक काळ असा होता की, पुणे केंद्रात नाशिक, वाई, सातारा, बार्शी, नगर येथील नाटय संस्थांचे प्रयोग होत असत. पुण्याचे प्रयोग एका बाजूला आणि नाशिकचा एखाद दुसरा अपवाद वगळता बाकी सर्व दुसऱ्या बाजूला असे स्वच्छ गट पडत. स्पर्धेचे स्वरूप व्यापक झाल्यावर पुणे केंद्राचा भार हलका होऊन पुण्याला स्थानिक केंद्राचे स्वरूप देण्यात आले. या बदलत्या स्वरूपामुळे येथील स्पर्धेतील चुरस वाढेल असे प्रारंभी वाटले होते.

तथापि या बाबतीत अपेक्षा पूर्ण झाल्या नाहीत. गेल्या दोन वर्षांचे निकाल पाहता उत्कृष्ट, समाधानकारक आणि अती सामान्य, अशा तीन ठळक गटांमध्ये सर्व प्रयोग विभागले गेले.

यंदाच्या स्पर्धांचे वैशिष्टय हे की, उत्कृष्ट प्रयोग सादर करणारे पी. डी. ए. कलोपासक हे संघ एक पायरी वर जाण्याऐवजी एक पायरी खाली उतरले, तर भरत-नाटय संशोधन मंदिर, सरस्वती नाटय संघ आणि सरस्वतिमंदिर नाटयसंघ या संस्थांनी पूर्वपरंपरेपेक्षा आपला दर्जा सुधारून पी. डी. ए., कलोपासक यांच्या मक्तेदारीला आव्हान देण्याचा प्रयत्न केला. या बदलत्या परिस्थितीमुळे चुरस वाढली तरी स्पर्धेचा कलात्मक दर्जा मात्र खालावला.

## वेगळे नाटच, आकर्षक प्रयोग

महाराष्ट्रीय कलोपासक या संस्थेने प्रा. यशवंत केळकर यांच्या 'अडीच घर वजीराला' या नाटकाचा प्रयोग सादर केला.

उत्पाल दत्त यांच्या 'मेघ' या बंगाली नाटकावर आधारित असलेले हे नाटक मराठी रंगभूमीला नवीन आणि येथल्या प्रेक्षकांना पचायला काहीसे कठीण खरे. या अडचणी लक्षात घेऊन प्रयोग बसवण्यात आला होता.

समर नावाचा तरुण लेखक निर्दोष खुनाची कादंबरी लिहिण्यासाठी धडपडत असतो. लिखाणाची भट्टी मनाप्रमाणे जमत नाही. व्यक्तिगत आयुष्यातील पूर्व घट-नांचा पिच्छा सुरू होतो आणि निर्दोष खुनाची कादंबरी गुंफण्यात रंगून गेलेला समर आपल्या पूर्वायुष्यातील आठवणींमध्ये बुडून जातो. कागदावर जे उतरत नाही ते मनात घर करून बसते. स्थल-कालाच्या मर्यादा विरून जातात. समर एका वेगळ्या जगात जाऊन खुनाची अनुभूती घेतो. त्याच्या मनावर या घटनांचा पगडा इतका जबरदस्त असतो, की प्रत्यक्षात न घडलेल्या घटना आपल्या हातून खरोखरच घडल्या आहेत, अशी त्याची समजूत होते. आणि या चक्रातून बाहेर पडण्यासाठी समर जिवाच्या आकांताने धडपड करू लागतो. घटनांची हळूहळू उकल होत जाते. आणि समरला सर्व घटनांचा खुलासा होतो.

रहस्य, मानसिक ताण यांमुळे निर्माण झालेली विकृती आणि नाटकाच्या उत्तरा-र्धातील हलका फुलका भाग या सर्व बाबी दिग्दर्शक राजा नातू यशस्वीपणे दाखवू शकले आहेत.

प्रकाश आणि ध्वनी यांचे साहाय्य घेऊन, तसेच काही दृश्य बारकावे नोंदवून त्यांनी समरच्या हातून घडलेल्या घटना या त्याच्या कल्पनाशक्तीतून निर्माण झाल्या असून वास्तवतेशी त्यांचा संबंध नाही, हे यशस्वीपणे सूचित केले आहे. तथापि हा फरक समजू न शकल्याने अनेक प्रेक्षक घडलेल्या घटना वास्तव समजून चाल-तात. आणि नाटचाच्या उत्तरार्धाशी त्यांचे गणित जमत नाही. वातावरण-निर्मिती हे प्रयोगाचे अजून एक वैशिष्टय. समरच्या घरातील या घटना चोवीस तासांतील आहेत. या काळात बाहेर विजा कडकडत आहेत. वादळ सुरू आहे. पाऊस आहे. या सर्व बाबी तपशीलवार नोंदल्या आहेत. काही दोषही राहून गेले आहेत. उदा-हरणार्थ अशा वातावरणातून बाहेरून छत्र्या घेऊन येणाऱ्या पात्रांच्या छत्र्या ओल्या नकोत का? एखादे पात्र अगदी पायाचा चिखल पायपुसण्याला पुसते, तर बाकीच्या-कडून त्यांची दखल घेतली जात नाही.

दार उघडल्यावर प्रत्यक वेळी बाहेरील वातावरण जाणवेल अशी दक्षता घेतली आहे. त्याच्या मर्यादा केवळ ध्वनिपुरत्याच मर्यादित का? जिन्याचा लाकडी गोळा केवळ खून करण्यासाठी सुटा ठेवला आहे का, आणि त्या गोळ्याच्या एका तडाख्याने खून होणे शक्य आहे का, अशा काही शंका मनात येतात. तथापि

तंत्राचा वापर करून या दोषांवर पांघरूण घालण्यात आले आहे.

कलाकारांमध्ये सर्वोत्कृष्ट ठरतात—यशवंत महाडिक. क. मास्टर छोटू या कलावंताच्या या गुणी चिरंजिवांनी प्रयोगावर स्वतःची पकड ठेवली आहे. नाटककार आणि दिग्दर्शक यांनीही 'समर'ला भरपूर वाव दिला आहे. त्याचा फायदा महाडिक यांनी अचूकपणे घेतला आहे. धनंजय गोळे (प्रवीण) यांचा अपवाद वगळता अन्य कलाकार फिके वाटतात.

नाटकाची प्रकृती लक्षात घेऊन आनंद पै यांनी उभारलेले नेपथ्य प्रयोगाची रंगत वाढवते.

स्पर्धेतील तेरा नाटकांपैकी बारा नाटकांना मागे टाकण्याचे सामर्थ्य या प्रयोगात आढळून आले. मात्र असे यश मिळाल्यास शाबासकीची थाप देताना त्यांच्या यशामध्ये, त्यांच्या मर्यादित यशाबरोबरच चांगल्या प्रतिस्पर्ध्यांचा अभाव हेही एक कारण आहे, याची जाणीव करून द्यावीशी वाटते.

## हे स्वप्न मानवाचे

जुने असले तरी नाटक वसंतराव कानेटकरांचे. सादर करणार पी. डी. ए. आणि तेही स्पर्धेसाठी. गर्दी जमवण्यासाठी एवढ्या बाबी पुरेशा होत्या. देवांचे मनोराज्य हे प्रा. वसंत कानेटकर यांचे नाटक पूर्णपणे अयशस्वी ठरले होते. स्पर्धेच्या निमित्ताने याच नाटकाला पुनर्जीवन देण्याचा प्रयत्न प्रा. भालबा केळकर यांनी केला. तथापि हा जुगार निदान सर्वसामान्य प्रेक्षकांच्या दृष्टीने यशस्वी झाला नाही. समर्थ कलावंत आणि तंत्रावरील प्रभुत्व यांमुळे नाटक कदाचित मुंबईच्या अंतिम फेरीकडे सरकेलही. तथापि प्रेक्षकांना आकर्षित करण्याचे सामर्थ्य प्रयोगात नाही.

स्पर्धेमध्ये झालेल्या प्रयोगातील सर्वांत ठळक दोष असा की, नाटकाची प्रकृती प्रेक्षकांना समजलीच नाही. "का? व कशासाठी ?" या प्रेक्षकांच्या मनातील शंका तशाच अनुत्तरित राहिल्या. प्रा. केळकर यांच्या दिग्दर्शनाची ही शोकान्तिकाच म्हणावी लागेल. तंत्रसामर्थ्यावर 'स्वर्ग' रंगभूमीवर उभा करण्यात पी. डी. ए. यशस्वी झाली तरी केवळ नेपथ्य पाहण्यासाठी प्रेक्षक येत नसतात. सुरेश बसाळे (वरुण) यांनी नाटकाचा प्रारंभही निराशाजनक केला. दोन चार तांत्रिक चुकाही आढळून आल्या. परंतु जव्वार पटेल (प्रियर्शन); सौ. सेवा चौहान (चारुशिला) व केशव घुळे (धनंजय) या कलावंतांनी प्रयोग सावरला.

दैवाने खैर केली आणि अंतिम फेरीत प्रवेश मिळालाच तर अधिक मेहनत घेऊन ही मंडळी दोष झाकून टाकतीलही. परंतु येथील प्रयोगात मात्र पी. डी. ए. ने निराशाच केली.

भरत नाट्य संशोधन मंदिराने भरपूर मेहनत घेऊन 'वाल्मिक' स्पर्धेमध्ये उतरवले. कावाडकष्ट करून प्रामाणिक आयुष्य जगण्याची वाल्याची धडपड सुरू आहे. पण परिस्थितीने तो गांजून गेला. सर्व मार्ग संपल्यावर, आणि नको त्या वेळी नको तो

दोस्त भेटल्यावर वाल्या दरोडेखोर बनतो. दरोडेखोरीच्या आयुष्यातून येणारी शोकान्तिका त्याच्या वाटयाला येते. संतापाच्या भरात वाल्या जन्मदात्या पित्याचा खून करतो. आपली म्हणवणारी माणसे निर्भर्त्सना करू लागतात. आणि कृत-कर्माचे प्रायश्चित्त घेण्यासाठी वाल्या निघून जातो. कथेचा वकूब मर्यादित असल्याने कुटुंबापुरत्याच मर्यादित असलेल्या या कथेला गावकीतील घटनांचे आणि त्यामुळे आवश्यक ठरलेल्या व्यक्तिरेखांचे वेष्टण देऊन नाटक फुलवले आहे.

त्यामुळे कथावस्तू कमकुवत झाली आहे. नाटकातील या दोषांवर सफाईदार प्रयोगाचे पांघरूण घालण्याचा प्रयत्न पुष्कळच यशस्वी झाला आहे. रंगभूमीवर उभारलेली वाल्याची व गुण्याची झोपडी, खेडेगावातून प्रत्यक्ष असते असे आजूबाजूचे जिवंत वातावरण, प्रकाशयोजनेद्वारा सूचित केलेली कालमर्यादा आणि उत्तम कलावंतांचा नटसंच यामुळे एक सुविदित प्रयोग पाहावयास मिळाला. लहान सहान कलावंत—उदा. बुध्या ( माधव गाडगीळ ) पांग्या, रोंग्या, वाव्या, देव्या इत्यादी बच्चे कंपनी—या सर्वांवर भरपूर मेहनत घेतल्याचे जाणवले. कथा प्रवाहा-बरोबर अपेक्षित असलेले बदल, नेपथ्यामध्ये थोडकेच परंतु अचूक फेरफार करून चांगल्या प्रकारे सूचित केले होते.

सर्व कलाकार एक संघ म्हणून उभे राहू शकल्याने प्रयोगाची उंची वाढली. दिग्दर्शकाने गुण्याला जरा दाबला असता तर उपकारक ठरले असते. ज्यांच्या नावाचा उल्लेख केल्याखेरीज पुढे जाणे शक्य नाही अशांमध्ये जगन्नाथ आठवले एम. ए., एम. एस्. सी., पी. एच. डी. ( नाना ), उदय पाटील ( गुण्या ) व कुन्दा स्मार्त ( नर्मदा ) आणि पद्मा देशमुख ( भागू ) यांच्या नावांचा समावेश करावा लागेल. माझ्या व्यक्तिगत दृष्टिकोनातून या संघाला दुसऱ्या क्रमाकांने अंतिम फेरीची वाट मोकळी झाली पाहिजे. तथापि तसे झाले नाही तरी प्रेक्षकांच्या पसंतीचा शिक्कामोर्तब या संघाच्या प्रयोगावर झाला आहे हे निर्विवाद. नाटक स्पर्धेच्या दृष्टिकोणातून निवडले असल्याने आर्थिक दृष्टया प्रयोग यशस्वी होतील अशी अपेक्षा करू नये.

## ‘ कांचनमृग ’

सरस्वती नाटय संघाच्या ‘ कांचनमृग ’ या प्रयोगावरही प्रेक्षक संतुष्ट झाले. प्रयोगाच्या यशामध्ये वसंत लोणकर यांचा वाटा मोठा आहे. रणजित देसाई यांनी लिहिलेले हे नाटक स्पर्धेत पूर्वी अयशस्वी ठरले होते. या नाटकाला हात घालून त्याचा समाधानकारक प्रयोग देण्यात वसंत लोणकर यांनी मिळवलेले यश कौतुका-स्पद म्हणावे लागेल.

नाटकाचा विषय प्रचलित परिस्थितीवर आधारलेला आहे. प्रामाणिकपणे काम करण्याची इच्छा असूनही सरळ मार्गाने जगणे अशक्य आहे ही गोष्ट लक्षात आल्या-वर केवळ नाइलाज म्हणून एक जबाबदार सरकारी अधिकारी रुळलेल्या वाटेने

जाऊ लागतो. ही अपरिचित वाट त्याला गोत्यात आणते व त्याच्या जीवनाची शोकान्तिका घडवते.

वसन्त लोणकर यांनी निवडलेला नटसंच पुष्कळच समाधानकारक होता. प्रयोगावर त्यांनी बरीच मेहनत घेतल्याचेही जाणवत होते. कलाकारांपैकी पुरुषोत्तम सहस्रबुद्धे ( श्रीधर ), नाना ( वसंत लोणकर ), केशव ( बाबू गयावळ ) यांचा विशेष प्रभाव पडला. अन्य कलावंतांनीही उत्तम साथ दिली.

प्रयोगाला नेपथ्य साजेसे होते. श्रीधरच्या आर्थिक परिस्थितीतील बदल वसंत लोणकर यांनी चांगल्या प्रकारे सूचित केला. विशेषत: यासाठी त्यांनी योजलेला कॉलबेलचा वापर चांगला वाटला. श्रीधरवर कोसळलेल्या संकटकाळी वापरलेली दिव्यांची उघडझाप कृत्रिम वाटली तरी परिणामकारक होती हे नाकारता येणार नाही. भास्कर चंदावरकर यांनी दिलेले संगीत नाटकाला उपकारक ठरले. 'हे स्वप्न मानवाचे' आणि 'अडीच घरं', या दोन बिनीच्या नाटकांनाही चंदावरकरांनी संगीत दिले. नाटकाचा आशय लक्षात घेऊन संगीत देण्याचा त्यांचा प्रयत्न स्तुत्य वाटला. नेपथ्याचे श्रेय माधव भट व सुभाष निंबाळकर यांच्याकडे जाते.

## अनंत ओक दिग्दर्शित "जटायू"

स्पर्धेमध्ये सलग दोन वर्षे सुंदर प्रयोग सादर करून श्री. अनंत ओक यांनी स्वत:-संबंधीच्या अपेक्षा भरपूर वाढवून ठेवल्या होत्या. या वर्षी गो. गं. पारखी यांचे 'चाफा बोलेना' हे नाटक त्यांनी 'मीही आहे एक जटायू' या नावाने स्पर्धेत उतरवले. तुलनाच करायची तर गेल्या वर्षापेक्षा ओक यांची घसरगुंडी झालेली दिसली. त्यांच्या संचापैकी काही चांगल्या कलावंतांनी त्यांच्यापासून फारकत घेतल्याचे दिसून आले, तर काही चांगले कलावंत त्यांच्या नटसंघाकडे आल्याने गमावलेली ताकद काही प्रमाणांत भरून आली.

स्वत:ची दु:खे दाबून एकाकी जिणे जगणाऱ्या डॉक्टरांची कथा ओक यांनी समर्थपणे सांगितली. सर्जन कामत यांची प्रमुख व्यक्तिरेखा डॉ. अनंत फाटक यांनी अगदी मनापासून केली. तथापि या भूमिकेला ते संपूर्ण न्याय देऊ शकले नाहीत. त्यांच्या मुलीची भूमिका रजनी उमराणीकर यांनी केली. परंतु त्यांच्या अभिनयात विलक्षण कृत्रिमता ओतप्रोत भरली होती. तुकाराम आणि ड्रायव्हर यांचे अकारण लांबलेले प्रवेश पाहताना आपण एखादा फार्स तर पाहत नाहीना, अशी शंका मनात येऊन गेली. नाटकाची प्रकृती या दोन्ही पात्रांना उमगलीच नाही. डॉ. कर्णिकांची छोटी भूमिका समाज कल्याण खात्याचे एक अधिकारी श्री. मु. रा. लोणकर यांना मानवलेली दिसली. अन्य पात्रे ठाकठीक होती. एकत्रित परिणामाच्या (Total impact) दृष्टीने प्रयोग पूर्ण समाधान देऊ शकला नाही. प्रकाश व ध्वनी यांचा वापर जाणकाराच्या कौशल्याने केल्याचे दिसून आले. परंतु प्रयोगाची झेप स्पर्धेतील यशाची उंची गाठण्याच्या दृष्टीने अपुरीच ठरली.

या पाच प्रयोगांबरोबरच स्पर्धा संपल्या. अन्य आठ प्रयोगांपैकी ज्यांच्या परिश्रमांचे कौतुक केले पाहिजे अशांमध्ये कामगार कल्याण केंद्र या संस्थेच्या 'राहिले ते गंगाजळ' या नाटकाचा उल्लेख करावा लागेल. नाटकामध्ये काम करणाऱ्या एका कलावंताला ताप भरल्याने नाटक होते की नाही अशी शंका होती. पण नाटक झाले आणि रुचावे इतपत चांगले झाले. सर्व कलावंतांचा वकूब साधारणपणे एका पातळीचा, समज असलेले श्रीपाद गोखले यांचे दिग्दर्शन. प्रयोगाला साजेसे नेपथ्य देण्याचा प्रामाणिक प्रयत्न आणि कलावंतामधील सहकार्यभाव यामुळे ' राहिले ते गंगाजळ 'चा प्रयोग पुष्कळच नेटका झाला.

'कला भारती ' या संस्थेने दोन वर्षांची विश्रांती घेऊन स्पर्धेच्या रिंगणात पुन्हा पाऊल ठेवले. परंतु त्यांची पातळी मात्र त्यांच्या पूर्वप्रयत्नाइतकीच राहिली. 'तीन चोक तेरा ' हा शाम फडके यांचा फार्स या मंडळींनी केला. आणि प्रेक्षकांची घटकाभर करमणूक केली. मुरलीधर कानविन्दे (वासुअण्णा) व राजेंद्र देवगावकर (राजा शिंदे) यांची कामे चांगली झाली. अनंत पै यांचे नेपथ्य वाईट नसले तरी त्यांच्या नावाला साजेसे नव्हते.

**संपदा थिएटर्स :** नकटीच्या लग्नाला: संस्थेच्या मागील प्रयत्नांपेक्षा प्रगती. रत्नाकर टाकळकर (दचके), वसुधा टाकळकर (लता) व किसन सेवक (वाघ) समाधानकारक.

**हौशी कलाकार संघ :** विधिसंकेत :– संगीताची परंपरा कायम ठेवली. परंतु प्रयोगाचा दर्जा खालावला. चुकीची पात्रयोजना, पाठांतरातील गलथानपणा आणि ठिसूळ कथानक यांमुळे निराशाजनक प्रयोग. थोडासा दिलासा मिळाला तो घवघव्याच्या कृत्रिम परंतु वेधक दृश्यामुळे.

**संस्कृत विद्या मंदिर :** अपराध मीच केला : प्रयोग पाहिलेल्या प्रेक्षकांची प्रतिक्रिया हीच.


स्वादिष्ट मिठाईसाठी आम जनतेची निवड

# शर्मा स्वीट मार्ट

दत्त मंदिराशेजारी, मंडई रस्ता, पुणे २.

बाळराज नाट्यसंघ (बार्शी) : माझे घरटे माझी पिले : चांगला प्रयोग करण्याचा प्रामाणिक प्रयत्न. अभिनयातील कृत्रिमता आणि प्रमुख कलावंतांची अशुद्ध वाणी हे ठळक दोष. स्त्री कलावंत व्यावसायिक निवडल्याने पुरुष व स्त्री कलावंतांच्या कलाविष्कारामध्ये जाणवण्याइतकी तफावत. बाहेरगावचा एकमात्र प्रयोग हेच वैशिष्टय.

**भारती कलावृंद** : आमाळा, आधार, कुणाचा : जुने नाटक नवीन नावाने आणण्याचा तिसरा प्रयत्न. हौसेला मोल नाही हेच खरे.

**कॉस्मॉपॉलिटन कल्चरल सेंटर** : माझ्या बापाची पेंड : नाटकाचे कथानक सांगणारास शंभर रुपयाचे पारितोषिक ! एका प्रेक्षकाची पहिल्या अंकानंतर प्रतिक्रिया-या नटसंघाला पहिले पारितोषिक द्या !

अट फक्त एकच—नाटकाचा प्रयोग येथेच थांबवा !

दोन डिसेंबर ते अठरा डिसेंबर अशा सतरा रात्रींत १३ नाटके होऊन स्पर्धांवर पडदा पडला आणि उतू जाणाऱ्या उत्साहाने निनादलेले गंधर्व रंगमंदिर व्यावसायिक रंगभूमीच्या सेवेसाठी पुन्हा हजर झाले.

हा लेख संपवण्यापूर्वी स्पर्धांचे एकंदर स्वरूप लक्षात घेता एक दोन सूचना करतो :

महाराष्ट्रीय कलोपासक आणि पी. डी. ए. या संस्थांनी स्पर्धेतील सर्वोच्च बहुमान मिळवले. पी. डी. ए. ने तर हा मान दोन–तीन वेळा मिळवला. या सन्मानाचे वाटेकरी असलेल्या व्यक्तींनी आता आपण होऊन बाजूला व्हायला नको का ? स्वत:च्या व्यक्तिगत कौशल्याची भरपूर दाद घेतल्यानंतर स्पर्धेच्या रंगभूमीवरून यांनी आपण होऊन दूर का होऊ नये ? या संस्थांनी स्पर्धेतून भाग घेऊ नये असे मला मुळीच सुचवायचे नाही. संस्था राहाव्यात, व्यक्ती बदलाव्यात ही अपेक्षा आहे. पी. डी. ए. चे सूत्रचालन भालबा आणखी किती दिवस करणार ? कलावंतांशी मतभेद झाले, संस्थेमध्ये घरभेदेपणा सुरू झाला तरी चालेल पण मी गादी सोडणार नाही, हा अट्टाहास कशासाठी ! या जुन्या जाणत्या पोक्त मंडळींनी आता बाजूला उभे राहून मार्गदर्शन करावे. अगदी हौसच असली तर निदान स्पर्धेची रंगभूमी तरी मोकळी करावी. मुंबईच्या मातब्बर संस्थांतून स्पर्धेत उतरलेली अनेक मंडळी आपण होऊन बाजूला झाली आहेत. मग पुण्याच्या लोकांनी हा कित्ता का गिरवू नये ? त्रयस्थ पत्रकाराला नावनिशीवार हे सांगण्याची वेळ यावी हे दुर्दैव. अपेक्षा इतकीच की जुन्या जाणकारांनी माझ्या या प्रामाणिक भावनेने केलेल्या सूचनेचा विचार करावा.

**शरद गोखले**

# तुमचे भविष्य आमचा अंदाज

श्री. गो. जोशी
सायनाचार्य

दि. ४ ते १० जानेवारी १९६९ चे राशि भविष्य

**मेष** : तुम्हांला साडेसाती सुरू आहे, पण ते केवळ बुजगावणे आहे, असा आपणांस प्रत्यय यायला लागेल. अशा साडेसातीतच निर्धार, निष्ठा, दुर्दम्य आशावाद यांचा उद्‌भव होत असतो.

सूर्य भाग्यस्थानी आणि शुक्र लाभस्थानी एवढा योगही तुमच्या प्रगतीचा मार्ग अनिर्बंध करण्यास उपयोगी पडेल.

हा सर्व आठवडा खूपच घाईगर्दीचा. धावपळीचा जाणवेल, अनेक स्थगित कामांत गती घ्यावे लागेल. यांत्रिक-विद्युत् क्षेत्रांतील व्यक्तींना तर हा पर्वकालच ठरेल.

दि. ७ ते ९ हा अपेक्षा साफल्याचा काल.

**वृषभ** : ग्रहांनी अनुकूल कौल दिलेला आहे आणि आपला पिंडही प्रयत्नवादी आहे. आपले जीवन आता गतिमान बनण्यास यापेक्षा अधिक काय हवे ? पाचव्या गुरूचे महत्त्व या आठवड्यापासूनच प्रत्ययाला यायला लागल.

नोकरीधंद्यातील पेचप्रसंग सुटतील एवढेच नव्हे तर त्यातील प्रगतीचे स्थानही आपणांस एकाएकी मिळून जाईल.

व्यापारधंद्यात साहस करण्याची आपली प्रवृत्ती आता परिणामी लाभाचीच ठरेल.

स्थावराच्या उलाढाली मोठ्या प्रमाणात व्हाव्यात. कौटुंबिक कार्येही निर्णायक स्वरूप धारण करू लागतील. अपेक्षा बऱ्याच प्रमाणात सफल होतील.

दि. ८ ते १० या वेळी अपेक्षित लाभ पदरी पडावेत.

**मिथुन :** मंगळाची अनिष्टता पूर्वीच संपुष्टात आलेली आहे. आता शुक्रही भाग्यात आलेला आहे. तुमच्या मार्गातील साऱ्या अडचणी आता दूर व्हायला लागतील आणि प्रगतीचे नवे मार्ग दृष्टिक्षेपात यायला लागतील. गेल्या महिन्याभरातील साऱ्या व्यथा विवंचना मिटू लागल्यामुळे नव्या जोमाने, उत्साहाने पुढे पाऊल टाकले जाईल.

या आठवड्यात दूरच्या प्रवासाचे प्रस्थान ठेवले जाईल. संगीत, नाट्य-नृत्य या क्षेत्रांतील व्यक्तींना तर या वेळचा भाग्यस्थ शुक्र हवं ते देऊन जाईल. सामाजिक क्षेत्रातील तुमचे श्रेष्ठत्व निरपवादपणे सिद्ध होईल.

प्रामुख्याने दि. ७ ते ९ या कालावर विशेष लक्ष केंद्रित करा.

**कर्क :** या आठवड्यातील सूर्य-शनी केंद्र, त्याचबरोबर चौथा मंगळ, अशा दुहेरी अनिष्टतेला आपणांस या वेळी तोंड द्यावे लागणार आहे. कौटुंबिक अनारोग्य, सांपत्तिक ताण, व्यावसायिक पेचप्रसंग इत्यादी अनेक प्रकार या कालात अनुभवावे लागतील.

या काली प्रत्येक गोष्ट फारच सावधपणाने करायला हवी. आखलेले वेळापत्रक चुकेल, सारी कामे गतिशून्य बनू लागतील.

इष्ट मित्रांकडून हातोहात फसले जाल, प्रत्येक गोष्ट स्वतःच केलीत तरच थोडेफार यश मिळण्याची शक्यता. दूरचा प्रवास-स्थानांतर बदल या गोष्टी प्रकर्षाने टाळा.

दि. ६–७–८ थोडाफार यशदायी.

**सिंह :** कर्तृत्व, बुद्धिमत्ता, सामाजिक प्रतिष्ठा या सर्वांना उत्थान देणारी ग्रहरचना निर्माण झालेली आहे. मंगळ पराक्रमात, गुरू धनस्थानात, सूर्य भाग्यात. सारीच ग्रहरचना अशी आहे की, या काली तुमच्या कित्येक दिवसांच्या योजना आता यशस्वी ठरू लागतील.

अनपेक्षित लाभ, नोकरीधंद्यातील प्रतिष्ठेचे स्थान, राजकीय क्षेत्रातील आघाडीचा मान सारे काही अपेक्षेबाहेर लाभावे.

नव्या व्यवसायक्षेत्रात पाऊल पडेल, धनिकांचे सहकार्य लाभेल, कला-साहित्याच्या क्षेत्रात आवाज उठू लागेल. तुम्हांला आता कोणत्याही क्षेत्रात प्रतिस्पर्धी असा उरणारच नाही.

दि. ६–७–८ या कालाची नोंद ठेवा.

**कन्या :** एकटा गुरू तुमच्या बाजूस उभा आहे एवढे बस्स ! इतर ग्रहांच्या सहानुभूतीची पर्वा करण्याची गरजच नाही.

हा गुरू तुमचे महत्त्व वाढवील, सामाजिक प्रतिष्ठा उंचावील, व्यवसाय-

धंद्यातील नव्या तंत्राचा अंगीकार करायला प्रवृत्त करील. या काली संपूर्ण स्वास्थ्य जरी लाभले नाही तरी अपेक्षेप्रमाणे सारे काही घडू लागेल.

नोकरीतील विशेष प्रतिष्ठेचे स्थान तुमच्यासाठी राखून ठेवले जाईल, राजकीय क्षेत्रातील तुमचे महत्त्व वाढीस लागेल.

व्यापारधंद्यात फार मोठे साहस करण्यास मात्र उद्युक्त होऊ नका. दुसरा मंगळ त्या बाबतीत तुमच्याशी सहकार्य करील असे दिसत नाही.

दि. ४ ते ६ या कालाचे महत्त्व विशेषत्वाने जाणवेल.

**तूळ** : सूर्य-शुक्रांचे सहकार्य मिळू लागलेले असल्यामुळे अनिष्ट मंगळाची नांगी ठेचली जाईल. नैराश्य, उद्विग्नता, माघार घेणे इत्यादी सारे प्रकार आता आपण विसरू शकता.

चित्रपट व्यावसायिकांना येथूनच काही भरीव व योजनाबद्ध कार्य करण्याची संधी लाभेल. साहित्य, वृत्तपत्रव्यवसाय करणाऱ्या व्यक्तींनाही हे दिवस पर्वणी-सारखे वाटू लागतील.

सांपत्तिक लाभ आजच फारसा झाला नाही तरी, भविष्यकाल निश्चितच अनुकूल असण्याची प्रसादचिन्हे या आठवड्यापासूनच दिसू लागतील.

रेंगाळलेली अनेक कामे हातावेगळी होऊ लागतील, आरोग्याची विवंचना मिटू लागेल.

दि. ६–७–८ येथूनच प्रगतीकडे पावले पडू लागावीत.

**वृश्चिक** : गुरू अकरावा पण मंगळ बारावा असे परस्परविरोधी वातावरण आपण अनुभवू लागाल. या ग्रहस्थितीचा सरळ अर्थ असा आहे की, कोणत्याही कार्यात यश मिळविण्यासाठी अविश्रांत परिश्रम करावे लागतील. विरोधकांना फारसा वाव मिळू नये म्हणून सारे व्यवहार सावधपणे करावे लागतील.

मानसिक स्वास्थ्य हरवल्यासारखे वाटेल, केव्हा केव्हा चित्तवृत्ती प्रक्षुब्ध झाल्या-सारखे वाटू लागेल.

व्यवहारात संघर्ष निर्माण होऊ नयेत याकरता शक्य तेथे जुळते–मिळते घ्यायची प्रवृत्ती ठेवा. दूरचा प्रवास टाळा.

दि. ८ ते १० या कालात अनेक अनुकूल घटना घडू लागतील.

**धनु** : तुमच्या राशीमधूनच सूर्यासारख्या तेजस्वी ग्रहाचे संचलन सुरू झाल्याने आपण एकदम प्रकाशात याल. नोकरीधंद्यात असे काही आकर्षक कार्य कराल की, त्यामुळे अनेकांच्या नजरा तुमच्या रोखल्या जातील.

चौथ्या शनीचे पितळ उघडे पडलेले आहे. त्याच्या अस्तित्वाची दखल घ्यायची गरज भासणार नाही.

स्थावरचा पेचप्रसंग सुटल्यासारखा वाटू लागेल, उद्योगधंद्यात नव्या अभिनव योजना कार्यान्वित करण्याचा प्रयत्न सुरू होईल.

दि. ७ ते ९ या कालात अनेक कामे हातावेगळी होतील.

**मकर** : ग्रह अनुकूल आहेत की नाहीत याचा आता आपणांस विचार करावा लागणार नाही. ते आता सतत अनुकूलच राहणार आहेत. गरज आहे फक्त प्रयत्नांची. निसर्गाची संपूर्ण अनुकूलता असल्यामुळे थोडयाशा प्रयत्नांनीही घवघवीत यशाचा वाटा आपणांस उचलता येईल.

वेदांत, अर्थशास्त्र, राजशासन इत्यादी विषयांत आपणांस प्राविण्य संपादता येईल. नोकरीधंद्यात तर आजवर कधीही न मिळालेले यश आपण मिळवू शकाल.

दूरचा प्रवास घडेल. सामाजिक प्रतिष्ठा उंचावेल.

दि. ८ ते १० या कालावर लक्ष केंद्रित करा.

**कुंभ** : मंगळ भाग्यस्थानी आला आणि त्याने तुम्हांला एक नवी दृष्टी दिली. नवी दिशा दाखविली. शुक्र–सूर्य सारे ग्रह तुमच्यावर प्रसन्न आहे. जी काही थोडी-फार शिल्लक आहे तिची दखल घेण्याची गरजच नाही. या आठवडयात दूरच्या प्रवासाचे प्रस्थान नव्या ठेवावे लागेल. बदली-बढतीचे योग दृष्टिक्षेपात यायला लागतील. अनेक योजना घेऊन व्यवसायक्षेत्रात पाऊल पडेल.

तुमच्या अभिजात कलाप्रवृत्तीला याच कालापासून उत्थान मिळेल. प्रतिभेचा उन्मेष बहरेल, उत्स्फूर्त लेखन हातून घडेल.

दि. ६ ते ८ या कालाचे विशेष स्मरण ठेवा.

**मीन** : तुमचे नष्टचर्य संपले असे अजूनही म्हणता येणार नाही. काहीना काही अडी-अडचणींना तोंड द्यावे लागेल. प्रकृती, पैसा, प्रतिष्ठा या बाबतींत विवंचना सतत जाणवायला लागतील.

साडेसातीचा उग्र काल संपलेला असला तरी काही काल आपणांस जपूनच वागावे लागणार आहे.

नोकरी-धंद्यात कोणत्याही क्षणी पेचप्रसंग वाढू लागतील. अंदाज फसतील, लक्ष्मी रुसेल, दुर्दैव हसेल, दविक उपासनेवर श्रद्धा असेल तर थोडेफार लक्ष द्याल तर हा अनिष्ट काल निर्धाराने टाळू शकाल.

दि. ५–७–९ अनुकूल दिवस.

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd No. M H-649

प्रखर देशभक्ती

सूत्रबद्ध संघटना

अमोघ वक्तृत्व

देशाच्या राजकारणातले यशस्वी डावपेच

परराष्ट्र राजकारणावरील पक्की मांड

हे सर्व हिटलरपाशी होते

तरी अखेर

त्याचा पराभव का झाला ?

नाझी भस्मासुराचा उदयास्त

वि. ग. कानिटकर

मूल्य : पंचवीस रुपये

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. **माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., १७-बी, कोथरूड, पुणे ४, येथे छापून, ४१९. नारायण पेठ, पूणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. **माजगावकर.**